||श्री समर्थांचा दासबोध|| [गद्य प्रबंध] ऑरकुट वरील "संत-आनंदाचे स्थळ" कम्युनिटीवरून साभार...

||श्री समर्थांचा दासबोध||

आज पर्यंत लिहिल्या गेलेल्या सर्व ग्रंथा मधे परमेश्वराने केलेल्या विभीन्न प्रकार च्या लिलांचे वर्णन आहे| परमेश्वराने वेगळ्या - वेगळ्या प्रसंगाना आवश्यक्तेनुसार प्रुथ्वि लोकांवर जन्म घेतला| त्या बद्दल ग्रंथाच निर्माण झाल| ह्य वेगळ्या ग्रंथान मधे प्रत्येक वेळेस परमेश्वराची लिला वर्णित आहे| त्यातुन आम्हाला हे सांगीतल गेल की माणसांनी त्या परमेश्वर स्वरुप अवताराने वागलेल जीवन कस जगलं? त्याच प्रतिरुप वागण आपल्या जीवनांत आणाव| कारण श्रीरामाच चरित्र अनुकरणीय व श्री क्रुष्णा च चरित्र चिंतनीय आहे| ह्या दोन्ही जीवनांत परमेश्वराने केलेल्या क्रुतिच अनुकरण करण फ़ारच अवघड आहे|

समर्थांनी लिहिलेला हादासबोध एक्मेव असा ग्रंथ आहे की ज्याच्या मधे माणसाने कस वागाव हे सांगीतलेल आहे| भक्ति मार्गाच्या योगाने मोक्ष कसा प्राप्त होतो व हा सद्ग्रंथ ऐकल्याने सुध्दा बध्द लोकांच पण जीवन सार्थक होत| असा समर्थांचा विश्वास आहे| तेव्हा हा ग्रंथ कीती मोठ सद् क्रुत्याच स्वरुप आहे व ह्यातुन काय घेण्या सारख आहे ते पहाव|

"श्री दासबोध" म्हणजे काय?

" दासाला सद्गुरुंनी केलेला ज्ञानाचा बोध" तो हा "दासबोध" | ह्या गुरु शिष्यांच्या संवादाने भक्तिमार्ग स्प्ष्ट क्रुन सांगीतला आहे| असा ह्या ग्रंथाचा आशय आहे| दासबोध हा पूर्वि पण होता, अत्ता पण आहे व पुढे पण होणार| कारण जिथे-जिथे गुरु ने शिष्याला बोध केला तिथे -तिथे दासबोध घडलाच| जस शंकराने पार्वती ला सांगीतलेल ज्ञान [शिवगीता] श्रीक्रुष्णाने अर्जुनाला सांगीतलेल ब्रह्मज्ञान [ब्रह्मगीता] श्रीरामा ने लक्ष्मणाला सांगीतलेल ज्ञान [रामगीता] वसिष्ठांनी रामाला सांगीतलेल ज्ञान [वसिष्ठ गीता] श्री समर्थांनी कल्याणाला सांगीतलेल ज्ञान अर्थात् गुरुने सांगीतलेल गुह्यब्रह्मज्ञान जो बोध तोच हा "दासबोध"|

प्रथम दशक..

कुठल ही कार्य प्रारंभ करतांना परमेश्वराच नमन् करण ही प्रथा आहे| त्या परमेश्वरालाच हे साकड घालायच की तूंच पार नेऊ शकतो व अता तूंच पार ने| ही भावना सिध्द आहे | म्हणून श्री समर्थांनी सर्व प्रथम विघ्नहर्ता श्री गणेशाला वंदन केल आहे| मग वाणी ची देवि सरस्वती माता शारदेला नमन् केल| जी वाणी शब्दांचे स्फूरण करुन वैखरी [मुखा] द्वारे बाहेर पडते| परा,पश्यन्ति,मध्यमा,वैखरी अशा चार प्रकारची वाणी असते तिला माझा नमस्कार असो| श्री सद्गुरुंना वंदन करीत समर्थ म्हणतात हे अगम्य परब्रह्म् ज्याला माया ही स्पर्श करुं शकत नाही | जे स्वरुप गंगा-अम्रुत-मोक्ष-स्वरुप,कोमल,सगुण-निर्गुण अस दोन्ही आहे| शाश्वत व निश्चल आहे| मुख्य परमात्म्याच्या प्राप्ती साठी उपासना मार्ग साधण्यास सदगुरु स्वरुप अगम्य आहे| ज्या कारणे

मनांतील अज्ञानाचा अंधार पूर्ण भ्रम दूर होतो व जन्म-मरण चुकतात| म्हणून ते स्वरुप अवर्णनीय आहे| तेव्हा त्यांना हा देहभाव सोडून साष्टांग नमस्कार करीत आहे |
त्याच बरोबर इथे एक गोष्ट सांगावीशी वाटते की सतगुरु आणी सदगुरु मधे काही अंतर असतो | तो असा की सतगुरु म्हणजे तो जो आपल्याला सत् क्रुत्य करण्यास प्रव्रुत्त करतो व सद् गुरु तो जो आपल्याला सद् गति [मोक्ष] प्रदान करतो|
आता पुढे..
पुढे समर्थ परमार्थाला आधर भूत असण्यारया संत सज्जनांना नमन् करीत आहे | संत म्हणजे धर्माचे रक्षक ,सायुज्य मुक्ति चे माहेर आहे| समर्थ श्रोत्यांना वंदन करीत आहे | ते म्हणतात - भक्त-ज्ञानी-संत सज्जन, विरक्त,योगि,गुणी,सत्यनिष्ट अश्याप्रकारच्या अधिकारी श्रोत्यांना नमस्कार | समर्थ कविंना पण नमस्कार करीत आहे| ते सभेला पण नमस्कार करतात| ते सांगतात -- ज्या सभे मध्ये स्वत: जगदीश्वर प्रेम भराने तिष्टत उभा राहतो म्हणून तेथे मुक्ति सुलभेने प्राप्त होते | अशा कीर्तन-पुराण-श्रवण- निरुपणांच्या सर्व सभांना मी नमस्कार करीत आहे|समर्थ म्हणतात - हानरदेह फ़ार कष्टांनी प्राप्त झाला आहे | तेव्हा ह्या नरदेहाचा मोह सोडून भक्ति मार्गा स्वारे आत्म बुध्दि कडे वळण्याचा प्रयत्न करावा व देहाला सार्थक करावे| त्यातच जीवनांच सार आहे| म्हणून सतत् नामस्मरण करीत रहावे|
||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक दूसरा...
समर्थ परमार्थाचे स्तवन करीत म्हणतात ! परमार्थ हा साधकां चे स्वहित आहे| सर्व योगांत अत्यंत श्रेष्ट योग आहे| परमार्थ म्हणजे विवेक पुरण विचारांनी अहंभाव रहित होऊन पैल पार जाण्याचा मार्ग शोधण आहे| अक्षय , अपार , निजठेवा आहे हा| त्या मुळे विश्रांति प्राप्त होते| ते म्हणतात ! हा नरदेह श्रेष्ठ आहे| ह्याची अपूर्वता विलक्षण आहे| परमार्था स्वारे जी इच्छा धरावी ती नरदेहांत सफ़ल होते| ह्याच्या सहाय्यने जीव भक्ती मारगाला लागतो| तेव्हा ह्या देहाला परोपकारात झीजवाव्ण्याचा प्रयत्न कारावा |
समर्थ पुढे सांगतात-- ह्या देह बुध्दितुन बाहेर येऊन आत्म बुध्दित पदार्पण करायला पाहिजे| प्रत्येक माणूस ह्या संसारतल्या मिथ्यापूर्ण दिसणारे सर्वच काही ज्याला माणूस [जीव] माझ-माझ म्हणतो , त्यात आसक्ति ठेवतो,मायेत गुरफ़टतो| ज्याला बुध्दि प्राप्त आहे असाही माणूस माझ-माझ म्हणत राहतो | त्याने त्याला काय साध्य होते ? फ़क्त अहंकारच न ? त्यात काही अर्थ आहे का ?म्हणून आसक्ति रहित कार्य करुन परमार्थाला लागल तर जीवन सार्थक होईल| घराचे ,भौतिक सुखाचे , देहाचे ममत्व सगळ व्यर्थ आहे| परमार्थ निभवण हे नरदेहाचे कर्तव्य आहे| समर्थांनी मुख्यत: सम्पूर्ण दासबोधात देहबुध्दि कडून आत्म बुध्दि कडे वळण्यास सांगीतले आहे| त्याला किती व कस

सार्थक कराव हे आपल्या हाती आहे |

आता पुढे....
समर्थ सांगतात -- जीवन जगतांना साधारण पणे कीती तरी प्रकारे देहबुध्दि चे भाव क्षणा-क्षणाला आमच्या हातुन जाणते किंवा अजाणते पणे घडतात |त्या क्रुतींचे आम्ही पर्वत चे पर्वत एकत्र करीत राहतो |ते जो पर्यन्त दूर करणार नाही तो पर्यन्त परमेश्वर दर्शन कसे घडणार ? म्हणून काय सार व काय असार हे पाहून काय घ्यावे व काय सोडावे हे समजुन विवेकाने वागाव| आणी समज होण्या करीतां सतत् नामस्मरण करीत असाव| देह बुध्दिचे लक्षण सांगताना ते सांगतात- आपण आत्मबुध्दि कडे दूर्लक्ष करुन देहबुध्दिला महत्व देतो |तेव्हा त्याच सार जाणून , नको त्या दुर्गुणांना टाकण्याचा प्रयत्न करायला हवा| अहंकर्तुत्व बुध्दिला सोडण्याचा प्रयत्न करावा| जस खडे काढल्या वाचून धान्य घेता येत नाही, |तसेच दोष काढल्या वाचून प्रव्रुत्ति मार्ग शुध्द होत नाही| दोष दोन प्रकारचे असतात--[१] ज्ञात [२] अज्ञात| तसे मूर्ख ही दोन प्रकारचे असतात [१] मूर्ख [२] पढत मूर्ख| जो प्रपंचात दंग असतो त्याला आत्मज्ञान होत नाही |प्रपंचात दंग असण्यात अनेक असे कार्य जे उचित नाही पण अहंकारा मुळे मनुष्य त्यांना उचित समजुन करीत राहतो |ती मूर्खांची लक्षणे असतात |ही लक्षणे सोडून उत्तम लक्षणांना आत्मसात करायचा प्रयत्न करुन जीवन सार्थक करावे|

समर्थ उत्तम लक्षण सांगतात-- ते म्हणतात -- जाणत्यांना म्हणजे घरच्या मोठ्यांना विचारल्या वासांगीतल्या विण जावु नये| व्यवहारी मर्यादा सोडू नये| पुण्य मार्ग सोडू नये |वाचाळाशी भांडू नये| सदुपदेश ऐकावा |खोट कधी बोलु नये|फुशार्की मारु नये| सत्कार्या चा त्रास मानु नये |दूसरा आपणांस टाकुन बोलेल अस वागु नये| प्रसंगी एखादा बोललाच तर वीरश्री धरून अवगुण टकण्याचा प्रयत्न करावा| सत्व गुण टाकु नये| धैर्य कमी होऊ देऊ नये| गुरु केल्या शिवाय राहु नये| थोड्क्या धन प्राप्ती ने वा धन प्राप्ती ने उन्मत्त होऊ नये| सत्य मार्ग सोडू नये| वैभव , आयुष्याची शाश्वती ठेवु नये| प्रापंचीका ची शबल लक्षणे [वाईट गुण] त्यागार्थ सांगीतली आहे| प्रापंचीक शुध्द लक्षणे ही सांगीतली आहेत| जीव परमार्थीक व्हावा म्हणून|
पुढे समर्थ सांगतात-- देहबुध्दितुन बाहेर येताना जीवाला त्याग करणारी काही कार्य असतात |ते जाणून त्यांचा त्याग करण गरजेच आहे| म्हणजे देह भावास विसर पडणे सोईचे होत |कुविद्येच्या माणसाच्या आंगी अतिशय अवगुण असतात, म्हणून त्यांना अतिशय अवघड , कठीण कींवा सन्मार्गाच्य गोष्टी ऐकुन त्रास होतो| ते दुर्गुण कसे ते पहावे-- अनीतीने वागणारा असे हे अनेकों कुविद्येचे लक्षण आहेत| दैवि सम्पत्ती ची लालसा,क्षुद्र मनोव्रुत्तीच असा अभागी असण अशी ही कुविद्येची लक्षणे आहेत |तेव्हा त्यांचा त्याग करावा|
क्रमश:

आता पुढे...

समर्थ सांगतात ही कुविद्येची लक्षणे सोडायला भक्तिच निरुपण आवश्यक आहे| तेव्हा हा नरदेह तारण्याला भक्ति निरुपण हा सुलभ मार्ग आहे |कारण नर देहाची प्राप्ती सत् क्रुत्या च फ़ळ होय व सन्मार्ग प्राप्त होण परम भाग्य |त्यात सत्कर्म घडणे , भगवद भजन करणे पूर्व पुण्याईचे फ़ळ असते| सत्संगतीने आयुष्याच सार्थक होत |नेहमी पश्चाताप युक्त त्याग करावा| कर्म उपासने चे आचरण करुन ज्ञान प्राप्त करावे| आचार विचार न करता, मुक्त वागणारे लोक, अंतःकरणांत भक्ति नसलेले लोक, जीवंत असले तरी ही म्रुत तुल्य असतात |ज्याच्या जवळ भरपूर पुण्याई असेल त्यासच हरिभक्ती घडते |समर्थ सांगतात --सत्व-रज-तम ह्या तीन्ही गुणांचा मिळुन देह बनलेला आहे| जो गुण ज्याचा प्रबल असेल, तसा माणसाचा स्वभाव असतो| त्यात सत्वगुण उत्तम असतो| ह्याच्या योगाने भगवद भक्ती प्राप्त होते| रजोगुणा मुळे जन्म मरणाचे फ़ेरे फ़िरावे लागतात| तमोगुणांनी प्राण्यास अधोगति भोगावी लागते| ह्या तिन्ही गुणांत शुध्द व शबल असे दोन प्रकार असतात |शुध्द गुण परमार्थीक असतात व शबल गुण प्रापंचिक असतात |

रजोगुण.. .. तमोगुण ...सत्व गुण

सत्व गुण म्हणजे चांगले गुण , तमोगुण म्हणजे वाईट गुण व रजोगुण म्हणजे कार्य करण्याची शैली व क्षमता असणे |

रजोगुण..

हा गुण वाढला की जीवाला हे माझ-हे माझ आ सूचत |हा शबल रजोगुण चा प्रकार असतो |त्या मुळे फ़ार दुःख भोगावे लागते| हाच रजोगुण शुध्द भावात असणे म्हणजे निस्वार्थ भगव्द् भक्ति करणे |काया, वाचा, मने, परमेश्वरास स्वतःला अर्पण करावे| कर्म करण रजोगुणांचे कार्य आहे पण सत्व गुणांत मिळुन कार्य केल की तो शुध्द रजोगुण होतो|

तमोगुण ...

तमोगुणांची लक्षण म्हणजे जे दुष्क्रुत्य असते ते कार्य |जसे उद्वीग्नता ,क्रोध येणे ,हिंसा करण, बेफ़ाम होण भ्रमिष्टा सारख करण |असे अनेकों तमोगुण आहेत |

प्राप्त जन्म चुकविण्या साठी सत्वगुण पाहीजेच| हा गुण दुर्लभ असतो| ज्याच्या योगाने उत्तम गति प्राप्त होते, अज्ञान संपते |परमेश्वरा प्रति प्रेम उत्पन्न होत| सुख दुःखा चा विसर पडतो |परमार्थाची आवड उत्पन्न होते| परोपकार घडतो| अंतःकरण शुध्द निर्मळ असणे हा सत्वगुण आहे| परमार्थ कींवा सन्मार्ग हा सर्वांनाच कां नाही आवडत ? तर ते त्रिगुणा मुळे होत| ज्या गुणाच प्राबल्य अधिक असत तसच आचरण घडत| सत्वगुणांत दास्यभक्ति चे दोन प्रकाराचे कार्य असतात| [१] अनेंक वस्तु देवाला अर्पण करणे , हल्की कामे [झाडलोट] करण्याच मनांत येण ||[२] देवाच्या भक्ति मधे हलके कामे बिना लाजता करणे |हे दोन्ही सत्व गुण आहेत |दूसरा सत्व गुण शुध्द सत्व गुण

म्हणवतो|ध्यान प्रगट होऊन प्रेमाश्रु वाहणे, दूसर्याच्या दु:खाने ज्याला कष्ट होतात तो सत्व गुण असतो| असाहा सत्वगुण सात्विकतेने प्रपंचातुन तारून नेणारा आहे|
सत्व गुणाचा मुख्य भाग म्हणजे कुठली चांगल्या क्रुति ची भावना मनांत येण व ते कार्य करुन देण हे जास्त महत्वाच |

सदविद्या लक्षण..
समर्थ सांगतात... उत्तम गुण म्हणजे सत्वगुण व सर्वोत्तम गुण म्हणजे सद्विद्या लक्षण| ती अशी की अश्या माणसांत भाविकता,श्रध्दाळुता, सत्वशीलता,प्रेमळ पणा, शांती, क्षमा, दयायुक्त, सत्कार्यास तत्पर, अम्रुतासारखे भाषण करणारा , धैर्यशील , उदार , वैराग्यशील , तपस्वी , स्वतः ज्ञानी असून दूसर्याचा आदर करणारा,| असे गुण प्रबळ असतात |सदविद्या लक्षण वाला जीव , ज्ञान व भक्ति दोन्ही गुणांनी परिपूर्ण असतो| तेंव्हा रुप लावण्य ही अभ्यास क्रुन अंगी आणण्या सारखए नाही | ह्या साठी सदगुणांचा अभ्यास करुन सदविद्या जवळ असावी|

आता पुढे..
त्रिगुण वर्णन पूर्वि केले आहेच |ते तिन्ही गुण, बंधन कारक आहेत |
आळस ,निद्रा, प्रमाद, हे तिन्ही गुण बंधन कारक असतात |आळस ,निद्रा,प्रमाद हे तमोगुणांचे बंधन |काम,क्रोध,वासना हे रजोगुणांचे बंधन आणि मी सुख देणारा , परोपकार करणारा, असे वाटणे हे सत्व गुणांचे बंध |रजो--तमाचे निरसन सत्वगुण करतो व सत्वाचे निरसन करण्यास सदविद्या पाहीजे|
हे सगळ झाल्या नंतर जीवाला विरक्त पणाची आवश्यकता असते| मधुर भाषी असणे,विवेक पूर्ण वागाणे , इंद्रीयांचे दमन करावे , ब्रह्मज्ञान असावे, सत्क्रियेचा उध्दार करावा निव्रुत्ति मार्गाचा विस्तार करावा| सन्मार्ग व सत्व गुण नित्य जवळ असावेत |भोळ्या भाबड्या शरणार्थीची उपेक्षा करु नये| अंतर्निष्ट असावे| आशेचा दास बनु नये| निंदकास वंदावे |साधकांस आत्मबोध करवावा |बध्दास जागे करावे |मुख्य हे उत्तम गुण घ्यावे व अवगुण लगेच टाकावे, नाहीतर स्वेच्छाचारी पणा माजतो |
पुढे समर्थ सांगतात-- उत्तम लक्षणांनी मूर्खाच्या आंगीचातुर्य येते |काही शिकलेले असून सुध्दा मूर्ख असतात |त्यांना पढतमूर्ख म्हणतात |ज्ञान असून सांगण्या चा अहंकार असण पढात मूर्खांचे लक्षण |स्वच्छंद वागण , भक्ति व धर्माच खंडण करण, मद्य मासांदिकांचा अंगीकार करण ,उणे पाहण , वाचाळ वक्त्याचा मान भंग करणे व आपल हीत ज्याला कळत नाही ,स्वतः वर्तन केल्या शिवाय दूसरयाला सांगण , अशे हे पढत मूर्खांची लक्षणे आहेत |ज्यान्चा त्याग करायला पाहिजे |

पढत मूर्खांचे लक्षण..
एकंदरीत हे की प्रपंच कर्तव्य निभवताना मी पणा नको |मोठे पणा आपल्या कडे घेवु नये|प्रत्यैक देह रजो-तमो-सत्व गुणांनी परिपूर्ण असतो |त्यात कोणता सोडायचा व कोणता घ्यायचा हे ज्ञान असण आवश्यक आहे |सत्वगुण उत्तम व सदविद्या लक्षण सर्वोत्तम गुण असतात |माणसांच्या आंगी विरक्ताचे लक्षण आले म्हणजे तो ज्ञान प्राप्तिच्या जवळ सरसावला हे सिध्द होत व ज्ञान प्राप्ती नंतर आपली फ़ुशार्की सांगु नये |कारण ते पढत मूर्खांचे लक्षणे असतात |
||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक तिसरा...
समर्थ सांगतात-- सगुण परीक्षा म्हणजे काय? जन्म म्हणजे दु:खाचा डोंगर आहे |जन्म हा अज्ञान पूर्ण भ्रांति चा पडदा आहे |स्वसुखाची विस्म्रुति, काळजी चे घर , वासनांचा विस्तार म्हणजे "जन्म" |जन्म ही मायेची फ़सवणूक आहे |ह्या शरीराच्या मुळाचा जर विचार केला तर ह्याच्या इतक अमंगळ दूसर असा कोणताही पदार्थ नाही असे वाटेल |जो आर्तव अतिशय अशुध्द असतो ,त्याचाच हा पुतळा बनलेला |तेव्हा येथे निर्मळपणा कुठला ? शरीर वर-वर शोभिवंत दिसले तरी आत नरकाचे पोतडे असते |सर्व शरीरात मुख्य शिर ,भरल असतच |ज्यात लाळ , थुंका ,घाण , कफ़ [श्लेष्मा] ज्यात भरपूर भरल असत |अश्या घाणेरड्या तोंडाला कवि चन्द्र मुखाची उपमा देतात| पोटात विष्टा भरली असते |शरीराची सर्व विष्टा झडली की देह पडला |
आता पुढे...
अशी ह्या देहाची स्थिती गर्भाच्या कैद खान्यात नौउ महिने वस्ती करुन हाल सोसले |श्वासा पुरता वायु सुध्दा पूर्ण मिळत नाही |मतेने खाल्लेल्या कडू व तिखट पदार्था मुळे त्या गर्भातील बालकाचे सर्वांग पोळत असते| अश्या बंदीखान्यात कळवळुन देवाची प्रार्थना करतो की हे "चक्रपाणी" मला येथुन सोडव |गर्भात असतानां सोहं-सोहं म्हणत होता तोच बाहेर आल्यावर कोहं-कोहं म्हणू लागतो | अज्ञाना मुळे भ्रांति उत्पन्न होऊन तेच त्याला सुख वाटु लागते| माया जाळांत गुंतुन पडतो| अश्या प्रकारे गर्भवासाचे दु:ख प्रत्यैक प्राण्यास भोगावे लागते| म्हणून ते दु:ख चुकविण्या साठी भगवंताला शरण ज़ाओ भग्वंताचा भक्त असतो तो जन्म मरणां पासून मुक्त होतो| आत्म ज्ञानाच्या बळावर तो सर्वदा सर्वापासून अलिप्त राहतो|
समर्थ जीवाला सांगतात - हे मानवा ! संसार हाच दु:खाचे उगम स्थान आहे| बाळपणी झालेले सुख-दु:ख सांगायला वाचा नसते| आपल्या देहाचे रक्षण त्याला करता येत नाही |अनेंक अपघात घडत असतात| ती आई कुरुप, दुर्गुणी, करंटी. सगळ्यांपेक्षा वाईट असली तरी तिच्या सारखे या जगांत दूसरे कोणी नाही असे त्याला वटते| लोठा झाल्यावर सर्व विसर पडतो| ठक लोक नसती नाती जुळवून पाशांत अडकवुन प्रवाश्याचा प्राण घेतात |तश्याच प्रकारे आयुष्य संपले म्हणजे ह्या

प्राण्याची स्थिती होते| मग शोकाकूल होऊन म्हणतो की " माझा मोठा घात झाला" |आता कसला संसार अन् कसल काय?

आता पुढे..

सगुण परीक्षा मधे ,समर्थांनी माणसांचा जन्म त्याला कसा प्राप्त झाला व त्याचा तो कितपत दुरुपयोग करतो की तो न करता कसा त्याने ह्या नरदेहाचा सदुपयोग करुन घ्यावा -- हे सांगीतल आहे| ह्या सगुण निरुपणांत माणूस तीन प्रकार च्या तापांनी निघतो| माणूस जसा इच्छीत वस्तु च्या प्राप्ती ने संतोष प्राप्त करतो, तसा त्रिविध तापांनी पोळलेला माणूस शेवटी सत्संगतीने शांत होतो|

तीन तापांचे प्रकार म्हणजे== [१] अध्यात्मिक ताप [२] अधिभौतिक ताप [३] अधिदैविक ताप|

[१] अध्यात्मिक ताप= म्हणजे देह इन्द्रिये आणि प्राण [मन] ह्यांच्या संयोगाने सुख दु:खाचे जे कष्ट होतात ते अर्थात् स्वत: च्या दुष्क्रुत्याने जो दूसरयाला त्रास देण्या नंतर स्वत:ला कष्ट होण म्हणजे [पश्चाताप होण] म्हणजे अध्यात्मिक ताप|

[२] अधिभौतिक ताप = सगळ्या पंचभूतांच्या संयोगाने [कींवा प्राणी मात्रा पासून ] सुख दु:ख उत्पन्न होते |तो अधिभौतिक ताप असतो| अर्थात् दूसरया पासून होणारे कष्ट म्हणजे सांप विंचू चावण ,इतर जीव आपल्याला कष्ट देतात कींवा आपले सगे संबंधी आप्तस्वकीय जेव्हा त्रास देतात तो त्रास अधि भौतिक ताप असतो|

[३] अधि दैविक ताप= प्राण्यांना आपल्या बरया वाईट कर्मा मुळे देहांतानंतर स्वर्ग भोग कींवा नर्क भोग यातना भोगाव्या लगतात |त्याचे नांव अधिदैविक ताप होय| अर्थात् ८४ लक्ष योनि च्या भोगांत जेव्हा जीव जगतो व मरतो त्या नंतर देवा कडे गेल्यावर होणारे कष्ट व मग पुन्हा जन्म | म्हणून ह्या नर देहाला महत्व आहे की जेवढी भक्ति व नामस्मरण करता येईल तेवढ करुन आपल जीवन सार्थक करण्याचा प्रयत्न करावा |

||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक चौथा.. [नव विधा भक्ति]

गणेश शारदा सदगुरु |संत सज्जन कुळेश्वरु || सर्व ही मझा रघुवीरु |सदगुरु रुपे||श्रीराम||

नवविधा भक्ति.. समर्थ म्हणतात-- गणेश ,शारदा माता , सदगुरु , संत, सज्जन, कुलदेवता , व सर्वकर्ता रघुवीर जो मझा सदगुरु आहे त्या सर्वाना मझा साष्टांग नमस्कार असोत |श्री भगवद् गीते मधे नवविधा भक्तिंचे प्रकार सांगीतले आहे ते पहावे== श्रवण, कीर्तन ,विष्णू स्मरण, पाद्सेवन् ,अर्चन,.वंदन, दास्यत्व , सख्यत्व , आत्म निवेदन असे ९ प्रकार ची भक्ति कुठली ही करा बाकिच्या सर्व आपोआप माघे लागतात |

दशक चौथा.. [नव विधा भक्ति]

समर्थ म्हणतात -- हरि कथा व पुराण ,अध्यात्म निरुपण "श्रवण" करणे ही पहीली भक्ति होय | सगुण-निर्गुण उभय रुप असल्या मुळे त्याच्या सगुण लिला ऐकाव्यात | अध्यात्म श्रवणाने ज्ञान्बोध होतो | कर्म मार्ग उपासना मार्ग , ज्ञान मार्ग , गुरुभक्ति मार्ग, योग मार्ग, वैराग्य मार्ग, हे सर्व श्रवण करीत रहावे| चौदा विद्या, चौसष्ट कला , सामुदायिक लक्षणांचे सर्व भाग त्यांच ज्ञान श्रवण कराव| नवविधा भक्ति व चतुर्विधा मुक्ति कश्या असतात वौत्तम गति कशी प्राप्त होते हे सर्व ऐकुन घ्यावे| सर्व ज्ञानात्मक प्रवचन भाषण ऐकावी | परंतु त्यातल सार शोधुन घ्याव व असार काय ते सोडून द्याव| ह्याच नांव श्रवण भक्ति| देवाची स्तुती, स्तोत्रे, भजन, साधने ,ऐकावी| ही सगुण स्वरुपाची श्रवण भक्ति होय | अध्यात्म शास्त्राचे निरुपण ऐकणे ही निर्गुणाची श्रवण भक्ति होय | देवाशी झालेला वेगळे पणा टाकून भक्तिचे मूळ [तादात्म्य] शोधावे |

दूसरी भक्ति "कीर्तन"भक्ति| सगुण हरि ची कथा करावी| वाणी ने नेहमी भगवद गुण गावे | आपल्या शाश्वत सुखाच्या स्वार्था साठी हरि कथा पुन्हा-पुन्हा करावी | नित्य नवा अभ्यास ठेवावा | कीर्तन भगवंताला आवडते | त्याने श्रोता, वक्ता, व देव ह्यांचे समाधान होते | कीर्तनांत प्रेम भरीत होऊन देवाची करुणा भाकावी | प्रेमाश्रु सहित गायन करावे | कीर्तनाने दोष जाऊन उत्तम गति मिळते , भगवंताला प्राप्त करण्यासाठी ह्या भक्ति चा वापर करण्यात संशय नाही| वाणी पवित्र होते , सत्पात्रता अंगी येते, चित्त एकाग्र होते | आत्म बुध्दिचा निश्चय सापडतो| संशय नाहीसा होतो|

तिसरी भक्ति..[४-३] [विष्णू स्मरण]

तिसरी भक्ति "विष्णु स्मरण" आहे | देवाच्या स्वरुपाचे स्मरण करावे | सुख दुःख उद्वेग चिंता आनंद ह्या पैकी कोणत्या ही स्थितीत नाम स्मरण करावे| परमेश्वराच्या नामाने संकटे व विघ्ने नाहीशे होतात| परमेश्वराची अनंत नामे आहेत | त्या पैकी कुठल ही नांव घेतल तरी उध्दार होईल | निरंतर नामस्मरण करत, ते पुण्य शरीर आहे अस समजावे| नामाच्या योगाने पुष्कळांचा उध्दार झाला | नाम कोणी ही व कुठे ही घेवु शकत | तेथे लहान थोर कींवा जाती भेद नाही| म्हणून नामाचे स्मरण अखंड असावे| त्याच बरोबर देवाचे रुप आठवावे|

चौथी भक्ति ..[४-४] [पादसेवन भक्ति]

काया वाचा मने मोक्ष प्राप्ति साठी सदगुरुंची चरण सेवा करणे त्याचेच नांव "पादसेवन" भक्ति| सदगुरु चरणी अनन्य भाव ठेवावा | सदगुरु प्रथम सत्य वस्तु परब्रह्म दाखवितात, मग सारा-सार विचार सांगतात | ब्रह्म स्वरुप "अंतकरणात "बाणवितात| अर्थात् ब्रह्म स्वरुपाची ओळख सदगुरु करवितात| अहं बुध्दि चा विशेष त्याग व्हायला हवा | संगत्याग [अहं पणा टाकणे] निवेदन[ स्वात्मार्पण] विदेह स्थिती [देहातीत अवस्था] अलिप्त पणा [संसारात असून नसल्या सारखे] सहजावस्था कर्तुत्वाची [ अहंकार नसणे] उन्मनी [ मनाच मन पण मोडणे] विज्ञान [ज्ञानाची

उर्मी नष्ट होणे] ही सात [७] ही नांवे समाधानाची अर्थात् समाधि सुखाची आहेत |हे सर्व सदगुरु पादसेवेने कळत |ह्या भक्ति ने कोणते ही रहस्य उकलते| खर तर सदगुरु चरण सेवा म्हणजे "पादसेवन भक्ति"| ही भक्ति त्रैलोक्यात माणसाला पावन करते|

पांचवी भक्ति [अर्चन भक्ति]५ वी भक्ति

पांचवी भक्ति [अर्चन भक्ति]

पांचवी भक्ति अर्चन भक्ति..| अर्चन म्हणजे देव देव्तांची पूजा करणे| ती पूजा शस्त्रोक्त पध्दतीने करावी| शोभेच्या वस्तु , सुरेख पदार्थ,देवास यथा शक्ति अर्पण करावे| अतिथीचा यथोचित सत्कार करावा| देवाच्या मूर्ति कींवा तसबीरींना आदर पूर्वक पुजावे |घरी जे परम्परागत कुळधर्म व कुळाचार आहेत ते यथास्थित पाळावे| तिर्थ क्षेत्रास जावुन परमेश्वरास पुजावे| मिळुन सर्वांनी उत्सव साजरे करावे |अस सर्व करीत असतां देवाच्या ठायी सदभाव राहतो| मंदिरा भोवती विहिरी ,सरोवरे,शिखरे,व्रुन्दावने,मठ ,मंडप, धर्मशाळा, बांधाव्यात| जे जे अनुकुल असेल ते ते देवळास अर्पण करावे| लहान-मोठी भांडी देवालयांत द्यावी| उत्तम भावनापूर्वक परमेश्वराचे पूजन करावे| अर्चन भक्ति होय| अशीच देवा प्रमाणेच सदगुरुंची ही सेवा करुन त्यांच्या चरणी अनन्य असणे ही "अर्चन भक्ति" होय| अशी पूजा करता येत नसेल तर मानस पूजा करावी| मानस पूजा करुन सर्व पदार्थ देवाला अर्पण करावे |परमेश्वराला मानस पूजा ही विशेष आवडते| मनानेंच कल्पना करुन सर्व पूजा उपचार देवास अर्पण करुन जी पूजा करणे तिचे नांव "मानस पूजा " |

सहावी भक्ति [६वी भक्ति]

सहावी भक्ति [६वी भक्ति]

देव , संत ,साधु , आणी सज्जन ह्यांना नमस्कार करणे ही वंदन भक्ति होय| सूर्य ,देवांना , सदगुरु ह्यांना भावना पूर्वक साष्टांग नमस्कार घालावा |इतरांना नमस्कार करणे तो त्यांचा अधिकार पाहून करावा |शंकर , विष्णू ,सूर्य ,ह्यांच्या दर्शनाने दोष जातात |त्याच प्रमाणे मारुतीला नित्य नेमाने नमस्कार करावा| त्यात विशेष फ़ळ आहे| भक्त, ज्ञानी, वैराग्यशील पुरुष , महानुभाव , तापसी, योगी, असे योग्य व्यक्ति पाहिले की त्यांस तात्काळ साष्टांग नमस्कार घालावे| जेथे-जेथे काही गुण दिसून येतील ते सदगुरु चे स्वरुप समजुन त्यांना अति आदरपूर्वक नमस्कार करावे| आकाशातुन पडलेले पाणी जसे समुद्रा ला जाऊन मिळते ,त्या प्रमाणे सर्व देवांना केलेला नमस्कार केशवाला पोहोचतो| देव हे भगवंताची अधिष्टाने आहेत| म्हणून ह्या दोघांस ही नमस्कार करावा| नमस्कारा मुळे लीनपणा अंगी येतो, विकल्प मोडतो, सज्जनांशी - साधु संतांशी - सख्य होते| नमस्काराने दोष नाहीसे होतात| मस्तक नमविण्या हुन दूसरी शिक्षा नाही अस म्हणतात |अहंभाव किंचीत ही न ठेवता [ नि:शेष ] नमस्कार केल्यास दोषांचे डोंगर नाहीसे होतात व मुख्य परमेश्वराची क्रुपा होते |श्रेष्टांनी नेहमी अन्यायाची क्षमा करावयास हवी| नमस्कारात काही ही खर्च होत नाही , करावे लागत नाही |

नमस्कारा सारखे सोपे साधन नाही , मात्र तो नमस्कार अनन्यपणाने एक निष्टेने - वेगळे पणा टाकून किवा निष्कपट पणाने करावा |नमस्कार हे साधन श्रेष्ट आहे| त्या योगाने थोर थोरांची क्रुपा होते|

सातवी भक्ति [७वी भक्ति]

सातवी भक्ति [७वी भक्ति]

सातवी भक्ति सदा सर्वदा देवस द्वारी सन्निध राहून जे जे कार्य पडेल ते ते करीत जावे |ही सातवी "दास्य भक्ति ", जीर्ण झालेली देवळे नीट करावी , नडलेले कार्य असेल ते तात्काळ कारावे , देवाचे ऐश्वर्य सांभाळावे , उणे पडू देऊ नये| देवालया भोवती रम्य पुष्प वाटिका ,उपवने, उभारावी| अनेकों पशुशाळा ,पक्षिशाळा बांधाव्या| तात्पर्य सर्व कार्ये करण्यास तत्पर असावे| सदैव सावध असावे| शिवाय हल्की काही कामे असल्यास ती ही करावी |ज्या प्रसंगी जे पाहिजे ते तत्काळ द्यावे| देवा जवळ चांगले सुवासिक पाणी भरुन ठेवावे, विडा द्यावा, खाण्याची फ़ळे देवाजवळ नेहमी असावी | देवा पुढे करुण स्तोत्र म्हणावी, अश्या प्रकारे दास्य भक्ति करावी| अश्या प्रकारे प्रत्यक्ष योग न आला तर मानस पुजेत हे सर्व कार्य करावे| देवाची व सदगुरु ची मानस पूजा करावी|

आठवी सख्य भक्ति [८वी]

असावे|आठवी सख्य भक्ति [८वी]

आठवी सख्य भक्ति आहे| देवाशी अत्यंत स्ख्य असे करावे की त्याला प्रेमाने व प्रितिने बांधावे| देवास जे फ़ार आवडत असेल तसेच आपण वागावे| देवाला प्रिय काय ? भक्ति ,भाव ,भजन, निरुपण ,कथा किर्तन, प्रेमळ पणा हेच देवाला आवडते |देवाशी सख्य होण्या साठी आपल्या सर्व सुखावर पाणी सोडल पाहिजे| आपणाला त्याची [देवाची] आवड असावी |संसाराची चिंता न करता देवाचीच करावी| आपल्या सर्वस्वाची हानि झाली तरी देवाशी सख्यत्व करावे| अश्या प्रेमाने देव वश करावा| आपली निष्ठा स्थिर असावी |ज्या वेळेस जे घडेल ते देवाच्या इच्छेने घडल अस समजाव| तो जे करील ते शिरसावंद्य मानावे| देव भक्तांचा कैवार घेतो |देव अनाथांस सहाय्य करतो| तो अंतर साक्षी असतो| त्याच्या जवळ प्रेम कधीच संपत नाही| जसे देवाला मानतो तसेच सद्गुरु ला मानावे |ही आठवी भक्ति असते| चातक जसा मेघा कडे डोळे लावुन असतो अगदी पूर्ण पणे अनन्य असतो तो चन्द्राची वाट पाहात नाही |तसच आपण ही देवाशी अनन्य

आठवी भक्ति..[८ वी भक्ति] आत्म निवेदन==

आत्मनिवेदन म्हणजे नववी भक्ति |ही ९वी भक्ति समर्थांना अत्यंत प्रिय होती |सर्व भक्तिन मधे आत्म निवेदन करणे अत्यंत आवश्यक आहे| कारण जो पर्यन्त आत्म निवेदन नाही तो पर्यंत भ्रम तुटत नाही |आत्मनिवेदन म्हणजे देवासी आपण आपल्याला वहावे| विभक्त म्हणजे ऐक्य पावलेला भक्त नव्हे| "मी कोण" ह्या विचारांत उघड दिसते की "आपण" म्हणून

काहीच नाही| सर्व तत्वे जेव्हा संपतात तेव्हा "आपण" म्हणून कोठे उरतो? ह्या प्रमाणे आत्मनिवेदन होत| देह मी असा अहंकार पाठीमागे लागतो| विचार पूर्वक पाहिल्याने "मी" -- "अहं" "आपण" म्हणून काहीच नाही | निराळे पण - साक्षित्व - सुध्दा तत्वरुप असल्या मुळे , आत्म प्रचितीत शिल्लक अस काहीच राहत नाही | एकंदरीत आत्मनिवेदन करण म्हणजे " मी पणा" सोडून वाग़ण| त्याज बरोबर "आपण" मिथ्या असून देव खरा आहे | आणि देव- भक्त दोघे ही एक रुप आहेत| ह्या वचनाने रहस्य अनुभवी जाणतात | ह्यालाच " आत्म निवेदन" म्हणतात|

हे झाल समर्थांच्या प्रमाणे आत्म निवेदन| माझा अनुभव व प्रचीती सांगते आत्म निवेदन म्हणजे "सेल्फ़ एनालिसीस"| आपल्या वागण्यात , बोलण्यात, आचरणांत कुठली ही त्रुटी असल्यास त्याच सतत लक्ष ठेवणे व त्याला सुधारात आणणे| " हे आत्म निवेदन" javascript:void(0);

नववी भक्ति..[९ वी भक्ति] आत्म निवेदन==

नववी भक्ति..[९ वी भक्ति]

आत्म निवेदन==

आत्मनिवेदन म्हणजे नववी भक्ति | ही ९वी भक्ति समर्थांना अत्यंत प्रिय होती | सर्व भक्तिन मधे आत्म निवेदन करणे अत्यंत आवश्यक आहे| कारण जो पर्यन्त आत्म निवेदन नाही तो पर्यंत भ्रम तुटत नाही | आत्मनिवेदन म्हणजे देवासी आपण आपल्याला वहावे| विभक्त म्हणजे ऐक्य पावलेला भक्त नव्हे| "मी कोण" ह्या विचारांत उघड दिसते की "आपण" म्हणून काहीच नाही| सर्व तत्वे जेव्हा संपतात तेव्हा "आपण" म्हणून कोठे उरतो? ह्या प्रमाणे आत्मनिवेदन होत| देह मी असा अहंकार पाठीमागे लागतो| विचार पूर्वक पाहिल्याने "मी" -- "अहं" "आपण" म्हणून काहीच नाही | निराळे पण - साक्षित्व - सुध्दा तत्वरुप असल्या मुळे , आत्म प्रचितीत शिल्लक अस काहीच राहत नाही | एकंदरीत आत्मनिवेदन करण म्हणजे " मी पणा" सोडून वाग़ण| त्याज बरोबर "आपण" मिथ्या असून देव खरा आहे | आणि देव- भक्त दोघे ही एक रुप आहेत| ह्या वचनाने रहस्य अनुभवी जाणतात | ह्यालाच " आत्म निवेदन" म्हणतात|

हे झाल समर्थांच्या प्रमाणे आत्म निवेदन| माझा अनुभव व प्रचीती सांगते आत्म निवेदन म्हणजे "सेल्फ़ एनालिसीस"| आपल्या वागण्यात , बोलण्यात, आचरणांत कुठली ही त्रुटी असल्यास त्याच सतत लक्ष ठेवणे व त्याला सुधारात आणण | ही " आत्म निवेदन भक्ति"|

मुक्तिंचे ४ प्रकार

मुक्तिंचे ४ प्रकार

पुढे समर्थ... मुक्तिंचे ४ प्रकार सांगतात| त्यात्तीन प्रकार नाशीवंत आहे व एक प्रकार अविनाशी आहे|

[१] सलोकता|

[२] सरुपता|
[३] समीपता|
[४] सायुज्य मुक्ति|
अश्या ह्या ४ मुक्तिंचे प्रकार आहेत| ह्यात अस आहे की पहिल्या तीन प्रकार च्या मुक्तीचे भोग घेतल्यावर त्यंचा वेळ संपल्या वर पुन्हा जन्म आहे पण चौथी मुक्ती जर माणसाला प्राप्त झाली तर त्याला पूर्ण पणे मुक्तता असते | पुन्हा मग जन्म नाही|
[१] सलोकता मुक्ती== ज्या देवाचे भजन करावे त्या देवाच्या लोकांत जाऊन राहणे| ह्याला "सलोकता "अस म्हणतात |
[२] सरुपता मुक्ति== ज्या देवा सारखे रुप प्राप्त व्हावे ती सरुपता मुक्ति असते|
[३] समीपता मुक्ति== ज्या देवाच्या जवळ रहावे ते "समीपता मुक्ति" चे लक्षण असते|
[४] सायुज्य मुक्ति== निर्गुणाच्या ठिकाणी एक्रुपता असल्या मुळे "सायुज्य मुक्ति" प्राप्त होते| सायुज्यता म्हणजे निर्गुणाच्या भक्तिने प्राप्त होणारी तदाकारिता |ही सायुज्य मुक्ति अविनाशी आहे| अश्या ह्या ९ भक्ति व ४ मुक्तिंचे प्रकार आहेत | त्यात कोणता ही प्रकार निभवताना जो पर्यन्त आत्म निवेदन करत नाही , तो पर्यन्त देहभाव सुटत नाही | मणून "आत्म निवेदन भक्ति" सर्वात महत्वपूर्ण आहे | म्हणून सतत आत्म निवेदन करत रहावे व नामस्मरण करुन जीवन सार्थक करावे |
||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक ५वां.. [सदगुरु वर्णन]
दशक ५वां.. [सदगुरु वर्णन]
सदगुरु म्हणजे समर्थांचा आवडता विषय| समर्थ श्री सदगुरु विषयी सांगतात -- सदगुरु वर्णन करणे अत्यंत अवघड आहे | त्यांच वर्णन करण कठीणच अन् ते कस करावे?ते अशक्यच व अवर्णनीय आहे | समर्थांनी गुरुंचे अनेक प्रकार सांगीतलेत | त्यात माता गुरु पासून कुविद्या गुरु पर्यन्त असतात | शेवटी त्यात मोक्षदाता श्री सदगुरु सर्वांत श्रेष्ट पद आहे | मोक्षदाता सदगुरु ची वाखाणणी पूर्वि केलीच आहे |तरी ही पुन्हा सांगावस वाटत की ज्याच्या मुळे आपल्याला सदगति प्राप्त होते तो सदगुरु असतो | तेव्हा त्या पदाची उपमा कशाशी पण करता येत नाही | अस ते अगम्य परब्रह्म स्वरुप आहे| जो ब्रह्म ज्ञानाचा उपदेश करुन अज्ञान रुपी अंधकारा चा नाश करतो आणि जीवात्म्याचे परमात्म्याशी ऐक्यता करतो तो सदगुरु होय| माया जाळांत गुरुफ़टलेले संसार दु:खाने गांजलेल्या प्राण्यांची जो मुक्तता करतो तो सदगुरु| जीवास "तत्वामसि" ह्या महावाक्याचे रहस्य पटवुन - साक्षात ब्रह्मरुप करुन सोडतात ते सदगुरु अर्थात ब्रह्म रुपता देणारा | संशय अजिबात जाळून टाकतात व आत्मज्ञानाचा बोध करुन अविद्या समूळ नाहीशी करतात ते सदगुरु | त्याच बरोबर समर्थ सांगतात-- सदशिष्य कसा असावा? सदगुरु वाचून सदशिष्य किंवा सदशिष्या वाचून

सदगुरु असे हे एका वाचून दूसरा व्यर्थ असतात| जस जमीन तयार केली पण बी घाणेरडा पडला तर व्यर्थ |व तोच बी खडकावर पडला तरी व्यर्थ |पण ते बी पावसा शिवाय उगवत नाही |तसच अध्यात्म निरुपणात निस्वार्थ भक्ति नसेल तर उपयोग नाही |त्याच प्रमाणे निगा राखणे शेतास जरुरी आहे |म्हणून सतत साधना करणे जरुरी आहे| म्हणजे सदगुरु , सदशिष्य , व अध्यात्म निरुपण भक्ति ही त्रयी जुळुनच ब्रह्म ज्ञानाचे पीक शिष्या च्या मनोभूमिवर उगवते |व सतत् साधना केल्याने ते टिकते ही |तसेच आत्म ज्ञान झाल तरी साधना ही केलीच पाहिजे| [१] शुध्द उपासना , [२]वर्णाश्रमोक्त कर्म, [३]सदाचार , [४]स्वधर्म ,[५]संत संग व [६] निरंतरचा नित्यनेम ह्या सहा गोष्टी एकत्र जमल्या तर शुध्द उदय पावतो| म्हणून सदगुरु पाहीजेच |

सच्छिष्य कसा हवा? -

जस सदगुरु कसा असावा तसच सदशिष्य कसा असाअवा? ह्याला ही महत्व आहेच |ते म्हणतात सच्छिष्य कसा हवा? -- ज्याचा सदगुरु वचनांवर पूर्ण विश्वास पाहिजे |त्याने अनन्य भावाने अगदी देहा सकट सम्पूर्ण समर्पित असावे| समर्थ सांगतात--

"ऐसा सदगुरु पूर्ण पणी |तुटे भेदाची कडसणी| देहाविण लोटांगणी| तया प्रभुसी||श्रीराम||७-१-१८||

शिष्य मनाचा निर्मळ , सदाचार सम्पन्न , विरक्त , अनुतापी , असावा| निष्टावंत , शुध्द , मर्यादेने वगणारा, धैर्यवान , उदार , परमार्था विषयी आतुर , परोपकारी , निर्मत्सरी असावा| पुण्यवान सात्विक व्रुत्तिचा साधक , सत्पात्र असावा |संसार दु:खानी पोळलेला शिष्य परमार्थाला योग्य ठरतो| ज्याला संसाराचा त्रास वाटतो त्याचाच सदगुरुंच्या ठिकाणी विश्वास जडतो| जो सदगुरु वर द्रुढ विश्वास ठेविल तोच सच्छिष्य असतो |मोक्षाचा अधिकारी तोच| म्हणून " सदगुरु वचनी विश्वास पूर्ण " हेच सच्छिष्याचे मुख्य लक्षण सांगीतले आहे |ज्यास सदगुरु वचनाने समाधान प्राप्त झाले त्यालाच सायुज्य मुक्ति निश्चित प्राप्त होते |

उपदेशाची लक्षणे

पुढे उपदेशाची लक्षणे सांगतात |समर्थ म्हणतात-- अनेंक प्रकार ची उपदेशाची लक्षणे आहेत| नाना मंत्राचे उपदेश देणारे गुरु अनेकों सापडतात व विभिन्न प्रकारचे उपदेश देतात| तत्व ज्ञानी तत्वांची फ़ोड करुन सांगतात |अजपा गायत्री- प्राणायाम श्वासोच्छवासा बरोबर सतत सोहं शब्द उत्पन्न होत असतो| त्याला अजपा जप म्हणतात |आत्म ज्ञाना सारखे दूसरे पवित्र व उत्तम असे काही नाही| सगळ्या उपदेशां मध्ये आत्म ज्ञानाचा उपदेश श्रेष्ट आहे |सकल तिर्थाच्या स्नानांपेक्षां आत्म ज्ञानाच्या गंगेच स्नान कोटिपटीने श्रेष्ट आहे| म्हणून आत्मज्ञान समजण्याला अत्यंत कठिण आहे| ते गहनांतले गहन गुह्य आहे| व ते सदगुरु केल्याने प्राप्त होते|

आता पुढे..

पुढे समर्थ म्हणतात....

जो पर्यन्त ज्ञान स्वच्छ होत नाही तो पर्यन्त तळमळ जाणार नाही| चौदा विद्या चौसष्ठ कळा आणि त्यांच्या सिध्दी हे काही ज्ञान नव्हे |त्य शिवाय आणखी कला आहेत पण ते शुध्द ज्ञान नाही |जेथे प्रक्रुति व तिचे कार्य सारे लय पावते ते खरे ज्ञान होय |शुध्द ज्ञानाचे लक्षण ते म्हणजे "आत्मज्ञान" |"मी कोण " हे ओळखावे |सत्य स्वरुप समजुन घ्यावे |नित्य व अनित्य चा विचार करावा |ज्या ठिकाणी द्रुष्याकार प्रक्रुतिचा लय होतो, पंच भूतांचे खेळ सारे नाहीसे होतात, आणि द्वैत सारे मावळते, त्यास ज्ञान म्हणावे| "तत्वमसि" हे महावाक्य सर्व उपदेशाचे सार आहे | ज्ञान झाल्यावर बंधनाची भ्रांति नाहीशी होते| सर्व ज्ञानाचे फ़ळ व ज्ञानाचे केवळ शिखर असे हे" आत्म ज्ञान" आहे| हे झाले असतां सर्व संशयाचे मूळ पार तुटुन जाते| सदगुरु क्रुपा जे देते ते गोड प्रसाद स्वरुप असते |वेदांत , सिध्दांत, धादांत सर्व काही सदगुरु वचन आहे| मझ्या सदगुरु नाथाचे वचन जे अत्यंत गहन व ज्याच्या योगाने माझे पुर्ण समाधान झाले |ते हे माझ्या अंतः करणांतले रहस्य ,द्रुष्य भास सर्व मिथ्या आहे| हे जाणून व्रुत्ति स्वरुपा कडे फ़िरली की द्रुष्य असून ही नसल्या सारखेच होते| अशा प्रकारे आत्मनिवेदन सहज घडते| देहाभिमानाच्या योगाने जन्म म्रुत्युचे आज पर्यन्त जे भोगलेले फ़ेरे असतात ते पुन्हा भोगावे लागतात| म्हणून समर्थ आवर्जुन सांगतात देहभानाच्या फ़ेर्यात गुन्तु नका हा अहंकार सर्वात मोठा अहंकार आहे|

..जीवाच्या प्रक्रुतिचे ४-- लक्षण

समर्थांनी जीवाच्या प्रक्रुतिचे ४-- लक्षण सांगीतलेत..-- [१] बध्द स्थिती [२] मुमुक्ष स्थिती [३] साधक स्थिती [४] सिध्द स्थिती|

समर्थ सर्व प्रथम बध्दांची लक्षणे सांगताना म्हणतात--आंधळा असुन चालण्यारया मणसाला दाही दिशा ज्या प्रमाणे शून्य असतात तसा बध्द माणूस असतो |धर्म कोणता कर्म कोणते व अकर्म कोणते , सारासार विचार , स्वधर्माचा आचार किंवा दान पुण्य परोपकार ह्या पैकी काही कळत नाही तो बध्द |आपला स्वत:चा खरा स्वार्थ समजत नसतो| दूसरयांच्या म्हणण्यांत येऊन चुकीचे कार्य करतो |आत्मज्ञान नसणे हे बध्दाचे लक्षण ज्यात अज्ञानाची सर्व कुलक्षणे असतात तो बध्द| काया ,वाचा , मने चित्त वित्त जीव प्राण सर्व अर्पण करुन अनन्य भावाने द्रव्य - दारेचे [पैसा आणी बायको] भजन करतो त्यातनु क्षणाची ही ज्याला फुरसत मिळत नाही तो बध्द असतो |एकंदरीत अज्ञानी हे बध्दाचे लक्षण असतात|

मुमुक्ष लक्षण

समर्थ सांगतात --बध्दांचे लक्षण मुमुक्ष पणांत पालटतात |संसारात मद चढल्याने अनेंक हीन लक्षणे अंगी जडतात |अशा प्रकार चा बध्द प्राणि मूर्ख पणाने वागत असता काही काळ लोटल्यावर त्याला खेद उत्पन्न होतो |बध्द संसार दुःखानी होरपोळुन निघालेला , दुःखांनी त्रस्त झालेला, त्रिविध तापांनी पोळलेला , पश्चाताप झालेला प्रपंचा प्रति उदास झालेला , असतो |हे सर्व नाशवंत वाटल्यावर सारे श्रम निश्फ़ळ झालेले पाहून काही काळ सार्थक करावा अस ज्याला वाटत व मागचे दोष आठवले की भय वाटत असा माणूस तो बध्द झालेला माणूस मोकळा होऊन मुमुक्षा कडे वळतो |असा प्राणि योगा योगाने कथा निरुपणे ऐकुन अंतर्यामी पूर्ण पालटला म्हणजे त्याला मुमुक्ष म्हणतात |ज्याच समाधान झाल नाही व मग तो संताच्या शरणांगती गेला , तो मुमुक्ष असतो |समर्थ बध्दांचे लक्षण मुमुक्ष पणांत पालटते |संसारात मद चढल्याने अनेंक हीन लक्षणे अंगी जडतात |अशा प्रकार चा बध्द प्राणि मूर्ख पणाने वागत असता काही काळ लोटल्यावर त्याला खेद उत्पन्न होतो |बध्द संसार दुःखानी होरपोळुन निघालेला , दुःखांनी त्रस्त झालेला, त्रिविध तापांनी पोळलेला , पश्चाताप झालेला प्रपंचा प्रति उदास झालेला , हे सर्व नाशवंत वाटल्यावर सारे श्रम निश्फ़ळ झालेला पाहून काही काळ सार्थक करावा अस ज्याला वाटत व मागचे दोष आठवले की भय वाटत अस अ माणूस तो बध्द झालेला माणूस मोकळा होऊन मुमुक्षा कडे वळतो |असा प्राणि योगाने कथा निरुपणे ऐकुन अंतर्यामी पूर्ण पालटला म्हणजे त्याला मुमुक्ष म्हणतात|ज्याच समाधान झाल नाही व मग तो संताच्या शरणांगती गेला तो मुमुक्ष असतो |

साधकांची लक्षण सिध्द लक्षण

ह्याच बरोबर समर्थ साधकांची लक्षण सांगतात |साधक कसा असावा ? अनुतापी तप्त होऊन अवगुणांचा त्याग करुन संत संगति धरली म्हणजे त्याला साधक म्हणतात|संतास पुज्य भावाने शरण जाऊन त्यांनी त्यास आश्वासन दिले म्हणजे त्यास ग्रंथानुसार "साधक" म्हणतात |संतानी त्यास आत्मज्ञानाचा उपदेश केला म्हणजे ज्याचे संसाराचे बंधन तुटते आणि मग ते आत्मज्ञान द्रुढ होण्या साठी तो साधन करु लागतो |शास्त्र प्रचीती , गुरु प्रचिती व आत्म प्रचीती ह्या तिन्ही प्रचीती एकच आहे असा अनुभव येतो |आत्म नाम विवेकाने देह बुध्दि चे निवारण होते| असा असतो साधक| अनुभवाचे प्रकार जो जाणतो , योग्याची खूण व आत्म साक्षात्कार ज्याला बणतो तो साधक| त्याग करुन जो नित्य आत्म स्वरुपांत राहतो त्यातच आपोआप विरुन जातो व तेथे च स्थिरता पावतो तो साधक |अवगुणांचा संहार केला , अविचार त्यागला , सावध व दक्ष असून विवेक पाहणारा |सर्व विसंग टाकुन संत संगति धरणारा , साधना विषयी निरंतर तत्पर राहणारा सधक असतो|

येथे श्रोत्यांना शंका आली की, संसारी माणसाला त्याग घडत नाही |त्याग घडल्या वाचून साधक

होत नाही| मग सांसारिक माणूस साधक होतो की नाही ? समर्थांनी त्यांना उत्तर दिलेत -- "त्याग" शब्दाचा अर्थ सांगून निस्प्रुह पणा प्रमाणे सांसारिकांचा साधक होतो, असे सांगीतले आहे | सन्मार्गाचे मन:पूर्वक आचरण करावे आणि वाईट मार्गाचा त्याग करावा असा संसारी लोकांचा त्याग असतो| कुबुध्दि चा त्याग केल्या शिवाय सुबुध्दि लाभत नाही | मनाने प्रपंचाचा तिटकारा करुन विषयांचा त्याग केला तर च पुढे परमार्थ लाभ होतो | निस्प्रुहाला बाह्य त्याग अधिक घडतो सांसारिकाला प्रसंगानुसार घडतो | कारण नित्यनेम , श्रवण , बाह्यत्यागा वाचून घडत नाही|
साधकाचा संशय ब्रह्माण्डा च्या बाहेर गेला की आत्म स्थितिचा निश्चय ढळेनासा झाला की तो सिध्द होतो | नि:संदेही असतो तो साधु| साधन मार्गात ही पदोपदी संशय येतात, पण नि: संदेही असतो तो सिध्द | देह मी अशी व्रुत्ति आठवली की विवेकाच भान राहत नाही | म्हणून मी आत्मा आहे अशी भावना धरावी | सिध्द=स्वरुपाच्या ठिकाणी देहच नाही तर संदेह कोठचा ? सिध्द नेहमी नि:संदेही असतो|
||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक ६ वा [देव शोधनाचा ]
समर्थ म्हणतात - निर्गुण परमात्म्याची ओळख ज्याला असते तो संत | ज्ञाताचा अनुग्रह घ्यावा म्हणजे सत्संग करावा| धान्य टाकून जसे भूस खाता येत नाही तसे ब्रम्ह्म ज्ञाना खेरीज इतर उपदेश व्यर्थ होतात| जेवढे नामरुपात्मक आहे तो सर्व भ्रम होय | पॉच भूते व ३ गुण अशी ही अष्ट्धा प्रक्रुति व तीलाच द्रुष्य असे म्हणतात | ब्रह्म द्रुष्याहुन निराळे आहे| निर्गुण ब्रह्म तेवढे शाश्वत आहे| गुरु मुखाने ऐकल्यास ह्याची उमज पडते व जे असाध्य असत त्याला साध्य करता येत | अध्यात्म श्रवणाने ते परब्रह्म प्राप्त होते ते अव्यक्त आहे | देहाचा अर्थात सर्व तत्वाचा पसारा आहे | त्या एकुण तत्वांचा लय केल्या असतां शिल्लक असा सारभूत आत्माच राहतो | देह बुध्दिने बांधला तो विवेकाने मोकळा केला आणि तो देहा वेगळा झाला की मोक्ष पदाला प्राप्त करतो | निर्गुण आत्मा व आपण एकच असे झाले की हा विवेक नेहमी जाग्रुत ठेवावा | स्वत:लाच अर्पण करावे म्हणजे मी पणा जातो ह्यालाच आत्म निवेदन म्हणतात | प्रथम आत्म नात्म विवेकाचे [अध्यात्म] श्रवण करावे नंतर सदगुरु चरणाची सेवा करावी आणी मग सदगुरु क्रुपेच्या प्रसादाने आत्मनिवेदन होते | संत संगतिच्या योगाने मुख्य देवाची ओळख झाली की देवा भक्तांच ऐक्य होते व संसाराची ओढाताण संपते |

समर्थ म्हणतात - माया ब्रह्माच निरुपण सांगताना ते म्हणतात.. ज्या प्रमाणे पर ब्रह्म हे अचळ व अढळ असते | जीव जो पर्यन्त तत्वात गुन्तलेला आहे तो पर्यन्त को ऽ हं [ मी कोण] म्हणतो | तोच विवेक करुन देहाहंता सुटली की सो ऽ हं , निर्गुण ब्रह्म परमात्मा मीच असे म्हणतो | ब्रह्म निर्गुण व निराकार अन् माया सगुण व साकार आहे | माया नाश पावते , ब्रह्म नाश पावत नाही |

एकंदरीत दासबोधाचा पूर्ण प्रवास देहबुध्दि सोडून माणसांने आत्मबुध्दि कडे वळाव असा आहे | मायेचा प्रकार असा विचित्र आहे की ज्या वेळेस ती सिध्दांना साधते तेव्हा ती आदी माता असते व बध्दांना गर्ततेत नेते | तेव्हा ती माया [भ्रम] असते | माया असार व ब्रह्म सार आहे|
सृष्टि कथन सांगताना म्हणतात -- तिर्थाचे ठिकाणी, ब्रह्म वृंदाच्या समुदायात तत्व चर्चा चालते [ व त्या चर्चेत तत्व शोध होऊन शंकराचे दर्शन होते] |गीतेत भगवंतानी जे सांगितले त्याचा भावार्थ न कळल्याने जीवाला व्यर्थ वाईट वाटते| देह बुध्दि ने [अहंकाराने] होणारा वाद्विवाद उपयोगाचा नाही | म्हणून वाद विवाद टाकुन ब्रह्माचा आनंद स्वतःला येईल असा संवाद करावा | आप आपल्या क्रुत कर्मानुसार आपणांस बरी वाईट फ़ळे मिळतात | पण देवाच्या खुणा त्या वेगळ्याच असतात म्हणून सृष्टि खरे वाटणे हा मायेचा भ्रम आहे | आठ सृष्टिं मधे खरी कोणती? ती नाशीवंत आहे म्हणून तीला जाणण्याचा प्रयत्न करावा व आणी सगुणाची च भक्ति , उपासना करावी | सगुण उपासने च्या मार्गाचे संरक्षण करावे|

श्री समर्थांना श्रोत्यांनी विचारल --? निर्गुणाने मोक्ष मिळतो असा अनुभव आहे | सगुण द्रुष्य नाशवंत आहे असे म्हणता व त्याचेच भजन करावे अस पण म्हणता | हे कस शक्य आहे? तेव्हा समर्थ म्हणाले------- गुरुच्या वचनांचा प्रतिपाळ करणे हे परमार्थाचे मुख्य लक्षण आहे | म्हणून गुरुआज्ञा शिरसावंद्य करुन सगुण भजन करावे | कारण आपल्या जीवनांतील रोजची शरीर धर्माची आवश्यक कार्ये कुठलीच सुटत नाही मग भजन कां सोडावे ?
समर्थांचे गुरु श्रीरामचन्द्र स्वतःच असल्याने ते म्हणतात -- त्या रघुनाथाचे आम्ही दास आहोत | त्यांची सेवा - उपासना केल्याने च आम्हास ब्रह्म ज्ञान प्राप्त झाले , अर्थात् उपासनेच्या योगाने आत्मज्ञानाचा लाभ होतो | हा अनुभव आम्हास आहे| कुठल ही कार्य करतांना "श्रीराम" "कर्ता" आहे , मी कोणी नाही हे सगुण निवेदन आहे हे लक्षांत घेणे | " मी कर्ता " असे म्हटले की कोणते ही कार्य मुळीच होत नाही | आपण म्हणजे माणूस दोन दीवसांचा व देव अनंत कालाचा आहे | अहं भावाने सर्व हानीच होणार | संत सज्जनांच्या अंतःकरणातील स्थिती अशी असते की ते देहाला उपासने ला लावुन देतांत आणि आपण विवेकाने अहंकार सोडून राममय होतात | तस आपल करण कठीण असल तरी अशक्य नाही , म्हणून प्रयत्न अवश्य करावा |

समर्थ सांगतात-- ह्या सृष्टित ज्ञानी - अज्ञानी, सभाग्य - अभाग्य, उत्तम-हीन असे अनेंको कोटींचे जीव आहेत | समर्थ अनिर्वाच्या च्या समाधाना बाबत सांगतात --- समाधान क्से आहे ? असे कोणाला विचार्ले तर त्याला सांगता येणार नाही | मुक्याने गुळ खाल्ला तर त्याची गोडी त्याला सांगता येणार नाही | तसेच समाधानचे असते | शब्दा मुळे अर्थ कळतो पण अर्थ पाहीला की शब्द व्यर्थ ठरतात | शब्दांनी दर्शविलेला अर्थ खरा असतो पण शब्द स्वतः मिथ्या असतात |

द्वैत भावा शिवाय अनुभव घेणे हे बोलणे व्यर्थ आहे |अनुभव घेवु लागले की अनुभविता [ अनुभव घेणारा ] अनुभाव्य [ज्याचा अनुभव घ्यायचा आहे ते] सदगुरु ] व अनुभव होणारा [आभास] अशी त्रिपुटी उत्पन्न होते आणी अद्वैताच्या ठिकाणी द्वैत सुध्दा शिल्लक राहत नाही|म्हणून अनिर्वाच्य न सांगता येण्या सारखे आहे |ब्रह्म एक व आपण एक असा भिन्न भाव असता तर अनुभवाचा विचार सांगता आला असता |अनुभव आला असे वाटणे हे ही खरोखर भ्रमरुप स्वप्नच होय| खरी जाग्रुति ह्याच्या पलीकडे च आहे |ती सांगता येत नाही कारण , तिथे विवेकाची ग्रहण शक्ति कुंठीत होते |म्हणून समाधान बोलून दाखविता येत नाही |निःशब्दाची म्हणजे परब्रह्माची खुण अशी आहे |समाधान हे बोलताच येत नाही |ते अनिर्वाच्य न बोलता येण्या सारखे आहे|
||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक ७ वां....
बटव्याला जशी कडसणी - दोरी- असते त्या प्रमाणे भेदाला माया असते |ती माया रुप दोरी ज्यांच्या क्रुपेने पूर्ण पणे तुटून जाते ,|अश्या सदगुरुनाथांना जीवां शिवांचे ऐक होऊन देह ,बुध्दि, भेदभावना सोड्रून नमस्कार करतो |संसार हेच एक मोठे स्वप्न आहे |त्यात सापडलेले लोक लोभा मुळे बरळतात |जेंव्हा जागे होतात तेव्हा जीवन स्वप्न संपण्याची वेळ आलेली असते |
सर्व विद्यां मधे अध्यात्म विद्येचा विचार श्रेष्ट आहे |असे भगवद् गीतेत सांगीतलेल आहे |
आंधळ्याला डोळे नसल्या मुळे द्रव्याचा ठेवा जसा प्राप्त होत नाही तसेच ज्याला परमार्थाच्या ज्ञानाचे डोळे नाहीत त्यास अध्यात्माचा अर्थ कळावयचा नाही |अंगणात परीस सांपडला या मोठा गुण देणारी वेल विहिरीत सापडली की जस अवश्य घ्यावा |तसच प्राक्रुत भाषे मधील सुलभ घ्यावे |जे व्युत्पत्ती शिकुन कळणार नाही ते सतसंगतीने कळते |फ़ळाचे जसे साली टरफ़ले टाकुन देऊन आंतील उत्तम रस घेतात त्या प्रमाणे भाषेचा विचार सोड्रून अर्थ ग्रहण करीत जावा |मौनाची भाषा ज्याची त्यालाच कळते |स्वानुभवाची खुण स्वानुभवीच पावतो |स्रुष्टि ची रचना व आपली कल्पना ती मायाच असते|

समर्थ म्हणतात == मायेचे भान तुटुन ब्रह्म ज्ञान प्राप्त होईल असे सांगतो---- ब्रह्म कसे आहे ?
ब्रह्म निर्गुण निरकार ,निःसंग ,निर्विकार असुन त्याला अंत नाही |ब्रह्म सर्वात व्यापुन, अनेका मधे एकत्वाने राहणारे व शाश्वत आहे |ब्रह्म हे अनंत स्थिर निर्विकल्प आहे |साधु क्रुपे शिवाय अनुभवाला येणार नाही |जे अत्यंत सूक्ष्म आहे, ते नामातीत आहे|
खजीने भरलेले आहेत पण ते कुलुपांत आहेत |जो पर्यन्त त्याची किल्ली सापडत नाही तोवर काय उपयोग ? तर ह्या परब्रह्म खजिन्याची किल्ली सदगुरुंची क्रुपा |तिच्या योगाने द्वैताचे दरवाजे एकदम उघडून बुध्दिवर आत्मज्ञानाचा प्रकाश पडतो |तेथील सुख अपरम्पार आहे |कुठली ही वासना नसून त्रुप्तीचे सुख आहे|देह बुध्दिची संगती सोडली तर त्याची प्राप्ती तत्काळ होते |

आपला मी पणा व जीव पणा म्हणजेच अज्ञान हा संग सोडला की नि:संग जे परब्रह्म आहे त्याच्याशी ऐक्य होते |मी कोण ? हे न समजणे ह्याचे नांव अज्ञान |म्हणून ही देह बुध्दि झडली तरच परमार्थ घडतो |नित्य विवेक जीवाला ब्रह्मा कडे ओढीत असतो व देह बुध्दि त्याला खाली ढकलते |म्हणून विवेकी माणसाने अध्यात्म श्रवण करुन देह बुध्दि टाकावी आणी सत्य ब्रह्मा मधे एकरुप व्हावे ||

१४ ब्रह्मांची लक्षणे

आता पर्यंत आपण ब्रह्म जाणल |आता ब्रह्म काय ते जाणून घेऊ |आधी खोटे पुढे ठेवावे , मग ते खोटे आहे म्हणून टाकुन द्यावे| म्हणजे जे खरे असते तेच पुढे अंत:करणात ठसते |सिध्दांत कळण्या साठी १४ ब्रह्मांची लक्षणे सांगीतली आहेत |ते चौदा भ्रम आहेत व ते दूर करावेत |

[१] शब्द ब्रह्म |

[२] ओ [ ॐ ] इति एकाक्षर ब्रह्म |

[३] खं ब्रह्म |

[४] सर्व ब्रह्म |

[५] चैतन्य ब्रह्म |

[६] सत्ता ब्रह्म |

[७] साक्ष ब्रह्म |

[८] सगुण ब्रह्म |

[९] निर्गुण ब्रह्म |

[१०] वाच्य ब्रह्म |

[११] अनुभव ब्रह्म |

[१२] आनंद ब्रह्म |

[१३] तदाकार ब्रह्म |

[१४] अनिर्वाच्य ब्रह्म |

अशी ही १४ ब्रह्माची [भ्रमांची ] नांवे आहेत |त्यांचे विवरण पहा --[१] अनुभव शून्य शब्द ज्ञान म्हनजे "शब्द ब्रह्म "|

[२] ॐ असे एक अक्षर त्यास "एकाक्षर ब्रह्म" म्हणतात |

[३]खं शब्दाला आकाश ब्रह्म म्हणतात ||[ते शून्य असत ]

[४]मायेला पंच भूताच्या पसारयाला" सर्व ब्रह्म " म्हणतात |

[५] पंच भूतादिमायेला चेतना देणारे " चैतन्य ब्रह्म " म्हणतात|

[६]त्या चैतन्यावर ज्याची सत्त चालते ते " सत्ता ब्रह्म |

[७] त्या सत्तेला जे जाणणारे ते "साक्ष ब्रहम " |

[८] ज्या पासून साक्षित्व उत्पन्न होते ते सुध्दा गुणांत येते म्हणून त्यास " सगुण ब्रह्म "म्हणतात |
[९] जेथे गुणाची वार्ता नाही ते " निर्गुणब्रह्म "|
[१०] जे वाणी ने बोलता येते ते "वाच्य ब्रह्म" |
[११] अनुभव काय आहे ते सांगता येत नाही ते " अनुभव ब्रह्म" |
[१२] आनंद हा व्रुत्ति चा धर्म होय |आनंदाचा अनुभव " आनंद ब्रह्म "|
[१३] आनंद ही मनाची व्रुत्ति आहे |शुध्द ब्रह्म व्रुत्यातीत आहे |" तदाकार " म्हणजे ऐक्य होणे भिन्न नसणे |
[१४] अन् जेथे बोलणे सुटते [खुंटते] ते अनिर्वाच्य ब्रह्म होय | जे बोलुन दाखवता येत नाही |अशी ही चौदा ब्रह्मे अनुक्रमांकानी सांगीतली आहेत |

आता पुढे..
साधकाने विचार पूर्वक पाहतां त्यास भ्रम उत्पन्न होणार नाही |अन् उपाधि रहित जे ब्रह्म तीच सहज समाधि होय |त्या योगाने संसाराच्या अंतर्बाह्य आधि व्याधि नाहीशा होतात |नि:संगास भेटावयास गेले की भेटणारा ही नि:संग होतो|ब्रह्म काही एखाद्या पदार्था प्रमाणे नाही| की ते हातात धरुन देता येईल |ह्याचा अनुभव सदगुरु मुखानेच होतो |

आता पुढे..
स्वप्न जसे मिथ्या असुन निजलेल्यास खरे भासते |तसेच अज्ञानी जीवाला द्रुश्य मिथ्या असले तरी खरे भासते
|तेच जाग्रुति आली की आपोआप उमजी लागते |तसेच आत्म ज्ञानाच्या योगाने आपण जाग्रुतिचा अनुभव घ्यावा |पूर्ण जागे व्हावे |मग माया [खोट] काय आहे हे कळु लागत |श्रोत्यांनी विचार्ले ? एकीकडे ब्रह्मज्ञान अंत:करणांत प्रकाश पावते आणि दूसरी कडे माया ही प्रत्यक्ष दीसते |आता हे द्वैत कशाने नाहीसे होईल ? तर समर्थ म्हणतात -- माणसांच्या चार अवस्था असतात
[१] जाग्रुति |
[२] स्वप्न |
[३] सुषुप्ति |
[४] तुर्या अवस्था |
ब्रह्म व माया ह्या दोन्हीस ही जाणणारी तुर्या अवस्था असते |म्हणून सर्व साक्षिणी म्हणतात |त्या अवस्थेत माणसाला पोहोचल्यावर ब्रह्म व मायेचा भेद कळतो |
अहं व्रुत्ति शून्य झाल्यावर जे अनुभवाचे ज्ञान होते तेच पूर्ण समाधान होय |सदगुरु मुखाने अध्यात्माचे श्रवण , मनन , व निदिध्यास केल्यास समाधान होते व मिथ्या कल्पनेचा अंत होतो |

शुध्द ब्रह्मा चा निश्चल झाला की , कल्पनेवर विजय प्राप्त होतो |सूर्या च्या अस्ता नंतर अंधकार जसा वाढतो तसेच आत्मनिश्चय ढळला की द्वैत प्रबळ होते |तसेच ज्ञान मलिन झाले की अज्ञान प्रबळ होते |ह्या साठी अध्यात्माचे श्रवण करावे |अध्यात्म श्रवणाने ब्रह्मरुप व्हावे आणी पुन्हा देह व्रुत्तिवर यावे |असे हे येणे जाणे नित्य लागले आहे |अश्यात संसार सुटत नसल्या मुळे परमार्थ नीट होत नाही व परमार्थाची थोडी-गोडी लागल्याने संसारात मन लागत नाही |अशा ओढा ताणीत सर्व जन्म जातो |

मुक्तांचे प्रकार

निरुपण म्हटले की त्यात सार काय व असार काय ह्याचा विचार सांगावा लागतो |म्हणून बोलणे चालणे करीत असतां ही सदगुरु च्या उपदेशाने सायुज्य मुक्ति प्राप्त होते |मुक्तांचे २ प्रकार आहेत |

[१] मुक्त |

[२] नित्य मुक्त |

[१] पहिल्या मुक्त चे २ प्रकार

[अ] जीवन मुक्त [ब] विदेह मुक्त|

सचेतन म्हणजे देहानी शुध्द असलेले देहाचे व्यवहार करीत असलेले परन्तु मुक्त झालेले ते जीवनमुक्त असतात |ह्या दोघांहुन निराळे असे योगीश्वर नित्यमुक्त असतात |ज्यांचा भोग संपला व पुन्हा ते कोणत्या ही निमित्ताने जन्मास येत नाहीत , ज्याचा मी पणा सुटला तो मुका राहीला कींवा बोलला तरी मुक्तच होय |जो परम शुध्द तत्ववेत्ता आहे त्याला मुक्तता-बध्दता दोन्ही नाहीत |ज्यास आत्मज्ञान झाले ते सर्व मुक्तच होतात |शुध्द ज्ञान झाल्या मुळे मुक्तपणाची कल्पना सुध्दा उरत नाही |

पुढे समर्थ सांगतात----मुक्त झाल्यावर जीवाने कोणत्या रितीने रहावे हे ऐका|परब्रह्म वस्तुची कल्पना करायला जावे तर ती मुळचीच कल्पनातीत आहे |चित्त भ्रमित असल्याने त्याची ओळख पटत नाही |जो निर्गुण म्हणजे अद्रुश्य असल्याने जो अचिन्त्य आहे तोच परम पुरुष होय | विवेका वाचून शून्यत्व [ अज्ञान] व संशय ह्यात गुरफ़टुन रहावे लागते |म्हणून विवेक धरावा , अध्यात्म ज्ञानाने प्रपंचाचा त्याग करुन अहंभाव सोडून द्यावा| मनाला कल्पना करण्याचीव कल्पने म्ध्ये येईल तेवढे खरे मानण्याची सवय आहे |त्या प्रमाणे मन , ब्रह्मा ची पण कल्पना करण्याचा प्रयत्न करत व उणी पडत |मग उणी पणा मुळे संशय उभा ठाकतो |म्हणून संत संगति ने संशय अमूळ टाकून द्यावा व परमात्म्याची प्राप्ती करुन घ्यावी| मग उणी पणा मुळे संशय उभा ठाकतो | म्हणुन संत संगति ने संशय समूळ टाकून द्यावा व परमात्म्या ची प्राप्ति करुन घ्यावी |कारण मी पणा मुळे ब्रह्मा चे आकलन होत नाही |

आता पुढे..

मी पणा कोणालाच सहन होत नाही |मग तो भगवंताला कसा सहन होणार ? म्हणून जो मी पणा सोडून वागतो तोच समाधानी असतो |म्हणून जो मी पणा खोटा आहे अस समजुन टाकुन द्यावा व स्वतः ब्रह्म स्वरुप होऊन अनुभव घ्यावा अर्थात संग टाकुन निःसंग घेऊन समाधानी होतो | निर्वीकल्प ब्रह्माची कल्पना करावी पण ही कल्पना करणारा मी आहे असा विचार करु नयेत| असा मी पणा चा त्याग करावा |ह्या ब्रह्म विद्येच्या खेळात आत्मरुपाने राहून देहबुध्दि ने राहू नये |जो दक्ष व समाधानी असेल त्यालाच हे कळेल |

परमार्थाचे साधन श्रवण

पुढे समर्थ परमार्थाचे साधन सांगतात ते म्हणतात श्रवणाने भक्ति प्राप्त होते, विरक्ति येते व विष्यांची आसक्ति तुटते |चित्ताची शुध्दि होते आत्मबुध्दि द्रुढ होते |अहंकार अंत पावतो |श्रवण भक्ति ही समर्थांची आवडती भक्ति| श्रवणाने निश्चय येतो , ममता मोडते , शंका मोडते , वाईट गुण असल्यास त्यात बदल होतो व समाधान प्राप्त होत |श्रवणाने कार्य सिध्दीस जात |सत्संग मिळाला व त्यावर श्रवण घडले म्हणजे निरुपण कळु लागते व आपण तदाकार होतो |संसार रुपी नदीच्या प्रवाह्य मध्ये श्रवणाने च आपण तरुन जातो |नवविधा भक्ति व चतुर्विधा मुक्ति किंवा सहज स्थिती श्रवणाने च साध्य होते |ब्रह्मज्ञान ही श्रवणा शिवाय कळत नाही |जो दुर्बुध्दि व दुरात्मा असतात ते सुध्दा अध्यात्म श्रवणाने पुण्यात्मा होतात |श्रवणाचा तत्व निर्णय कळला तरच भाग्य व संपत्ति उदयास येते |अर्थाला सावध असणे ह्यालाच मनन म्हणतात |मननाच्या निदीध्यासा ने च समाधान प्राप्त होते |श्रवण नसेल तर पूर्वि केलेल साधन सुध्दा वाया जात |म्हणून श्रवणाला महत्व आहे व श्रवण व मनन पुन्हा-पुन्हा करीत रहावे |आळसा ने श्रवणा चा आदर न केल्याने नाश होतो |आळसा ने मनुष्याल स्वहिताला मूकतो |म्हणून ज्याच्या योगाने संशय जाऊन शंकेचे निरसन होईल असे परमार्थ विषयक अद्वैताचे ग्रन्थ परमार्थी जनांनी श्रवण करीत रहावे |जो मोक्षाचा अधिकारी असतो तो परमार्थाचा मार्ग धरतो आणी अंतः करणांत अद्वैत ग्रंथाची आवड असते |ज्याची जी उपासना असेल त्याचीच प्रिती त्याला वाटते |आत्मज्ञानी माणसाला सारासार विचार सांगीतला तरच रुचतो |ज्या ग्रंथाच्या परिशीलनाने किवा श्रवणाने परमार्थ बुध्दि वाढते | अंगात विरक्ति येते, भक्ति व साधना करणे आवडते त्यास ग्रन्थ म्हणावे |जो ग्रन्थ ऐकताच गर्व नाहीसा होतो |भ्रान्ति लय पावते , मन एकदम भगवंता कडे जडते ज्याच्या श्रवणाने उपरति होते | अवगुण पालटतात , अधोगति चुकते त्याला ग्रन्थ म्हणतात |ज्याच्या योगाने धैर्य येते , परोपकार घडतो , विषय वासना नाहीशी होते त्याला ग्रन्थ म्हणावे |

आता पुढे..

पक्षी अनेंक फ़ळे खातात आणि त्यातच त्रुस असतात |पण चकोर पक्ष्यांच्या मनांत अम्रुताचा ध्यास असतो |तसेच संसारी माणूस संसाराची इच्छा करतात |परमार्थ ग्रंथा शिवाय बाकिचा गोंधळ व्यर्थ होय |ज्ञानाचे शरीर मिथ्या मानल्या मुळे ते निर्विकार असते |देहाचा शेवट चांगला झाला देह सुखाने सुटला तो धन्य होय असे अज्ञानी लोक म्हणतात |जीवंत असतांना काही सार्थक न केल्याने सर्व आयुष्य फ़ुकट जाते |लोक द्रुष्ट्या चांगल्या प्रकारचे मरण आले तरी भक्ति केली नसल्या मुळे अधोगतिच होते |जे जीवन मुक्त ज्ञानी आहेत त्यांचे शरीर रानांत पडले कींवा स्मशानांत तरी ते धन्य होय |देह क्षण भंगुर आहे असे जाणून सदगुरुंच्या चित्ताचा संतोष करावा | ज्याला सदगुरु सेवा घडेल - जो सदगुरु भजन करील तोच धन्य |सदगुरु वाचून दूसर काही समाधान नाही |जो साधक ह्या ग्रंथातील विवेकाचे मनन करून पाहील त्याला आत्मज्ञानाचा एक निश्चय सांपडेलच |

||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक आठवां...

||श्रीराम जय राम जय जय राम||
दशक आठवां...

अनेंक शास्त्र धुंडीत बसले तर आयुष्य पुरणार नाही पण अंतःकरणाने संशयाचे दुखणे वाढते |ह्या स्रुष्टित पुष्कळ देव आहेत |त्यांची मोजणी कोण करणार ज्याची ज्या ठिकाणी इच्छा पूर्ण होते तो तेथेच मन लावतो |जीव स्रुष्टित व तिन्ही लोक ज्याने निर्माण केले त्याचे नांव देव |हे सर्व ज्याने निर्माण केले तोच निराकार आहे| सिनेमाच्या खेळा प्रमाणे जसे चित्र मोठी व प्रत्यक्ष स्रुष्टि रचना प्रमाणेच हुबेहुब दिसतात त्या चित्रांची सुत्रे चालवणारा सुत्रधार वेगळाच असतो |त्या प्रमाणे स्रुष्टि उत्पन्न करणारा जो देव आहे तो स्रुष्टि रुप नाही| अविद्ये मुळे मायाभ्रम सत्य वाटते |म्हणून जग मिथ्या व आत्मा ब्रह्म सत्य आहे |देव निर्मळ व निश्चळ आहे शाश्वत ब्रह्म च्या जागी मायेचा मिथ्या भास होतो |असत एक व दिसत दूसरच |दोरी असून सर्प भासतो |निर्गुणाने माया केली अस म्हणाव तर तो सम्पूर्ण देखावाच आहे |माया मिथ्या म्हणजेच ती काही नाही मग तेथे निर्गुणाने केले असे म्हणणे हे ही अत्यंत अदभूतच |

आता पुढे..पंचभूते म्हणजे काय ?
कल्पने मुळे स्वप्न दीसते |भास आहे म्हणून जगाचा भास उत्पन्न होतो |द्रुष्या वाचून द्रुष्टांत संगता येत नाही |भगवंताची करणी अदभुत् आहे |
अविद्येची उपाधि ज्याला आहे तो "जीव" असतो व ब्रह्मांडा च्या उपाधि ज्याला आहे तो "शिव" आहे व मूळ मायेची ब्रह्मांडा ची उपाधी ज्याला आहे तो "देव" असतो |आकाश निश्चळ असतां त्यात चंचळ वायु जसा उत्पन्न होतो अगदी तशीच मूळ माया उत्पन्न होते |वायु ला आकार

आला म्हणून आकाश फ़ाटल अस कधीच होत नाही |तसेच मूळ माया उत्पन्न झाली तरी ब्रह्माचा निर्गुण पणा जसा आहे तसाच असतो |वायु खरा म्हणा तर दाखविता येत नाही |त्याच्या कडे पहावे तर नुसती धुळच दिसते |त्या प्रमाणे मूळ माया भासते पण ती दीसत नाही |पंचभूते म्हणजे काय ? जड व कठिन म्हणून जे जे आहे ते ते प्रुथ्वि आहे |आणी म्रुदु व ओले असेल ते " आप" [पाणी] होय |जे जे उष्ण व तेज युक्त असेल ते "तेज" असत |चैतन्य व चंचळ आहे तो "वायु" आहे |आणि जे शून्य व निश्चल आहे ते "आकाश" होय |अशी ही पांचभूते असतात |ह्यात वायु विवरण असे___ "प्राण वायु" चे स्थान ह्रदय आहे |अष्ट प्रहरांत [२१६००] इतके ह्याचे श्वासोत्सवास होतात |"आपान" वायुचे स्थान "गुद" शारीरिक धर्म क्रिया हा करतो |"उदान" वायु चे स्थान कंठ आहे अन्न जल आदि व स्वप्न दशादि भाग हा करतो "व्यान" वायु सर्वांगात आहे |"समान वायु चे स्थान "नाभि" आहे |हा अन्न रस सर्व शरीरात पोहोचवतो |

आता पुढे..
आकाशाच्या आंगी ७ गुण असतात्त |
[१] काम|
[२] क्रोध|
[३] मोह|
[४] शोक|
[५] भय|
[६] अज्ञान|
[७] शून्यत्व|
असा स्वभाव धर्म आहे |कांच बसवलेली जमीन व पाणी हे शहाण्या माणसाला जस उमजत पण तेच अज्ञानी व ह्रदयशून्य माणूस त्या शून्यालाच म्हणजे आकाशालाच ब्रह्म म्हणतो|
एकदा श्रोत्यांनी विचारल ? सत्संगाचे महत्व काय? सत्संग धरल्यावर किती दिवसाने मोक्ष प्राप्त होतो ? तेव्हा समर्थ सांगतात_ मनाला लागलेल्या ओढण्या तोडून निरुपण ऐकावे |सावधान पणे ऐकुन प्रत्यैक क्षणा चा सदुपयोग करावा व आयुष्याचे सार्थक करावे |दुर्लक्ष झाल्च तर पुन्हा श्रवण कराव अर्थातच सार मनन केल्या शिवाय उगाच श्रवण करतो तो श्रोता नव्हे|नुसता दगड असतो | येथे दगड म्हटल तर श्रोत्यांना राग येईल |म्हणुन दगडक्सा आहे ते ऐका ! दगडाला टाकीने घडवुन नीट नेटका ठेवला व केव्हा ही पाहीले तरी तो घडलेला जसा होता तसाच असतो |दगडाला टांकीने कापर उअडवला तर तो पुन्हा लागत नाही , पण माणसांची दुर्बुध्दि म्हणजे _एकदा सांगुन दुर्गुण गेला तरी तो पुन्हा लागतोच |म्हणून माणसा पेक्षा दगड गोटा जास्त चांगला |दुश्चितपणा मुळे सदक्रुत्य न घडून निरुपण भक्ति व्यर्थ जाते |आळसा मुळे नित्यनेम राहतो , परमार्थ साधना बुडते , धैर्य जावुन व्रुत्ति मलिन होते , विचार शक्ति संपते |

आता पुढे..
बुध्दि वाचून परमात्म वस्तुची प्राप्ति होत नाही |बुध्दि व विश्वास ही दोन्ही असल की देहाभिमान नाश पावतो |देहाभिमानाचा शेवट झाला की परमात्म वस्तुची प्राप्ति सहज गतीने होते |अश्या प्रकारे संतसंगति ने मोक्ष मिळण्यास वेळ लागत नाही |दुर्गुणांचा त्याग घडावा म्हणून प्रसंगी न्याय पणे व योग्य असेल तेच निष्ठुर शब्दांत बोलावे लागते त्याचा राग धरु नये |
बध्द म्हणजे बांधलेला व मोक्ष म्हणजे मोकळा झालेला |"प्राणि" हा मी जीव आहे अशा विचारांनी बांधलेला असतो| म्हणून तो बध्द म्हणवतो |त्याला संत संगति ने विवेक घडून मुक्तता प्राप्त होते | ज्या प्रमाणे कोसला [रेशम चा कीडा] आपल्या भोवति घर बांधुन आपल्याला कोंडून मारतो |त्या प्रमाणे अज्ञानांत गुरफ़टलेल्या प्राण्यास परमेश्वर स्वरुपाचे ज्ञान कळत नाही |हा नरदेह अति दुर्लभ आहे म्हणून ह्या ठिकाणी गुरु हा नावाडी असून तो स्वयंभू असे आत्मसुख प्राप्त करुन देतो |
म्हणून समर्थ सांगतात देह बुध्दि सोडून आत्म बुध्दि कडे वळण्याचा प्रयत्न करावा|
देहासह सर्व चराचर जग पंचभूतात्मक असे उत्पन्न झाले |ह्या जगाचा पसारा आपापल्या प्रक्रुति धर्मा प्रमाणे चालत असतो |

आता पिन्ड ब्रह्माण्ड रचना ऐका ---
आता पिन्ड ब्रह्माण्ड रचना ऐका ---
[१] स्थुळ , सूक्ष्म , कारण , महाकारण |
हे ४ देह |
[२] जाग्रुति , स्वप्न , सुषुप्ति , तुर्या |
हे ४ अवस्था|
[३] विश्व , तेजस , प्राज्ञ , प्रत्यगात्मा |
हे ४ अभिमानी आत्मे |
[४] नेत्र , कंठ , ह्रदय , मूर्धा |
हे ४ स्थाने |
[५] स्थूल , प्रविविक्त , वासनारुप , आनंद अथवा आनंदाचा भास |
हे ४ भोग |
[६] अ ,उ ,म् , अर्धमात्रा |
हे ४ मात्रा |
[७] तम , रज , सत्व , शुध्द सत्व |
हे ४ गुण |
[८] क्रिया ,द्रव्य , इच्छा ,ज्ञान |

हे ४ शक्ति अशी ही ३२ तत्वे आहेत |
स्थूल देहाची २५ व सूक्ष्म देहाची २५ मिळून ५० होतात व ३२ + ५० = ८२ होतात | ह्याच मधे २ तत्वे ज्ञान व अज्ञान आहेत |
एकंदर ही ८२ तत्वांची ही पिंड रचना आहे |आत्मा ह्या तत्वांची साक्षि असून त्यातत्वांहुन तो विलक्षण म्हणजे निराळा आहे |

आता पुढे..
परमात्मा निर्गुण , निराकार , अनंत अपार व नित्य निरंतर जसाचा तसाच आहे तो सर्वात व्यापक असून अनेंकात एक आहे | तो भक्ति ने प्राप्त होतो | नवविधा भक्ति मधे आत्म निवेदन ही भक्ति सगळांत श्रेष्ट होय | कारण कोणति ही भक्ति [८ पैकी] केली तरी जो पर्यन्त आत्म निवेदन नाही करत तो पर्यन्त कर्तुत्वाला साफ़ल्य नाही | आत्म निवेदनाच्या अनुभवाने अहंभाव नाहीसा होतो | स्वत:ला परमेश्वर चरणी अर्पण करावे | स्वत:ला तेथे कीन करावे | असे आत्मनिवेदन असते | आत्म निवेदनाचे स्वरुप असे आहे | सर्व प्रथम "मी कोण" ह्याचा विचार करावा | नंतर निर्गून परमात्म्याची ओळख करुन घ्यावी | अशाप्रकारे देवाच्या भक्तांचा विचार केला म्हणजे आत्मनिवेदन होते | देवाहुन तो विभक्त नाही म्हणून त्याला भक्त म्हणायचे तसेच कोणते बंधन नाही म्हणून मुक्त म्हणायचे | आत्म निवेदनाच्या शेवटी जी अभेद भक्ति घडत्ते तिलाच सायुज्यमुक्ति म्हणतात | नदी समुद्रात मिळाली की तिला वेगळी करता येत नाही | त्या प्रमाणे भगवद् स्वरुपांत जो लीन झाला त्याला मग वेगळा करता येत नाही | तो भक्त देवरुप होतो | देव आणि भक्त दोघे एक रुपच आहेत | हा विवेक ज्याला उमजला तोच मोक्षदायक होय |

आता पुढे..
अंत काळाचे वेळी जशी बुध्दि असते तशीच गति मिळते " अन्ते मति साः गति "| सदगुरुंचा अनुग्रह झाला की चारी देहांचा अंत होतो | मी जीव हा भ्रम नाहीसा होतो | सदगुरु वचन जो अंत होतो | मी जीव हा भ्रम नाहीसा होतो | सदगुरु वचन जो अंत:करणांत ठसवुन घेतो व एकदां ऐकल्याचेच पुन्हा:पुन्हा: [ आदर पूर्वक ] श्रवण करतिओ तोच मोक्षाचा अधिकारी होय |
सिध्दांच्या लक्षणांत समर्थ सांगतात _ निरंतर आत्म स्वरुपाचे चिंतन करण हे साधुचे लक्षण असते | त्याचा देह जनांत वागतो पण जनांहुन वेगळा असतो | स्वरुपाकडे एकदा द्रुष्टि पोहोचली की संसाराची काळजी संपुन जाते व मग निरुपण ऐकण्याची ममता लागते | बाह्यतः साधका प्रमाणे वागुन अंत:करणांत अखंड ब्रह्म स्वरुप असणे सिध्दांचे लक्षण होय | ब्रह्म स्वरुपां कडे एकदां व्रुत्ति लागली म्हणजे ती स्वरुप मयच होते | स्वरुपाच्या ठिकाणी समरस झाल्यावर मग त्याचा देह ऐके ठीकाणी पडून राहीला वा उठुन चालला तरी तो चळत नाही | बाहेर वाटेल तशी स्थिती असली तरी अंत:करण ब्रह्म स्वरुपांत च लीन असते | ऐरवी नुसता अभ्यास करुन ती लक्षणे हाती लागावयाची

नाहीत |ह्या साठी खरोखर ब्रह्म स्वरुपा मध्ये रहावे लागते |सर्वत्र आपण आनंदमय भरलेला आहे मग गर्व कशाचा ?

||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक नववां ==

दशक नववां == परब्रह्म स्वरुप हे सर्वाहुन श्रेष्ट आहे |ते पाहू गेले असतां आपण तेच आहोत |पण सदगुरु केल्याने हे आपल्याला अनुभवाने कळून येते |आता विवेकाच्या सामर्थ्या ने मौनाचा भंग होऊ नये |सर्व काही करुन काहीच न केल्या सारखे व्हावे व ब्रह्म स्थितीत असून अहंभावाने काहीच नसावे |आत्म ज्ञानाची संपत्ती नाही आणी अज्ञान रुप दरिद्र्या मुळे कोरड्या शब्द ज्ञानाने मनुष्य भोगलेल्याच विपत्ती सदा सर्वदा भोगतो |स्वतः जो अनुभवी असेल त्याला दूसरा कोण अनुभवी आहे हे कळेल |दूसरया चा अलिप्त पणा पाहून अलिप्ततास आनंद होतो |दूसरा विदेही पाहताच विदेहाचे देहभान नाहीसे होते |ब्रह्ममय झाले ला साधु कसा असतो? देहा कडून पाहाल तर त्याचा देह म्हणजे त्याच्या देहाचे व्यवहार दिसतील |पण त्याचे अंत:करण मात्र वेगळे |भर दोन प्रहरी सूर्यावर थुंकल्यास तो थुंक आपल्याच वर पडतो, सूर्याला त्याचे काय ? तसेच दूसरयाचे बरे वाईट चिंतावे तसे आपणांस घडते |त्याप्रमाणे ज्ञानी हा सत्य म्हणजे परब्रह्म स्वरुप असतो आणि जो त्याला मनुष्य रुप समजतो तो अज्ञानी होय |देव ही मनाच्या भावा प्रमाणेच फ़ळ देणारा असतो |

आता पुढे..

प्रुथ्वि मध्ये अनेंक लोक आहेत त्यात कोणी सामर्थ्यवान , तर कोणी दुबळे , कोणी निर्मळ तर कोणी घाणेरडे असे असतात |ते कां? कित्येक जण राजे , कित्येक दरिद्र्य , कित्येकांची स्थिती उत्तम असते |कित्येक नीचातले नीच असतात |असे कोणत्या कारणाने होते ? तेंव्हा समर्थ म्हणाले -- हे सगळे गुणांचे खेळ असतात गुणवान पुरुष वैभव भोगतात आणि अवगुणी दरिद्र्य भोगतांत ह्यात संशय नाही |जाणता असतो तो उद्योग करतो नेणता असतो असतो तो काही च करत नाही |विद्ये वाचून मनुष्य करंटा असतो व विद्या शिकल्यास भाग्यवान होतो |जशी विद्या असते त्या प्रकार ची माणसाची इच्छा होते , व जसा उद्योग करतो तसे वैभव मिळवतो |जेथे विद्या वैभव नाही तेथे निर्मळ पणा कोठुन असणार ? गुण नसेल तर कोणत्या ही प्राण्याचा जन्म व्यर्थ होय |गुण नसेल तर गौरव सामर्थ्य , महत्व , कुशलता , तर्क ह्या पैकी काहीही प्राप्त होणार नाही | म्हणून उत्तम गुण असणे हेच भाग्याचे लक्षण होय |

आता पुढे..

प्रपंच म्हणा किंवा परमार्थ म्हणा , ह्या दोघांत ही जाणता असतो तोच समर्थ होतो |नेणते पणाने प्राणि फ़सतो |नेणते पणा मुळे शत्रु पराभव करतात , संकटे ओढवतात फ़डशा उडतो व जीवनाश होतो |आपले स्वतः चे कल्याण कशांत आहे हे लोकांस कळत नाही म्हणून ते यातना भोगतात

म्हणून जाणणे [ज्ञान] हे सामान्य समजू नये |ज्ञान झाल्यास मनुष्य सर्वमान्य होतो |काहीच कळत नसेल तर सगळी कडे अपमान होतो |सर्व काही जाणून जो विचार करतो तो मुक्त असतो | अनुभवा वाचून बोलणे सगळेच कंटाळवाणे असते |पंचभूतांचे हे एक ब्रह्मांड आहे आणि पिंड ही पंचभूतांचे हे एक ब्रह्मांड आहे आणि पिंड ही पंच भूतात्मक्च आहे |अनुमानाचे जेवढे बोलणे असेल तेच निश्चयात्मक म्हणजे खरे समजावे |

आता पुढे..

आकाश जसे निराकार आहे तशीच ब्रह्माची गोष्ट आहे |आकाशांत जसा वायुचा विकार तशीच ब्रह्मा मधे मूळ माया उत्पन्न होते |आतां |

आतां मूळमायेतच , जाणीव हा सत्वगुण , नेणीव हा तमोगुण , जाणीव - नेणीव मिळून रजोगुण अस असत |

Anonymous - Nov 28, 2010

मूळ माया

मूळ माया ही वायु रुप असते |थोडासा पण गुणांचा विकार झाला की त्याला गुण माया - गुण क्षोभिणी - म्हणतात |जाणीव म्हणजे जाणते पणाचे चळण |तेच वायुचे स्वरुप होय |सारांश हा की प्रयत्ना वाचून कार्य झाले , जेवल्या वाचून पोट भरले कींवा ज्ञाना वाचून मुक्ति मिळाली असे कधी घडत नाही |जो जो स्वतः जेवलेला असतो त्याला सर्वलोक त्रुप्त झाले अस वाटत |तशी त्रुप्ती सर्वांची झाली पाहीजे |त्या प्रमाणे ज्यांना ज्यांना जितपत ज्ञान झाले असेल ते ते तितपत तरले | दूसरयाची तळमळ ज्याला समजत नाही त्या मनुष्याला पर दुःख शीतळ होय |त्यातलाच हा ही एक अनुभव समजावा| ज्याला आत्म ज्ञान झाले आहे व एकुण एक तत्वांचा विचार करुन ज्याला स्व स्वरुपाची खूण पटली आहे |त्यालाच समाधान प्राप्त होते |म्हणून सिध्दांत हा की ज्याला आत्मज्ञान झाले तो तेवढाच मुक्त असतो |ज्ञानी हा ज्ञानाने मुक्त होतो व अज्ञानी हा आपल्या कल्पनेने बांधला जातो |काहीच कळत नाही ते अज्ञान व सर्व कळते ते ज्ञान [जाणीव] | जाणीवेचा अभिमान नाहीसा झाला की विज्ञान म्हणजे अनुभव जन्य ज्ञान प्राप्त होण व प्राणी स्वतः आत्मरुप होतो |अमुतपान करुन जो अमर होतो त्यानेच म्हणावे की लोकांना म्रुत्यु कसा येतो ?

आता पुढे..

जो जेवुन त्रुप्त झाला आहे , त्याला भुकेलेल्या माणसाची तळमळ अनुभवास येणार नाही |ज्ञानाने मोक्ष प्राप्ति होते व विवेकाने अंतःकरणांत स्वरुप स्थिती बाणते |वासना व्रुत्ति ही प्राणरुप आहे | पंच प्राण जेव्हा आपापली स्थाने सोडतात त्या वेळी वासने सह प्राण देह सोडून जातात |त्याला

आपण मरण म्हणतो |मनाच्या अनेंक व्रुत्ति आहेत |त्यात वासना जन्म घेते |वासनां पाहूं गेले असतां दिसत नाही , पण आहे|

बुध्दि वाढवावी तसतसा बुध्दिचा प्रकाश अंत:करणांत पडत जातो |सांगरांत खस-खस तसे परब्रह्मी हे द्रुश्य ब्रह्मांड आहे|बुध्दि जर विशाल केली तर आकाशाचे [ ब्रह्मांडाचे] आकलन कसे लागते | भ्रमाने आपण लहान झालो व केवळ देहधारी बनलो मग त्या बुध्दि ला ब्रह्मांडा चे आकलन कसे होईल? विवेकाने अनुमान नाहीसे होऊन समाधान होते व आत्म निवेदन होऊन मोक्ष प्राप्त होतो | बहिरंग साधनां पेक्षां अंर्तनिष्ट होण्यातच व निर्गुण ब्रह्मानुभव घेण्यांत च जन्माची खरी सफ़लता आहे |

स्थिती निरुपण...

देवळाच्या आंत देव असतो व देवळावर कावळा येवुन बसला म्हणून त्या कवळ्याला थोर म्हणावयाचे नाही |ब्राह्मण भेदाभेद पाहतो व माशी सर्वत्र अभेद भावाने विचरण करते म्हनून तिला आत्म ज्ञान झाले असतर नसत |बाहेरचा देखावा किती ही केला तरी तो सगळा लोकीकी होय ह्या ठीकाणी मुख्य एक अंतर्निष्टा पाहीजे |तात्पर्य लौकिक चांगला संपादन केला व अंत:करणांत सावध पणा ठेविला नाही व तेणे करुन मुख्य देवाला चुकला तर आत्मघातकी होय |देवाचे भजन केले असतां देवलोक प्राप्त होतो| पितरांची भक्ति केली असतां पित्रु लोक प्राप्त होतो |भूतांची भक्ति व पूजा केली असतां भूत लोक प्राप्त होतो |जो ज्याला भजेल तो त्या लोकाला जाईल |निरगुणांचे भजन केले असतां स्वत: निरगुणच होतो |निरगुणाचे भजन करण्यांत निरगुणाच्या ठिकाणी स्वत:ला अनन्य म्हणजे एकरुप व्हावे लागते |अनन्य झाल्यास निश्चयात्मक धन्य व्हाल |विचार केला असतां देव निराकार आहे व आपण देह बुध्दि धारण केलेला जीव मिथ्या आहे |देह पाहिला तर पांचाभूतांचा आहे |जीव पाहीला तर ब्रह्मांचा अंश आहे व परमात्मा पहावयाचा तर अनन्य पणाचा शोध घ्यावा |वरचे वर पाहिले तर मी पण दिसते| पण नीट शोध केला तर मी पण मिथ्या असून तत्वाने तत्वाचा निरास झाला म्हणजे पुढे शुध्द आत्माच उरतो |आत्मा आत्मपणाने आहे , जीव ही जीव पणाने आहे व माया ही माया पणाने विस्तारलेली आहे| असे हे सगळे च आहेत | आणि आपण ही कोणी एक आहोत ; पण ह्या सगळ्याचा शोध नीट घेऊन पाहिल तोच ज्ञानी असतो |

||श्रीराम जय राम जय जय राम||

दशक दहावा...

दशक दहावा...

श्रोत्यांनी समर्थांना प्रश्न केला ? सर्वांचे अंत:करण एक आहे की ती निरनिराळी आहेत ? तेव्हा समर्थ म्हणाले - सर्वांचे अंत:करण एकच आहे हा अगदी पक्का निश्चय आहे |तेव्हा श्रोत्यांनी

विचारले- की सर्वांचे अंत:करण एक आहे तर एकाचे अंत:करण दूसरयाला कां नाही मिळत ? एक जेवला की सगळे त्रुप्त व्हावे , एकाचे समाधान झाले की सर्वांचे समाधान व्हावे |एक मेला की सर्व मरावे | असे झाले पाहिजे | एक सुखी व एक दु:खी दिसतो असे द्रुष्टीस पडते , मग सर्वांचे अंत:करण एक कशावरुन म्हणावे |

अंत:करण म्हणजे जाणीव

तेव्हा समर्थ उत्तर देतात-- अंत:करण म्हणजे जाणीव व जाणीव म्हणजे जाणता [समजणारा] स्वभाव | ह्या जाणते पणाच्या कलेच्या योगानेच देहाचे संरक्षण करतां येते | जस सांप समजुन उमजुन चावायला येतो व प्राणि पळतो तो ही समजुन च अर्थात दोन्ही कडे जाणीव असते हे विचार करुन पहावे | दोन्ही कडे जाणीव द्रुष्टीस पडली तर जाणीव रुपाने अंत:करण एकच आहे असे अनुभवास येत | द्रुष्टिचे देखणे जिभेचे चाखणे ,ऐकणे हुन्गणे , स्पर्श करणे , वास घेणे सर्वांना मिळून जाणीव कळा एकच आहे |

सर्वांनाच पाणी थंड असते ,अग्नि हा सर्वांनाच सारखाच दाहक असतो त्या प्रमाणे सर्वांना अंत:करण हीच एक जाणीव असते| आवड नावड उत्पन्न झाली ती देह स्वभावा मुळे झाली , परंतु जे कळते ते अंत:करणां मुळे कळते | तात्पर्य सर्वांचे अंत:करण जाणीव एक आहे हे पक्क, ह्याचा अनुभव चोहो कडे येतो | कमी किंवा जास्त काही तरी - प्रमाणांत प्राणी अंत:करणांनेच जाणतात | कोठे कमी कोठे जास्त असते | परन्तु नमूना एकच कोणता ही सजीव प्राणी जाणीवे वांचून नाही | जाणीवेने सुख मिळते व नेणीवेने दु:ख होते | जाणीव -नेणीव ह्या मिश्रणाची बुध्दि ती देहा मधला ब्रह्मदेव होय |

आता पुढे..

देव-देवता -दैवते-भूते ही जगां मध्येअसंख्य आहेत परंतु त्या सर्वांनाच वायुरुप म्हणतात | आकाशा पासून वायू झाला | झाला तो मुख्य दोन प्रकारचा - एक प्रकार सर्वत्र वाहणारा दूसरा प्रकार वायू मधील जगज्योति हा होय | वायू चे विकार पुष्कळ आहेत | आता तेजाचे रुप व दैदिप्यमान असा सूर्य व सर्व भक्षक अग्नि आणि बीज ही तीन उत्पन्न झाली | शीतल तेजा पासून आप [पाणी] अम्रुत चंद्र तारा बर्फ़ [थंडी-सीत-शीत ] उत्पन्न झाल | तेजाचे प्रकार पुष्कळ असले तरी मुख्य प्रकार दोनच | आपाचे ही पाणी आणि अमूत असे दोन प्रकार सांगीतलेत | अता प्रुथ्वि चा विचार ऐका_ पहीला पाषाण व माती हा नेहमी चा प्रकार व दूसरा म्हणजे सोने , परीस व अनेंक रत्ने ही असतात |

पुढे समर्थ सांगतात _ ब्रह्माच्या ठिकाणी मूळमाया झाली तिलाच [सुक्ष्म] अष्टधा प्रक्रुति म्हणतात | ती मूळमाया वायूरुप असून वायूमध्ये जाणीवेचे रुप आहे | ही जाणीव च इच्छा केंव्हा संकल्प होय | ईश्वर गुणरुप होऊन त्याचेच तीन भेद झाले त्या ठिकाणी ब्रह्मा-विष्णू-महेश उत्पन्न झालेत |

प्रथमच वायू स्वरुपानेच ब्रह्मा,विष्णू,महेश ह्यांनी देह धारण केले व पुढे त्यांचे मुल नातू असा विस्तार झाला |

आता पुढे..
ब्रह्म देवांनी अनेंक प्रकारच्या प्राण्यांची कल्पना केली आणि हे उत्पन्न व्हावे अशी इच्छा केल्या बरोबर ते उत्पन्न झाले |[१] पाण्या पासून किंवा घामा पासून झाले त्यांना "स्वेदज" असे म्हणतात |[२] वायूपासून उत्पन्न झाले त्यांना "उदभिज" म्हणतात |माणसांची गारुडी विद्या , राक्षसांची मायवी विद्या त्या प्रमाणे ब्रह्मदेवाने निर्माण केले आणि वेद सांगून त्यांना मार्गाला लावले |अश्या प्रकारे ब्रह्मदेवाने सर्व निर्माण केले| सगळे प्राणि जन जे उत्पन्न झाले ते विष्णू ने जाणीवेच्या मूळ स्वरुपाने पाळले |दुष्टांचासंहार करुन धर्म स्थापना करण्या साठी विष्णूला वेळोवेळी जन्म घेऊन अनेंक अवतार धारण करावे लागतात |आतां प्राणि जे जन्माला येतांत त्यांचा नेणते पणाने संहार होतो |अशा प्रकारे मूळरुपच त्यांचा नाश करितो |

आता पुढे..
पिंडा मधे दोन प्रळय आहेत |एक निद्रा व दूसर मरण [देहाचा अंतकाळ ] |पिंडात दोन व ब्रह्मांडात दोन मिळून चार प्रळय आहोत |पांचवा प्रळय विवेकाचा होय |असे हे पांच प्रळय अनुक्रमाने सांगीतले |पहीला__ निद्रा जेव्हां देहांत प्रवेश करते , तेव्हा जागे पणांचा व्यापार बंद पडतो |मग एका एकी गाढ झोप लागते कींवा स्वप्न पडते |अशा प्रकारे जाग्रुती चा नाश होणे ह्यास निद्रा प्रळय म्हणतात |दूसर __ देहा मध्ये रोग वाढ्तात किंवा कठिन प्रसंग गुदरतो |त्या मुळे पंच प्राण आपले व्यापार सोडतात| तेव्हा नुसते शरीर राहते |हा दूसरा प्रळय असतो |ह्याला म्रुत्यु प्रळय म्हणतात |तिसरा प्रळय असा ______ ब्रह्मदेव निजला म्हणजे ह्या म्रुत्यु लोकाचा नाश होतो व प्राणि मात्रांचा व्यापार बंद पडतो |त्या वेळी प्राण्यांचे सूक्ष्म अंश वायुचक्रांत राहतात | नंतर काही काळ गेल्यावर ब्रह्मदेव पुन्हा जागे होतात |नंतर पुन्हा स्रुष्टि रचायला लागतात | अस्ताव्यस्त झालेले जीव पुन्हा पूर्ववत करतात |चौथा - प्रक्रुति असतानांच नित्यानित्य विवेक करुन ब्र्ह्म-प्रक्रुति पळयाचा अनुभव घेणे ह्याला विवेक -प्रळय म्हणतात |

आता पुढे..
उत्पत्ति स्थिती आणी संहार ह्यांचा व्यवहार कसा होतो ते सांगीतल |इतके होत असतांना पण परमात्मा जसाच्या तसाच निर्गुण व निराकार असतो |परब्रह्म हे आदि मध्ये व अंती सारखे भरलेले च आहे |परब्रह्म हे सर्वकाळ आहेच आहे |हा मायेचा भ्रम उत्पन्न होतो |मध्यतंरी असतो व शेवटी लय पावतो |

आता पुढे..

आता समर्थ म्हणतात _ जाणत्याचे लक्षण म्हणजे - जाणते भ्रमाहुन अलिप्त असतात | एक परब्रह्म सर्वत्र भरलेले आहेत | त्याला कधीच काही विकार होत नाही | त्याच्या शिवाय जे भासत तो सर्व भ्रम असतो | दूर देशांत हिंडत असतांना आपली दिशाभूल होते किंवा जिव्हाळ्याच्या माणसांची ओळख विसरली जाते ह्याचे नांव भ्रम | निर्गुण ब्रह्मा खेरीज सर्व काही भ्रम रुप आहे | ज्ञानी मनुष्याला संसार नाही असे अनेंक लोक म्हणतात आणि होऊन गेलेल्या ज्ञानाचे चमत्कार सांगतात हा भ्रम असतो |

ज्ञानी संत व भगवंताचे अवतार इत्यादि ज्या सारासार विचारानें मुक्त झाले त्यांचे सामर्थ्य कोणत्या प्रकाराने चालते ?

तेंव्हा समर्थ म्हणाले _ ज्ञानी तर मुक्त होऊन जातात आणि पाठीमागे त्यांचे सामर्थ्य चालत असते परन्तु ते वासना रहित असतात | जीवंत असतांना ही संतांचे किती चमत्कार जनांत पसरतात , तर हा भाविक लोकांच्या विश्वासाचा भाग आहे | तरी ही लोकांची निष्ठा ,श्रध्दा असते | भाविकांना देव खराच असतो | स्वप्नांत येणारे पदार्थ आपली कल्पना असते | ज्ञानी मुक्त होऊन गेले तरी ते पुण्य मार्गाने चालल्या मुळे त्यांची इच्छा नसतांना ही त्यांचे सामर्थ्य त्यांच्या मागे सहजच चालते| ह्या साठी त्यांच्या प्रमाणे आपण ही पुण्य मार्गाने चालावे | देवाचे भजन वाढवावे , न्यायाने वागावे | एक सदगुरु किवा एक देव ह्या दोघों पैकी ऐके ठिकाणी कोठे तरी भाव- अचळ- विश्वास - ठेवावा | निर्गुणाचे ज्ञान झाले म्हणून सगुणा कडे दुर्लक्ष करु नये | निष्काम बुध्दि ने केलेल्या भजनाला - निष्काम भक्तिला तैंलोक्यात दूसरी उपमा नाही | सामर्थ्या वाचून निष्काम भजन घडत नाही | कामनेने केलेल्या भजनाने फ़ळ मिळते पण निष्काम भजनाने भगवंत प्राप्त होतो | देवा जवळ अनेंक फ़ळ आहेत | फ़ळाची आशा धरली तर भगवान दुरावतो | म्हणून निष्काम भक्ति नें भजन करावे | ज्या परमार्थात भ्रष्टाचार घडत नाही तो परमार्थ लपत नाही व आत्म निश्चयाचे समाधान प्राप्त होते | नित्य सारासार विचार करीत रहावे | म्हणजे बुध्दि पालटत नाही | म्हणून सगुण भजन त्यांत विशेष ब्रह्मज्ञान आणि त्यावर अनुभवाचे समाधान असा योग फ़ार दुर्मिळ असतो |

Anonymous - Dec 19, 2010

सामर्थ्य साधनाच्या प्राप्तिचे वर्म-------


सामर्थ्य साधनाच्या प्राप्तिचे वर्म-------

आतां अनुभव घेईल तो शहाणा | घोडा किंवा शस्त्र नीट चालवुन पहावे व परिक्षेस नीट उतर्ले तर मग जाणत्याने घ्यावे तसच अनुभव आल्यास निरुपण ऐकावे | केवळ अनुमानाने काम करण मूर्खपणा असतो | शोध केल्या शिवाय जेजे करावे ते ते व्यर्थ असत | त्यांत कष्ट भोगावे लागतात | खोट्या चा विश्वास धरण मूर्खपणा असतो | अहंकारा पाई जीव जाणत्याशी गर्व करतो व स्वतः नेणता असल्या मुळे बुडतो | ह्यात घात कोणाचा ? पापाचे खंडण झाले जन्म म्रुत्यु च्या यातना चुकल्या असा स्वतः ला अनुभव आला म्हणजे ठीक|परमेश्वराचे स्वरुप ओळखिले आपण कोण ते

कळून आत्म निवेदन झाले म्हणजे जीवनाचे सार्थक होते |अज्ञानाने परमात्म्याचे स्वरुप कळत नाही , ह्यांत विशेष असत अस काही नाही |हे सर्वोत्तमा [श्रीरामा] हे तूं यथार्थ जाणतोसच |तुला मी काय सांगणार ?
वायू मध्ये जो जाणीवेचा गुण आहे तेच ईश्वराचे स्वरुप असत |त्या पासून पुढे तीन गुण त्रिगुण झालेत |त्या त्रिगुणां मध्ये सत्वगुण हे निव्वळ जाणीवेचे रुप स्वतः विषणूने घेतले |त्याच्या अंशाने जग चालते असे भगवद गीतेत सांगीतले आहे |एकच जाणीव सर्वत्र वाटली गेली आहे | प्रत्यैक प्राण्यांत तिचा अंश असून शरीराचे रक्षण जाणते पणाने तीच करते |तिचे नांव जगज्योति | प्रत्यैक प्राणी तिच्या योगानेच जीवंत असतो |जगांतला कोणता ही प्राणी घेतलात तरी त्याच्या आंगी नेहमी जाणीव खेळत असते |जाणीवे मुळे देह पळवितात व त्या मुळे वाचतांत |सगळ्या जगाला वांचविते म्हणून तिला जगज्योति नांव आहे |ती निघुन गेली म्हणजे प्राणि जेथल्या तेथे मरून पडतो|



Anonymous - Dec 31, 2010
आता पुढे..
आत्म ज्ञानाचा अभ्यास केला म्हणजे सर्व कर्माचे खण्डण होते |ज्ञानां वाचून कर्मपाश सुटत नाही व ज्ञान सदगुरु वाचूंन होत नाही हे वर्म आहे |म्हणून सदगुरु करावा नीYॅट शोध करुन , सत्संग धरावा आणि अंतःकरणांत तत्व विचाराचे विवरण करावे |




Anonymous - Jan 2, 2011
अंतरात्मा आणि ब्रह्मनिरुपणा
एकंदर तत्वाचे निरसन झाले म्हणजे आपला आपणच खरोखरी उरतो ,आणि अनन्य भावाने सहजच सार्थकता होते |निरुपणाच्या योगाने अध्यात्म साधकांना साक्षात्कार होतो |
जसा आकाशांत वायू उत्पन्न होतो त्या प्रमाणे निश्चळ ब्रह्माच्या ठिकाणी चलन , तीच आदि स्फुर्ती किंवा स्फुरण रुप ईच्छा असते |अहं रुपाने जी जाणीव उत्पन्न झाली तिलाच मूळ प्रक्रुति म्हणतात |ब्रह्मांडा चा महाकारण , कारण , सूक्ष्म व स्थूळ हे जसे पिंडातील चार देह आहे |तसेच मूळ प्रक्रुति , अव्याक्रुत , हिरण्यगर्भ व विराट असे चार ब्रह्मांडाचे देह आहेत |पिंडात चार व ब्रह्मांडात चार मिळून आठ देह असतात |सर्व लोकांच्या अंतरात राहणारा त्याला सर्वांतरात्मा

म्हणतात |हा अंतरात्माच चंद्र , सूर्य, तारे [नक्षत्रे] मंडळे भूमंडळे , मेघ मंडळे , एकवीस स्वर्ग , सप्तपाताळ इत्यादि सर्वांना चाळवितो |तो अंतरात्मा कसा आहे ह्याची ओळख हवी |अनेंक प्रकारचे खेळ त्याच्यात च चाललेले असतात |तो कळतो पण दिसत नाही |तो शरीरांत आहे पण एके ठिकाणी सापडत नाही |चंचळा मध्ये वायू पेक्षां अधिक आहे |कानांत बसुन शब्द ऐकतो |नाकाने वास घेतो |व स्पर्शेन्द्रियाने शितोष्ण जाणतो |अशा प्रकारे तो सर्व अंतर स्थिती जाणतो |तो सर्वा मध्ये असून सर्वांपेक्षा निराळा आहे |तो सर्व देहांना चाळवितो तरी त्याला अकर्ता म्हणतात | जगांत दोन पुरुष आहेत त्यांना क्षर व अक्षर म्हणतात |अविनाशी म्हणतात |उत्तम पुरुष आहे त्याहुन वेगळाच आहे |तो निष्प्रपंच , निष्कलंक ,निरंजन व निर्विकार असा एकमेव परमात्मा च आहे |चारी देहांचा निरास करुन , साधक देहातीत होऊन त्याशी अनन्य झाला म्हणजे तो अनन्य भक्त असतो |प्रत्यैक देहाचा निरास झाल्या नंतर ह्यात अंतरात्मा कसा राहील ? एक परब्रह्म तेवढे निश्चळ आहे |आणि चंचल पण |असार , अनित्य टाकून देऊन सार नित्य असे निश्चळ परब्रह्म घेतां यावे म्हणून सारासार विचार व नित्यानित्य विवेक ज्ञानी पहत असतात |



Anonymous - Jan 2, 2011
आता पुढे..
सत्या येवढे पुण्य नाही व असत्या येवढे पाप नाही |अनुभवा शिवाय कोठे समाधान नाही |अशा रितीने अनन्य होतांच नामातीत [नामरुपातीत] झाले |आपण स्वयमेव वस्तु [परब्रह्म] रुप आहोत |त्या रीतीने अनन्य होतांच नामातीत होतात |आपण स्वयमेव वस्तु परब्रह्म रुप आहोत त्या ठिकाणी देहाचा काही संबध नाही अशा विचाराच्या रितीने पातकाच्या राशीच्या राशी जळून जातात |ब्रह्मज्ञाना शिवाय जे जे साधन करावे त्याने कष्ट मात्र होतात |जो आत्म ज्ञानाचा नित्य विचार करतो त्याच्या पुण्याला मर्यादा नाही |त्याला होणारी पातकांची दुष्ट बाधा नाहीसी होते |आत्म द्रुष्टीने अनुभव पहावा |अनुभवा शिवाय सगळे दु:ख आहे
|ह्या स्तव श्रीराम क्रुपेने तुम्हाला निश्चयाला अनुभव होत राहतोच |म्हणून अनुभव घ्यावा |
|||श्रीराम जय राम जय जय राम||



Anonymous - Jan 3, 2011
दशक ११ वा ...

दशक ११ वा ...

आकाशा पासून वायू उत्पन्न होतो हा तर प्रत्यक्ष अनुभव आहे |वायूच्या कठिण घर्षणा मध्ये प्रखर अग्नि उत्पन्न झाला |वायू च्या उष्ण व शीतल दोन झळका आहेत |शीतळ वायू पासून शीतळ तेज म्हणजे पाणी निर्माण झाल |पाण्या पासून प्रुथ्वि झाली |ती अनेंक प्रकार ची बीज रुप आहे |प्रथम कल्पना उत्पन्न झाली ती मूळ माया , त्रिगुण रुप झाली ती गुणमाया व ती स्रुष्टि रुपाने जडपणाला आली ती अविद्या माया असते |जो हा कर्ता सगळ्या शरीरांत वागतो , सर्व कर्मास प्रव्रुत्त होतो पण "सर्व करुन अकर्ता " हा शब्द त्याला प्रयोग होतो |राजा रंक ब्रह्मदेव कोणी असो ह्या सर्वात जो एकटाच राहतो , इन्द्रिय द्वारा वावरतो , त्यास परमात्मा म्हणतात |तोच सकळ कर्ता आहे ही जाण सर्वाना आहे |देह वेगळे वेगळे दिसले तरी अंतरंग [अंतरात्मा ] एकच आहे|अशा प्रकारे सर्व प्राण्यांचा आत्मा एकच आहे |सर्वास वागवणारी शक्ति एकच आहे |तिला जगज्योति किंवा जाणती कळा असे नांव आहे |



Anonymous - Jan 3, 2011

जीव प्रकार 4

जीव चार प्रकार चे म्हटले आहेत ||[१] जाणणारा जीव "प्राण" असतो |[२] नेणता जीव तो "अज्ञानी" असतो |[३] जन्मणारा जीव "वासनात्मक" असतो |[४] जेथे पिंड ब्रह्मांड ही लय पावतात अशा ब्र्ह्माशी एक्य पावतो तो जीव "ब्रह्मांश" असतो |हे सगख़े जीव नाशीवंत आहेत | निश्चळ ब्रह्म हेच आरंभी व अंती शाश्वत सत्य राहणार |संत हे विवेक मार्गाने साधकास गुणातीत करतात |म्हणून श्रवणा पेक्षा "मनन" श्रेष्ट आहे |मननाने सारासार विचार कळतो |निदिध्यासाने नि:संग असे जे परब्रह्म आहे त्याचा साक्षात्कार होतो |निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी अनन्य म्हणजे एक रुप होणे ह्याचेच नांव "सायुज्य मुक्ति"आहे |द्रुष्य भासात्मक मायिक उपाधि असून ही स्वरुपाकारता पावणे हीच "सहज समाधि" असते |श्रवणाने अशा निश्चयाची बुध्दि होते |ह्या ब्रह्मांडात दोन प्रकार आहेत |एक निश्चळ व दूसर चंचळ |सगळा द्रुष्य पसारा चंचळात अडकलेला आहे |निश्चळ असते ते जसे च्या तसेच असते |ह्या निश्चळाचा विवेक पाहणारा लाखां मध्ये एखादाच असतो |

नित्या नित्य विवेक केल्याने मनुष्यास काहीतरी उमजत|काही थोड समजत , तरी ते नीट पटत नाही , थोडे मनांत उमजले तरी लक्षांत येत नाही |काही ज्ञान झाले तरी त्यात थोडा संशय उरतोच|तात्पर्य हे की जो पर्यन्त चंचळा चा जोर आहे तो पर्यन्त संशय अनुमान व भ्रम हे उत्पन्न होऊन व्यर्थ कष्ट होतात |जेवढे चंचळ रुपी आहे ती सर्व माया असते |आणि मायेचे सर्व

प्रकार नाशीवंत आहेत |अनेंक देवांची अवतारांत घडलेली चरित्रे कोणी लोक ऐकतात आणि त्या अवतारांचे जप , ध्यान , पूजा नेहमी करता |सर्वांचा एक असणारा अंतरात्मा विश्वात वावरणारा विश्वात्मा किंवा , द्रुष्टा , साक्षी, असा जो ज्ञानात्मा आहे त्याला देव मानतात |कोणी निर्मळ निश्चळ अश्या ब्रह्माला देव मानतात |तेव्हा तात्पर्य हे की अनेक प्रतिमांचे देव मानणे [१] प्रतिमाॅ पूजन अवतार चित्र मांडणे |[२] अवतारोपासना |अंतरात्मा मानणे म्हणजे [३] अंतरात्मा भजन आणि निर्वीकार ब्रह्म मानणे हे [४] निश्चळ ब्रह्मोपासना |अशा चार प्रकारानी लोक देवाची पूजा करतात | हे चार स्वभाव सिध्द आहेत |ह्या शिवाय कोठे ही देव नाही |सगळ्या जगांत एकच अंतरात्मा आहे , अस जे मानतात ते देवाला समजतात |



Anonymous - Jan 7, 2011


आता पुढे..[ प्रयत्न कोणता करावा ]

जो चंचळाचे ध्यान करील तो चंचळ च होईल |जो निश्चयाचे भजन करील तो निश्च्यळच होईल| माये प्रमाणे वागावे , परन्तु अंत:करणांत शाश्वत स्वरुपाची ओळख करून घ्यावी |सत्य अशी जी परब्रह्म वस्तु तद्रुप होऊन , लोकाचारा प्रमाणे ज्ञात्याने वागावे |अनेंक जन्माचा शेवट करणारा अकस्मात ह्या नरदेहा मध्ये न्याय व निती सांभाळून शुध्द मार्गाने वागावे |अनासक्ति ने व्यवहार करुन परमार्थाचा विवेक पाहात असावे |म्हणजे त्या योगे इह-पर लोक दोन्ही साधतात |आयुष्य ठरलेल आहे त्यात बाळ पण अज्ञानांत , तरुणपण विषयांत व म्हातारपणी रोग उत्पन्न होण्यांत जातो |अनेंक कठिण प्रसंग येऊन हा नर जन्म हां - हां म्हणतां निघुन जातो |घराला आग लागली असतां जो खुशाल निजतो तो शहाणा कसा? तो आत्म घातकी असतो |तेव्हा इहलोक परलोक दोन्ही ही साधतील असे करावे |उद्योग करतांना कष्ट होतांत पण पुढे सुख असते |आळसा मुळे खिन्नता येते व फ़जिती होते |म्हणून आळस नसावा |तरच समाधान होत |
[ प्रयत्न कोणता करावा ] म्हणून समर्थ सांगतात _ पहाटे - प्रात:काळी उठावे |काही पाठ करावे | परमेश्वराचे स्मरण यथाशक्ति करावे |नंतर शौचास जावे ,निर्मळ पाण्याने हातपाय धुवुन आचमन करावे |तोंड धुणे , प्रात:स्नान करणे संध्यातर्पण करणे देवपूजा करुन वैश्वदेव उपासना हे सर्व यथासांग करावे |मग काही काम धंधा ला जावे |गोड बोलुन सर्वांना राजी ठेवावे |आपल्या कार्यात दक्ष असावे |दुश्चितपणा करु नये |नाहीतर मग पश्चातापा ची वेळ येते |ह्या साठी मन स्थिर व व्यवहारांत सावध असावे |म्हणजे जेवण गोड लागते |[येथे मुलांनी लक्ष द्यावे की आपाअपल्या व्यवहारात सावध म्हणजे अभ्यासांत व आपले स्वत:चे काम करण्यांत लक्ष द्यावे अर्थात् कार्याच्या बाबतीत ज्याच्या जो कार्य भाग आहे त्यात त्याने सावधान असावे हा मुख्य भाग आहे|मुख्यत:

म्हणण्याचा उद्धेश्य हा की आपल कार्य व कर्तव्य ईमानदारी ने पार पाडावे त्यात हय गय करु नये |आळ्स केला तर वेळ निघुन जाते व मग त्रास होतो |



Anonymous - Jan 10, 2011
आता पुढे.. भाग्यवंताचे लक्षण
आता पुढे..
मग काही वाचावे , जाणत्यां बरोबर चर्चा करावी |एकांतात ग्रंथाच मनन कराव |निती ने वागल तरच मनुष्य शहाणा होतो |
भाग्यवंताचे लक्षण आतां ऐका |एक क्षण ही फुकट न जाऊ देता प्रपंचाच्या कामाचे ज्ञान जो नीट पाहतो |काहीतरी मिळवुन जेवतो |अडकलेल्या लोकांस बाहेर काढतो |अश्या रीतिने आपले शरीर परोपकाराच्या कामी थोडे तरी लावतो |धर्म चर्चा पुराण हरिकथा, निरुपण ही ऐकण्यांत व करण्यांत काही काळ घालवितो |ह्या प्रकारे प्रपंच किंवा परमार्थ ह्या पैंकी काहीतरी क्रुत्य केल्या शिवाय एक क्षण सुध्दा फुकट दवडीत नाही |असा जो दक्षता ठेवतो त्याला खेद कसचा ? विवेकाच्या बुध्दि ने त्याचा देह बुध्दि चा संबध तुटलेला असतो |आहे ते सर्व देवाचेच आहे अशा निश्चयाने वागल्याने उद्वेगाचे मूळ अजिबात तुटुन जाते |प्रपंचात द्रव्य पाहिजे व परमार्था मध्ये पंचीकरण ही दोन्ही साधून तत्वमस्यादि महावाक्याचे विवरण केल्याने प्राणि संसार बंधनांतुन पार पडतो , मुक्त होतो | तात्पर्य कर्म उपासना व ज्ञान ह्या योगे समाधान राहते |म्हणून परमार्थाचे साधन असेल तेच नेहमी ऐकत जावे |



Anonymous - Jan 12, 2011
आता पुढे..
ब्रह्म म्हणजे निराकार ,त्याचे स्वरुप आकाशा सारखे आहे |मात्र त्याला विकार नाही असे निर्विकार तेच ब्रह्म असत |चंचळ जेथे संपते व निश्चळ जेथे सुरु होते अशा संधीच्या ठिकाणी बुध्दि भांबावते |कर्म मार्गाचे विधि हे सर्व अलिकडचे आहेत |हे निर्विकारी ब्रह्म व हा विकारी अंतरात्मा देव ही दोन्ही एकच आहेत |असे जो म्हणेल तो बुध्दिवंत समजावा |विचार करुन खरा मार्ग असेल तोच धरावा विवेक हाच लाभ समजुन त्याची प्राप्ति करुन घ्यावी |रत्ने - गारा - गारगोटी एकच म्हटल्यावर रत्न पारख कशी होणार ? म्हणून परीक्षा करुन असार टाकावे व सार घ्यावे |जेथे

परीक्षा नाही तेथे दे घाव घे घाव [लठ्ठा - लठ्ठी] चालतात |सगळे सारखेच असेल हे मानणे मूर्खपणा असतो |घेण्या सारखे उचित घ्यावे न घेण्या सारखे अनुचित टाकून द्यावे |उंच नींच ओळखावे ,ह्याचे नांव ज्ञान |ह्या संसार रुपी बाजारांत आलेल्या पैकी कोणी परमार्था चा लाभ मिळवुन श्रीमंत होतात व कधी त्यांची फ़सवणूक होते |ह्यास्तव सार घ्यावे व असार चा वमना प्रमाणे त्याग करावा |ज्याने पूर्वि जसे वर्तन केले असेल त्याला तसेच फ़ळ प्राप्त होते |कोणी सुग्रास जेवण जेवते , कोणी नर्क सावडतात व दोघे ही आपापल्या संस्कारात्मक क्रुति चा अभिमान धरतात |म्हणून एकदा केलेले श्रवण विवेक जाग्रुति साठी , मनन पुन्हा - पुन्हा करावे |
समर्थ पुढे सांगतात _ पहीली मुख्य गोष्ट हरिकथा व निरुपण करणे , दूसरी राजकारण करणे , तिसरी सर्व गोष्टीन विषयी सावध पणा ठेवणे |चौथा उपाय अतिशय उद्योगी असणे |नाना प्रकार च्या शंका दूर कराव्या |अन्याय लहान असो मोठा असो क्षमा क्रीत जावे |दूसर्यांचे अंतःकरण [मनोगत] काय आहे ते ओळखावे |आपण नित्य अनासक्त असावे [ उदास व्रुत्ति ने रहावे ] व नीती न्यायांत अंतर पडू देऊं नये |संकेताने लोकांची मने आकर्षित करावी |



Anonymous - Jan 20, 2011
आता पुढे..
आता पुढे .....
सर्वांना उपदेश करावा| यथा शक्ति प्रपंच ही नीट करावा |प्रपंचातले अनेंक प्रसंग ओळखुन धैर्याने वागावे |परंतु त्या प्रपंचाचा अतिशय संबंध जडू देऊ नये |जे काम होण्या सारख नसेल ते महत्कार्य मोठ्या दीर्घ प्रयत्नाने करुन दाखवावे |पाठांतर पुष्कळ असावे |विचार सदैव जाग्रुत असावा |परोपकारांत तत्परता ठेवावी |आपण शांति ठेवावी दूसरयाला ठेवायला लावावी व आपण क्रिया करावी |दूसरया कडून करवावी |जो लोकांना सोशीत नाही त्याला पुष्कळ लोक अनुकूल होत नाहीत |पण फ़ारच सहनशीलता दाखवली तर आपल महत्व राहत नाही |राजकारण पुष्कळ केल तरी ते कुणालाच कळू देऊ नये |पण त्यात कुणाला पीडा देण्याचा हेतु नसावा |लोकांची परीक्षा करुन ठेवावी |कारस्थाने करुन त्यांचा अहंकार झाडून टाकावा आणि पुन्हा एक धाग्याने त्यांना एक करुन घ्यावे |वर्दळीवर येणारा तामसी असेल तर त्याला दूर ठेवावे |कुचर - कचरण [कामचुकार] असेल त्याच्याशी बोलु ही नये |अंतःकरण सावध व स्थिर असावे |म्हणजे राजकारण सुचते व समजते ही |
Anonymous - Jan 30, 2011
आता पुढे..


जे उन्नति च्या मार्गावर लागलेले असतील त्यांना सहाय्य करावे |आणि भांड खोर असतील त्यांना दूर करावे |उच्च भूमिकेचे असतील त्यांना पुढे आणावे |ज्याला न्यायाचे सांगीतले तरी पटत नाही व हितकारक असेल तेच आवडायचे नाही , अशाचा त्याग करण्या शिवाय मार्ग नाही | शुध्द व चांगले लिहावे लिहिल्या नंतर शुध्दाशुध्द तपासावे मग वाचावे व वाचण्यात वाचतांना चुका करु नये |कान्हा मात्रा व्यवस्थित काढाव्यात |लिहिण्याची ढब बळकट असावी |स्वत: अगोदर शिकुन जो दूसर्याला शिकवतो तो श्रेष्ट पदवीला चढतो |आणि विचार सामर्थ्याने अडचणितल्या लोकांस बाहेर काढतो |अक्षर ,वाचन , बोलणे , चालणे , भक्ति , ज्ञान , वैराग्य , ही सर्व तो उत्क्रुष्ट करुन दाखवितो |त्याला प्रयत्न करणेच आवडते |संकटा मधे कसे वागावयाचे त्याला कळते |उपाधि मध्ये कसे मिळुन जावे व स्वत:स अलिप्त पणाने कसे बाजुला राखावे हे त्याला कळते |जाणत्यांची महंती अशी असते |अनेंक लोक स्वतंत्र कार्य प्रवर्तक होतात असा तो सर्वज्ञ व सर्व करता पुरुष तोच महंत पणाला योग्य असतो |असा जो व्यापक बुध्दिचा पुरुष असतो तोच अनेंक जनांचा आश्रय असतो |रघुनाथाचे दास रामदास म्हण तात की त्याचा [धारणा शील पुरुषाचा ] गुण घ्यावा |



Anonymous - Jan 31, 2011

चंचळ माया


पुढे समर्थ सांगतात ........ चंचळ माया रुपी गंगा नदीचे रुपक सांगताना ते म्हणतात -- तुर्या अवस्थे चे मूळ जी जाणीव हीच ती चंचळ मायावी नदी असते |पण ती गुप्त आहे |पण तीचे स्मरण केले असतां ती सर्व जगाला पावन करते |हा प्रत्यक्ष अनुभव पाहून घ्यावा |माया नदी ही केवळ अचंचळ अशा ब्रह्माच्या ठिकाणी उत्पन्न झाली आणि खाली वाहात जोराने चालली आहे |ती खंड न पडता सारखी वाहत आहे |तिला ठिकठिकाणी अनेंक वळणे , बांक , भोवरे , उसळ्या , लहरी , झरे आहेत |ह्या नदीत कोणी ही वाहात जात असतात |कोणी भोवरयात सापडतात |बलवान [पुण्यवान ] निपजतात की ते प्रवाहांत वरवर पोहत जाऊन ऊगमाला [ब्रह्माला] जाऊन पोहोचतात व त्या उगमाच्या दर्शना मुळे ते पवित्र तिर्थ रुप [ ब्रह्मरुप] होतात |त्या ठिकाणी म्हणजे उगमा पाशी , मूळ मायेच्या ब्रह्म देवादिकांचे लोक असतात |त्या पाण्या सारखे निर्मळ व चंचळ दूसरे काही ही नाही |त्या पाण्याला "आपोनारायण " म्हणतात |



Anonymous - Feb 1, 2011
आता पुढे..
जीव रुपी अनंत पात्रांत हे पाणी भरलेले आहे कित्यैक भांड्यातुन ते पाझरुन जाते | एकां पात्रांत संगतीने ते कडू तर एकाच्या संगतीने गोड असते | एकाच्या संगतीने तुरट ,तिखट , खारट ,होते | उगमाच्या पलिकडे गेल्या नंतर तेथुन परतुन पाहिले तर पाणी [माया] सगळेच आटून जाऊन काहीच राहिले नाही | माया म्हणजे कल्पना किंवा व्रुत्ति | योगीश्वर व्रुत्ति शून्य कसे असतात ह्याचा विचार करावा |




Anonymous - Feb 2, 2011
चंचळ ते परब्रह्म
सर्व स्रुष्टिचा कर्ता व पोषण कर्ता परमात्मा असतो | त्यांच्या वाचून कोणते ही काम होत नाही | पडलेले पान सुध्दा हलत नाही , तो एकटाच सगळ्यां घटांत राहून भिन्न-भिन्न व्यवहार करतो |असा जो गुप्तेश्वर आहे त्यास च ईश्वर म्हणतात | तसे देह संगतीत नाना विषय भोगले मोठे ऐश्वर्य मिरवले पण देहाचा चालक ओळखला नाही तर सारे व्यर्थ असते | देहाच्या संगतीत प्राणि विषय भोगतात वागतात आणि ज्याने देह धारण केला त्या अंतरात्म्याला चुकतात | मूर्खास अंतर म्हणजे अंत:अथिती सांभाळता येत नाही| चंचळ अंतरात्म्याच्या योगाने निश्चळ परब्रह्म होतां येणार नाही | निश्चळ ते परब्रह्म पण चंचळ ते परब्रह्म नसत |एका तत्वात दूसरयाचा लय होऊन सर्व तत्वे नाहीशी होतात , तेंव्हा देहबुध्दि झडून जाते आणि चहू कडे निर्मळ निश्चळ व निरंजन असे स्वरुपच प्रचितीस येते | विवेकाचा पंथ धरावा विवेक बळाने दुस्तर संसार [भवनदी] तरुन जावे आणि हरिभक्ति करुन सारया कुळाचा वंशाचा उध्दार करावा | वंश म्हणजे मूळ माये पासून देहापर्यन्त चा सारा ब्रह्मवंश अर्थात सर्व कर्ता देव अंत:करणांत असून तो चंचळ आहे परब्रह्म त्याहुन वेगळे असते |हरिभक्ति सह विवेक करुन ब्रह्म प्राप्तिनें जन्म सार्थक करावे |



Anonymous - Feb 9, 2011
कर्म उपासना व ज्ञान

पुढे समर्थ म्हणतात -- कर्म उपासना व ज्ञान ह्या अनुक्रमाने पाहिल तर प्रथम कर्माशीच प्रसंग येतो |ते यथा सांग करावे | आरंभिलेले कर्मात ज्या ठिकाणी अंतर पडते तेथे हरि स्मरण करावे | ब्राह्मण स्नान संध्या करुन आल्यावर देव पुजेला बसतो आणि प्रतिमेच्या देवाची यथा सांग पुजा करतो | तो परमात्मा कसा आहे ? हे जरुर ओळखावे | ज्या प्रमाणे अधिकार्याला ओळखल्या नंतर नमस्कार करावा लागतो ,त्या प्रमाणे परमात्मा - परमेश्वर ची ओळख नीट विचार पूर्वक करुन घ्यावी , म्हणजे ह्या भ्रमाच्या सागराच्या पलिकडे जाता येईल | ज्याच्या प्रतिमेची पूजा करतात ते अवतारी देव व संत निजधामा ला गेलेले असतात , अर्थातच प्रतिमेच्या ठिकाणी अंतरात्मा संचार करुन पूजा घेतो| जे निजरुप तीच जगज्योति , तिलाच सत्वगुण किंवा जाणती कळा म्हणतात | ह्या जाणीव कळेच्या पोटात कोट्यावधि देव आहेत अनुभव घेऊन पहावा| देहरुप पुराचा जो ईश म्हणजे स्वामी त्याला "पुरुष" असे म्हणतात | त्याच प्रमाणे जगा मध्ये जगदीश असतो | देहांतला पुरुष जसा विवेकाने पहावा तसाच जगातला "पुरुष" असे म्हणतात | त्याच प्रमाणे जगा मध्ये जगदीश असतो | देहांतला पुरुष जसा विवेकाने पहावयाचा असतो तसाच जगांतला जगदीश ही विवेकाने ओळखावा | सांप्रत तो जगदीश जाणीव रुपाने जगांत राहून सगळ्या शरीरांचे व्यवहार चालवितो अशा प्रकारे अंत:करण रुप विष्णू आहे हे विवेकाने ओळखावे | कर्ता व भोक्ता तोच अंतरात्मा असतो | तोच विष्णु पण देह लोभाच्या अडथळ्या मुळे देहाच्या संबंधाने तो वेग-वेगळा अभिमान धरतो |चंचळाच्याठिकाणी हे त्रैलोक्य होते व नाश पावते | परब्रह्माचा चा विचार करुं गेले तर सार काय व असार काय ह्याचा निवाडा होतो | उत्पत्ति स्थिती व संहार ह्याहून निरंजन प्रब्रह्म अलिप्त आहे | त्याठिकाणी ज्ञान हे विज्ञान म्हणजे अनुभव रुप होते | त्या परब्रह्माशी विचाराने "तत्वमसि" महावाक्याच्या चिंतनाने अनन्य होणे , पाहणारा वेगळा न राहती अनुभव घेणे _ एकरुप होणे ही व्रुत्तिच आहे | ती ही व्रुत्ति टाकुन देऊन निव्रुत्ति पदाचा पूर्ण अनुभव घ्यावा |



Anonymous - Feb 9, 2011


आता पुढे..

मूर्ख माणस संकुचित असतात आणि चतुर हा व्यापक पणाने सर्वत्र पाहतात | खरोखर सर्व कर्ता व सर्व भोक्ता तोच असतो | त्याच्या शिवाय दूसरा कोण आहे ? अश्या प्रकारे महंताने वागावे | निरंतर एकांताचे सेवन करुन त्या एकांतात अभ्यास च करावा आणि लोकांसह वर्तमान काळ सार्थकी लावाला | उत्तम गुण असतील तेवढे आपण घ्यावे व नंतर तेच लोकांना शिकवावे | अनेंक लोकांना पारखावे व त्यांची योग्यता ओळखावी आणि योग्यता प्रमाणे त्यांस जवळ करावे | अधिकारा प्रमाणे लोकांच्या हातुन कार्य घडत असतात | अधिकार अंगी नसला तर व्यर्थ जाते हे लक्षांत आणून

अनेंक प्रकारांनी अंत:करणांची पारख करुन घ्यावी |अधिकार पाहून कार्य सांगावे |उद्योग शीलता पाहून विश्वास ठेवावा आणि आपल महत्व काहीतरी राखाव अर्थात निस्प्रुहाची वर्तणूक अंतरात्म्या प्रमाणे सर्वत्र असून कोठे ही न सांपडण्या सारखी अलिप्त पणाची असावी |
||श्रीराम जय राम जय जय राम||



Anonymous - Feb 11, 2011
दशक १२ ...
दशक १२ ...
समर्थ म्हणतात - अगोदर नीट प्रपंच करावा व मग परमार्थाचा विचार करावा |प्रपंच टाकून देऊन नुसत्या परमार्थाला तुम्ही लागाल तर तुम्हाला दु:ख होईल |प्रपंच व परमार्थ हे दोन्ही साधाल तर तुम्ही खरे विवे की |प्रपंच सोडून परमार्थ कोणी केला , तर त्यास खायला अन्न मिळणार नाही | परमार्थ सोडून प्रपंच कराल , तर तुम्हाला खायला अन्न मिळणार नाही |परमार्थ सोडून प्रपंच कराल तर यम यातना भोगाव्या लागतील |आणि त्या भोगतांना शेवटी तुला फ़ार फ़ार दु:ख होईल | संसारात असतांना च जो मुक्त आहे तोच खरा संयुक्त म्हणजे परमेश्वराशी ऐक्य पावला आहे | कारण युक्त काय व अयुक्त काय ह्याचा विचार [आत्मानुसंधान] तोच नित्य ठेऊ शकतो |अशा प्रकारे जो प्रपंचात सावधपणाने वागेल तोच परमार्थ करील आणि जो खोटा असतो तो प्रपंचात ही खोटाच असतो |ह्या स्तव प्रपंच व परमार्थ हे दोन्ही ही दक्षतेने चालवावे |



Anonymous - Feb 12, 2011
आता पुढे..
आता पुढे ...
पानावरची आळी पुढच्यापायाने चाचपुन पाहून सुरक्षित जागा आहे असे पाहून मग मागील पाय पुढे टाकण्या साठी उचलते आणि पुरुष होऊन भ्रमांत पडतात ह्याला काय म्हणावे ? ह्या साठी दूर्दर्शिता पणा असावा| नित्य विचार करावा व पुढे होणारया गोष्टी विषयी अगोदरच अनुमान करुन ठेवावे | जो दक्ष असतो तो सुखी असतो व बेसावध वागतो तो दु:खी होतो |सारासार विचाराने असारच होतो |त्याग व सार भूत ब्रह्म वस्तुंचा अंगीकार केला नाही तर मुत्यु सारखा महाप्रसंग पडला असतां सावरायला कोण येईल ? म्हणून दूर द्रुष्टिने वागणारया लोकांचा विचार पहात असावे |एकाचे

पाहूनच दूसरे लोक शहाणे होतात |सामान्य लोकांमध्ये अवगुण द्रुष्टिस पडले तरी त्यांकडे दुर्लक्ष करावे |शहाणे लोक ओळखावे |शहाणा माणूस दिसण्यांत सर्वांना सारखाच दिसतो , पण विचारशील अस्तो|कामाचे कोण व निकामी कोण हे ओळखून ठेवतो|प्रत्यैकाचे बरे वाईट गुण ओळखुन , सर्वांनाच जवळ करतो व प्रत्यैकाचा मान त्याच्या योग्यते प्रमाणे कसा ठेवावा हे त्यास कळते , अर्थातच प्रपंच आणि परमार्थात सावधपणा ठेवावा|




Anonymous - Feb 13, 2011

आता पुढे..

जन्म घेऊन संसाराला आलेल्या प्रापंचिक जीव हो अंतः रंगात अनेक प्रकारचे कल्पना तरंग उठत असतात |त्यांत वासना , कल्पनेच्या लहरी येतात |मनांतील हेतु असतो पण तसे काहीच घडून येत नाही |बरे करायला जावे तर अचानक वाईटच होते |कोणी दु:खी व कोणी सुखी असा प्रकार जगांत चालत असतो |बिन चुक प्रयत्न करतां येत नाही म्हणून केलेले काम यशस्वी होत नाही | काही केले तरी आपला दोष आपल्या ध्यानी येत नाही |ज्याला स्वतः चा दोष कळत नाही , त्यास दूसरयाचे मन काय कळणार ?

लोकांच्या मनातील हेतु समजत नाही , लोकांच्या मना सारखे वागतायेत नाही आणि मूर्खपणा मुळे अनेंक भांडणे होतात |दक्ष असेल त्याला शब्द परीक्षा ,अंतर परीक्षा , इत्यादि द्वारांनी काही तरी कळत |

लौकिक लक्षण ... जगांतला प्रकार पाहूं गेले तर दूसरयावर दोष ठेवून आपला कैवार घ्यावा असाच बहुतेक असतो |जेथे आपले पटत नाही तेथे माणसाला राहवत नाही |पण भीड तोडून जाववत ही नाही|जाचे बोलणे ,चालणे खरेपणाचे असते त्यास त्याला लहान मोठे सारखाच मान देत असतात |चंदन जो पर्यन्त झिजणार नाही तो पर्यन्त त्याचा सुगंध लोकांस कळणार नाही |पेरले असेल तेच उगवते किंवा उसने जे घेतले किंवा दीले असेल तेच द्यावे किंवा घ्यावे लागते |त्याच न्यायाने दूसरयाचे वर्म काढले तर त्याचे मन दु:खवते |जगामध्ये भले पणाने वागले तेर सुख वाढते |जसे उत्तर द्यावे तसे प्रत्युत्तर मिळ्ते तुमच्या भलेपणाची फ़ेड लोक तुमच्याशी भलेपणानी करतात |चिण - चिण करुन पक्षपतित्व केल्याने कलह माजतात |



Anonymous - Feb 13, 2011

आता पुढे..

भले पणाची ज्याच्या पाशी किंमत होत नाही अशा एखाद्या दुष्ट दूर्जनाशी गांठ पडली आणि न बोलताच त्या स्थळाचा त्याग करुन उठुन चालते व्हावे |लोक अनेंक परिक्षांत दूसरयाच्या अंत:करणाची परिक्षा कशी करावयाची हे काणत नाहीत |आपण एक दीवस मरणार आहोत व मागे सत्कीर्ती राहणे उत्तम म्हणून भलेपणा सांभाळावा |विवेकाचे काम फ़ार कठिण असते |


दूसरयाला बरे केले तर आपले ही बरे होते हा तर प्रत्यक्ष अनुभव आहे |पुष्कळ विद्या शिकला आणि प्रसंगी कर्त्यव्य व प्रसंगानुसार चुकणे वागख़े चुकत गेला तर त्या विद्येला काही ही महत्व नाही |

तात्पर्य हे की सन्मार्गाने वागुन जनी जनार्दनास संतुष्ट ठेवावे , मरणचे स्मरण असावे व भले पणाने वागावे |

Anonymous - Feb 14, 2011

पुढे समर्थ सांगतात--

पुढे समर्थ सांगतात-- माणसांनी इहलोक [प्रव्रुत्ति] परलोक [निव्रुत्ति] हे दोन्ही ही कसे साधतील ह्याचा नीट विचार करावा |इहलोकाचे सार्थक करण्या साठी जाणत्यांची संगति धरावी व पर्लोक प्राप्ति साठी सदगुरु चरण सेवावे |सदगुरुंना क्लाय विचारावे हे ही कित्येकास स्वभावत: कळत नाही |अनन्य भक्तिनें व एक निष्ठे दोन गोष्टी त्यास विचारावयाच्या असतात |त्या दोन गोष्टी कोणत्या तर एक " देव कोण आहे "? व दूसरी आपण [भक्त] कोण आहे ? ह्या असतात |ह्या दोन गोष्टींचे विवेचन पुन्हा -पुन्हा करीत रहावे |निश्चल [ब्रह्म] चंचळ [माया अंतरात्मा] व जड [द्रुश्य जगत] हा सर्व प्रकार मायावी आहे |शाश्वत ब्रह्म ह्याहून निराळे आहे |विकार [अहंस्फ़ूरण] नसेल तर अंतरात्मा कसा संभवेल ? निर्वीकार ब्रह्माच्या ठिकाणी प्रुथ्वी , आप , तेज , वायु , आकाश , [अंतरात्मा] पंचभूता पैकी काही एक किंवा विकार ह्या पैकी काहीही नाही |जे निर्विकार व निर्गुण आहे तेच शाश्वत परब्रह्माचे लक्षण असते |



Anonymous - Feb 16, 2011


देव कोण व आपण कोण

देव शाश्वत असून निर्गुण आहे ही देवाच्या स्व्रुपाची खूण अंत:करणांत बाणून्गेली आहे |म्हणून देहांतील एकुण तत्वाचा शोध केला पाहिजे|तिथे मी - तूं पणा ही मनोव्रुत्ति त्या ठिकाणी उत्पन्न होते| सगळ्यां देहाचा शोध घेतल्या असतां त्यांत मी - तू पणा कोठे ही दिसत नाही |कारण मी म्हणजे मी [पांचभूतांच एक तत्व] व तू म्हणजे [परमेश्वर एक तत्व] असे दोघे ही मिळून द्रुष्य पदार्थाचा लय होऊन दोन्ही तत्वांचा लय होतो |तेथे मी - तू पणा कोठुन राहणार ? तेथे केवळ

ब्रह्ममय स्थिती राहते |उरते ते फ़क्त तेवढेच सत्य |पंचीकरण , तत्व विवरण व महा वाक्य विचार ह्या तीन गोष्टी झाल्या की आपण वस्तुरुप व्हावयाचे |त्या साठी नि:संग पणाने आत्मनिवेदन केल पाहिजे |अश्या प्रकारे देव व भक्त ह्यांच्या मुळाचा शोध घेतला जातो| तेव्हा उपाधि रहित केवळ निरुपाधि आत्मा सर्वत्र आहे असे दिसते |तिथे सगळ्या व्रुत्तिंची निव्रुत्ति होऊन मनाचे उन्मन होते |विज्ञाना मधे ज्ञान मुरते ध्येया मधे ध्यान लीन होते |जे लोक पतीत पावन श्रीरामाचे दास होतात तेही जगाला पावन करतात , असा हा अनुभव आहे |सारासार हा की विचार करुन देव कोण व आपण कोण ह्याचा शोध घ्यावा |



Anonymous - Feb 16, 2011
पुढे समर्थ सांगतात--
समर्थ पुढे सांगतत-- एखाद्याला मोठे भाग्य प्राप्त झाले पण त्याचा उपभोग घेण्याचे माहीत नसेल तर ते प्राप्त होऊन ही उपयोग काय ? त्याच प्रमाणे वैराग्य उत्पन्न झाले पण विवेक नसल्याने व्यर्थ होते |विवेका शिवाय वैराग्य धारण केले तर अविवेकाच्या योगाने अनर्थ होतो |तेंव्हा ना इहलोक ना परलोक असा दोहीकडे तो सर्वस्वी वाया जातो |विवेकाला वैराग्याची जोड असेल तर काय बहार ती पहाव _ विवेकाच्या योगाने माणूस अंत:करणांत विकारा पासून मोकळा होतो आणि वैराग्य मुळे बाहेरच्या प्रपंचाचा संबध सुटतो |अशा प्रकारे तो अंत:र्बाह्य मोकळा होऊन नि:संग [निस्वार्थ] खरा योगी बनतो |त्या योगीच्या अंत:करणांत विवेक इतका जागा असतो की त्याचे भाषण ऐकाण्यास च तत्काळ सन्मार्ग लागतो |सन्मार्गाने वागून जगाशी तद्रुप झाला की जगदीश प्रसन्न झाला अस भासत |प्रखर [अचळ] वैराग्य सर्वकाळ अलिप्तता [उदासीनता] निर्लोभ [निर्दंभ व निद्वंदी] स्थिती अनुभवाचे मुरलेले ब्रह्म ज्ञान असून ही पुण्य मार्गाचे आचरण [सदाचार] |हे सर्व जेथे आहे तेथे विवेक व वैराग्य दोन्ही आहेत समजावे |विवेक युक्त वैराग्य असे असते |नुसत एक कल्लीपणाचे वेड असते ते वैराग्य नाही |



Anonymous - Feb 17, 2011
३ प्रकार च आत्मनिवेदन
इथे समर्थ ३ प्रकार च आत्मनिवेदन सांगतात ---- ते म्हणतात __ पिंड व ब्रह्मांड ह्यांची उभारणी किंवा संहारणी ह्या दोन्ही व्यतिरीक्त सारासार विचार करुन जे उरले ते विमळ ब्रह्म ज्ञान असत |

द्रुश्य पदार्थ जड आहेत |आत्मा चंचळ आहे |आणि विमळ ब्रह्म हे निश्चळ अहे |त्या निश्चळ ब्रम्हा चे विवरण करुन त्यांत विरुन जावे |



Anonymous - Feb 20, 2011
आता पुढे..
सारया पदार्था सह काया वाचा मने करुन मी हा सर्वस्वी देवाचा आहे अशी भावना करणे हा जड आत्मनिवेदनाचा भाग आहे |जगदीश हा कर्ता आहे प्रत्यैक प्राणि त्याचा अंश आहे |अशा प्रकारे त्याचा तोच सर्वत्र असल्या मुळे आपणाला म्हणजे मी पणाला ठिकाणच नाही |असे चंचळ आत्मनिवेदनाचे लक्षण सांगीतले परंतु हे चंचळ स्वप्नासारख़े क्षणिक असते |निश्च्ळ देव हा निराकार आहे |निश्चळ आत्मनिवेदनाचा प्रकार असा आहे |अगोदर चंचळाचा जेथे पत्ता नाही , तेथे आपण कोठला ? निश्चळ आत्म निवेदनाचा विचार असा करावा |तात्पर्य तिन्ही प्रकारे विचार केला तर आपण म्हणून कोणी नाही |आपण नसल्यावर मी पणा ही कोठेच उरत नाही |असे हे तीन प्रकारचे निवेदन असते |



Anonymous - Feb 24, 2011
आता पुढे..
ब्रह्म हे आकाशा सारखे निर्मळ , निश्चळ , शाश्वत , आहे |ते शून्याच्या पलीकड्चे असून त्याच्यात जाणीव व नेणीव दोन्ही नाहीत |सारासार विचाराने ब्रह्म प्राप्ति होते व विवेकाचे फ़ळ गुरुवाचून पुस्तकी ज्ञान व्यर्थ असते |
सगळ्या विषयांचा त्याग होत असेल तरच परमार्थ करावा |असे म्हटले तर सगळा गोंधळ दिसतो ना ? असे श्रोत्यांचे म्हणणे पडले |त्यात समर्थांनी उत्तर दीलेत _____ वैराग्य युक्त त्याग केला तरच परमार्थ घडतो |प्रपंचाच्या त्यागाने परमार्थ यथा सांग होतो |पूर्वि जे ज्ञानी होऊन गेले त्यांनी अनेंक प्रकार चे कष्ट सहन केले तेव्हाच ते जगांत प्रसिध्दि पावले |इतर विचारी मत्सर कर करुन नाहीशी झाली |कित्येक तर पोटासाठी बाटली |त्यांच्या ठिकाणी मूळचे वैराग्य नसते |त्यांस अनुभवाचे ज्ञान होत नाही , त्यांचे आचरण सुध्दा पवित्र , शुध्द असत नाही |अशा प्रकारचे लोक आपणा स्वत:ला साधु सज्जन म्हणवितात |पण त्यांची स्थिती पाहिली तर सगळा अनुमान भपका


दिसतो |त्याला पश्चाताप होत नाही , हेच त्यांचे पूर्व जन्मीचे पाप असते |दूसरयाचा उत्कर्ष पाहुन त्यांना क्षणोक्षणी चित्त क्षोभ होतो |



Anonymous - Feb 24, 2011

आता पुढे..

मला नाही व तुला शोभत नाही |हा न्याय सगळ्या लोकांना ठाऊकच आहे |खाण्यारयास न खाते पाहू शकत नाही असा प्रकार असतो |विरक्त व विवेकी पुरुष असतात त्यांना सगळे लोक शोधीत येतात आणि लोभी व मूर्ख असतात ते भिखारी राहतात |जे आचार विचारा पासून चेवले व भ्रष्ट झाले आणि जे परमार्थाचा विवेक करण्याचे विसरले असे विषय लोभी असतात |त्यांस भजन तर आवडत च नाही त्यांच्या हातून पुरश्चरण कधी ही घडत नाही आणि त्याच कारणा मुळे त्यांचे व सज्जनांचे पटत नाही |वैराग्यशील असून जो आचार भ्रष्ट होत नाही , आत्मज्ञानी असून जो सगुण टाकीत नाही , व्युत्पन्न असून जो वितंड वादांत शिरत नाही |असा पुरुष विरळा असतो | मेहनत केली म्हणजे शेतात पिक येते |उंची पदार्थाची विक्री ताबडतोब होते |शबल विषयांचा सर्वस्वी त्याग करुन शुध्द विषय जरुरी पुरतेच सेवन करणे हेच विषय त्यागाचे लक्षण होय , ते नीट ओळखावे |विवेक कुशल असेल तर त्यालाच त्याग काय आणि अत्याग काय व बोलण्या प्रमाणे वागावे कसे ते कळते |असा जो सर्व जाणणारा व उत्तम लक्षणांनी युक्त असेल त्याच्या योगाने जीवन सहजच सार्थक होईल |



Anonymous - Feb 27, 2011

मूळ माया हीच जगदीश्वर

मूळ माया हीच जगदीश्वर असते , तिज पासून पुढे अष्टधा प्रक्रुतिचा विस्तार होऊन स्रुष्टि क्रमा प्रमाणे द्रुष्याकार आकाराला येतो |मिश्र झालेले ३ गुण वेगळे करता येत नाहीत |आरंभा पासून अखेर पर्यंत ची सर्व स्रुष्टि रचना ह्या त्रिगुणांच्या मिश्रणाची झाली आहे |त्यांत लहान कोण व मोठा कोण हे कसे सांगावे ? असो ही जाणत्याची कामे आहेत |नेणता असतो तो उगीचच भ्रमांत घोटाळतो |अनुभवाने वर्मे तेवढी जाणावी |अनेंक प्रव्रुत्ति चे लोक [प्रपंच]] प्रव्रुत्ति तेवढी जाणतात | पण प्रव्रुत्ति अधोमुख चालते आणि निव्रुत्ति उर्ध्व मुख धावते [उत्तम गति देते] उर्ध्वमुख झाल्याने [उत्तम गति च्या साधनास लागल्याने] अनेंक सुखे मिळतात |जेथुन ही ब्रह्ममांड रचना झाली त्या


मूळ मायेच्या ठिकाणी जो विवेकी मानव अनुसंधान ठेवतो तो पुढे विवरण करतां-करतां उगमा जवळ जातो प्रपंचात असून जो परमार्थाचा विचार करतो , त्याला सुध्दा ही स्थिती प्राप्त होते | केवळ प्रारब्धा स्तव तो लोकांत राहत असतो |सर्वांचे मूळ एकच आहे| तथापि काही जाणते व काही बाष्कळ असतात |विवेकाने तात्काळ परलोक -उगम- साधावा |तरच जन्माचे सार्थक होईल |जे पेरले होते ते आता उगवले व त्याचाच उपभोग त्यास आतां घेतला पाहिजे पुढे ही जसे कर्म करील तसे त्यास फ़ळ मिळेल |भक्ति केल्यास त्या योगाने भगवंताची प्राप्ति होते |हा सगळा पसारा इथल्या इथेच राहतो |जगदीशा पेक्षां श्रेष्ट लाभ नाही |तो लाभ झाला म्हणजे आवश्यक तेवढे सगळे संसारातील उद्योग धंधे करीत असताना ही समाधान ढळत नाही |एकदा म्रुत्यु आला आणि मग तो जरी राजा असला व त्याने लाखों कोट्यावधि द्रव्य देण्याचे कबूल केले तरी त्यास म्रुत्यु काही सोडणार नाही |हा संसाराचा बाजार भरला असून त्यांत नरदेहाच्या भांडवला द्वारे नामस्मरण करुन देवाची प्राप्ति हाच नफ़ा मिळवावा , तरच गर्भवासादि यातना भोगल्याचे सार्थक होते |विवेकाने परलोक सधावा हा बोध संसार कष्ट परिहाराचा उपाय असतो |



Anonymous - Feb 28, 2011

आता पुढे..प्रयत्न करावा


दुबळा , अनाचारी , आळशी , खादाड , कर्जबाजारी , मूर्खपणा मुळे सारे अस्ता व्यस्त झालेले , सारे गमवुन बसलेला , इतका दुर्दैवी ! श्रोते विचारतात !त्यावर समर्थ सांगतात _____ कोणते ही लहान मोठे कार्य केल्या वाचून काही आपोआप व्हायचे नाही |ह्या साठी नीट विचार करण म्हणजे तू सुध्दा भाग्यवान होशील |आळस टाकुन मोठ्या तत्परतेने प्रयत्न करावा |आता काय प्रयत्न करावा ते सांगतो______ दररोज प्रात:काळी उठावे |उठुन प्रातः स्मरण करावे आणि नित्यनेमाने त्याची पुनराव्रुत्ति करावी |बाष्कळ पणा करु नये |शौचास दूर जावे [ ही पुराणी पध्दत होती ] नंतर हात्पाय धुवुन निर्मळ [आंघोळ करावी] व्हावे |दूरुन येताना काहीतरी [माती] घेऊन यावी |रिकाम्या हाताने येणे बरे नव्हे |वस्त्र धुवुन पिळुन वाळत घालावी |हात्पाय धुवावे |देवाचे दर्शन घावे| यथा सांग पूजा करावी |नंतर थोडा फ़राळ करावा| मग आपल्या कामाला जावे किंवा उद्योग धंध्यात लागावे |



Anonymous - Mar 2, 2011

अक्षर स्पष्ट लिहावे |सावकाश व ने मस्त वाचून मनन करावे |रहस्य जाणावे |कोणांला काही विचारावयाचे असेल तर ते स्पष्ट व योग्य प्रकारे विचारावे कोणी विचारल्यास स्पष्ट प्रांजळ सांगावे | दक्षतेने सर्वत्र वागावे |नीतीची मरयादा सांभाळावी |नेहमी प्रसंग पाहून बोलावे तशाच रीतीने वागत असावे |अंतः करणांत मध्ये समर्थ श्रीराम चन्द्रा चे ध्यान करीत असावे |प्रयत्न करण्या कडे बुध्दि वळली व त्या मुळे अंतः करणां मध्ये भग्योदयाची थोडीशी आशा उत्पन्न झाली पाहिजे |

Anonymous - Mar 2, 2011
आता पुढे..
बुध्दि प्रयत्न शील झाली पाहिजे |श्रोत्यांच्या मनांत कर्तुत्वाचा उत्साह भरला पाहिजे |सर्वतोपरी हीन अशा करंट्याचा उध्दार कसा व्हावा ? तर _ श्रीरामा च चिंतन पूर्वक, विवेकयुक्त प्रयत्न केल्यास महद् भाग्य प्राप्त होईल |
आपण यथेच्छ _पोटभर _जेवावे आणि उरलेले अन्न इतर जनांस वाटून द्यावे |उत्तम गुणांचा स्वीकार करावा |स्वतः वागल्या शिवाय दूसरयास सांगणे व्यर्थ होय |देवपुजा , जप , ध्यान , एकाग्रतेने करावी |निरुपण श्रध्देने करावे |अडलेले कोण आहे ते जाणून घेऊन यथा शक्ति त्याच्या उपयोगि पडावे |दूसरयाचे दुःख पाहून आपण दुःखी व्हावे |दूसरयाच्या संतोषाने आपण ही सुखी व्हावे |पुष्कळ जणांना त्यांच्या अपराधा बद्दल क्षमा करावी |दूसरयाचे अंतःकरणजाणून त्या प्रमाणे वागावे |लोकांची अनेंक प्रकारे परीक्षा करावी मुद्याचे भाषण बोलावे |आळस काढून ट्कावा |प्रपंच उद्योग करावा|कोणाचाही मत्सर करु नये |उत्तम पदार्थ दूसरयास द्यावा |शब्द विचार करुन बोलावे |आपला संसार सावध पणे करावा|आपणास मरण येणार आहे ह्याची आठवण ठेवुन भगवंताच्या भक्तिला तत्पर असावे |नियमित पणाचे वर्तन ठेवली म्हणजे अनेंकास त्याची माहीती होते |सगळे जण त्याच्याशी आर्जवाने वागतात मग त्याला काय कमी पडणार |अशा उत्तम गुणांनीजो संपन्न असेल त्याच्या भजनाने जगदीश्वर संतुष्ट होतो |लोक धिःकार करुन बोलले तरीलेशमात्र शांति ढळु देऊ नये |जो अशा उत्तम गुणांनी भूषित झालेला असतो




Anonymous - Mar 2, 2011
आता पुढे..
आणि ज्ञान वैराग्याच्या योगाने शोभित असतो |तोच ह्या जगांत भला अस्तो |अनेंकाचे अनेंक प्रकार सहन करावे |विवेका वाचून कोठे ही समाधान मिळणार नाही |दूसरयाच्या अंतःकरणांस

धक्का लावु नये |ह्यांत कधी ही चूक होऊ देऊ नये |जो क्षमाशील असतो त्याचे महत्व कधी ही कमी होत नाही |आपले असो दूसरयाचे असो सगळेच काम करावे |प्रसंगाला कामांतुन अंग काढावे हे योग्य नव्हे |पेरावे तेच उगवते त्या प्रमाणे जसे बोलावे तसे उलट उत्तर , प्रत्युत्तर येते , तर मग काय म्हणून कठोर बोलावे ते ? आपल्या कर्तुत्वाने पुष्कळांस सुखी करावे , पण उलट दु:ख देणे ही राक्षसी क्रिया असते |दंभ , दर्प , ताठा , अभिमान , क्रोध , कठोर वचन हे अज्ञानाचे लक्षण असते |असे भगवद गीतेत सांगीतले आहे |भक्ति मना पासून करतो आणि उत्तम गुणांना अवश्य ग्रहण करतो अशाला लोक शोधित येतात |आपण एका एक मरुन गेल्यावर मग पाठी मागे देवाचे भजन कोणी करावे ? ह्या साठी भजनाला अनेंक लोकांस लावावे |आमची तर अशी प्रतिज्ञा आहे की शिष्या जवळ दूसरे तिसरे काही मागावयाचे नाही एकच मागणे आहे ते हे की आमच्या पाठी मागे जगदीश्वराचे भजन त्याने करीत रहावे |प्रबोध शक्तिच्या योगाने बहुत जन भक्तिला लागतात |ते दोन गुण _______
[१] उत्तम गुण [२] प्रबोध शक्ति |



Anonymous - Mar 3, 2011
प्रबोध शक्ति चे लक्षण
प्रबोध शक्ति चे लक्षण आता ऐका .. ते असे की जो बोलण्या प्रमाणे वागतो , चालतो , स्वत: आधी करुन मग दूसरयास सांगतो , त्याच्याच बोलण्यावर लोकांचा विश्वास बसतो |ह्या साठी सोबती असावे |त्यांना पटेल अश्या रीतीने शिकवित - शिकवित विवेकाच्या योगाने हलके - हलके मार्गावर आणावे , परन्तु ही विवेकाची काम आहेत |बाकिचे बिचारे भ्रमाने भांडावयास लागतात |
||श्रीराम जय राम जय जय राम ||



Anonymous - Mar 10, 2011
दशक तेरावा .....
दशक तेरावा .....
आत्मानात्म निवेदन = =आत्मानात्म विवेक करुन त्याचे नीट विवरण बळकट ठेवावा |आत्मा कोण व अनात्मा कोण ? ह्याचे विवरण करावयाचे आहे |८४ लक्ष जीव आहेत |सृष्टि मध्ये अनंत शरीरे द्रुष्टिस पडतात |त्यांच्या मध्ये आत्मा कोणता ? तो आत्मा डोळ्यांनी पाहतो , कानांनी ऐकतो

, आणि जिभेच्या द्वाराने प्रत्यक्ष रुचि जाणून घेतो , नाकाने वास घेतो , सर्व जिभेच्या द्वाराने प्रत्यक्ष रुचि जाणून घेतो , नाकाने वास घेतो , सर्व अंग मध्ये स्पर्श जाणतो शब्दांचा अर्थ जाणून घेऊन वाणीने बोलवितो | तो आत्मा सावधान व चंचळ इतका आहे की एकटाच सगळ्या इंद्रियांच्या द्वारांनी देहा मध्ये चारी कडे वळवळ चालू ठेवतो | जो पाय चालवितो , हात हलवितो , भुवयां चढवितो ,डोळे फ़िरवितो , संकेत चिन्हानी बोलतो | मनोगत व्यक्त करतो - हे सर्व करतोच तोच आपला आत्मा असतो | प्रत्यैक शरीर सावरुन धरतो , आणि प्रव्रुत्ति व निव्रुत्ति ह्यांचे प्रपंच परमार्था चे विवरण करतो तोच आत्मा | तो देहा मध्ये येतो जातो , वागतो , हंसतो , रडतो , पश्चाताप करतो | प्रस्तावतो आणी व्यापा मधे श्रीमंत किंवा भिकारी होतो | सुविधा व कुविध्या या दोही कडे ही तो आनंदाने वावरतो |



Anonymous - Mar 12, 2011

आता सारासार विचार पहावा

देहात आत्मा नसेल तर चराचरां मधे ते प्रेतच असत | देहाच्या संगतीने आत्मा सर्व काही करीत असतो | एका वाचून दूसरा व्यर्थ असतो | म्हणून देहाचा आत्म्याचा योग करुन सुष्टि व्यवहार करण्याची ही युक्ति योजीली | देह अनित्य असून आत्मा नित्य आहे असा विचार करणे हाच आत्मानात्म विवेक्ज किंवा नित्यानित्य विवेक असतो | हा सूक्ष्म बुध्दिचा विचार आहे | जेवढे देहधारी आहेत , त्या सर्वांच्या ठिकाणी अशा प्रकारे नित्य-नित्य विवेक ज्ञात्यांनी पहावा | जड तितके अनित्य व सूक्ष्म तितके नित्य हाच नित्या - नित्य विवेक असतो | आत्मा चंचळ रुप आहे असा अनुभव आला |

आता सारासार विचार पहावा _____ सार कोणते हे विचाराने ओळखावे | जे सारखे टिकणारे आहे ते सार आहे | जड चा निरास झाला की चंचळ प्रचीतीस येते व चंचळ निरास झाला की निश्चळ अनुभवास येते | हा सारासार विवेक , जड व चंचळ ह्या दोहींचा निरास होऊन निश्चळाशी तद्रुप होणे हे सार आहे | चंचळ आणि परब्रह्म निर्गुण व निश्चळ चा हेतु म्हणजे कल्पना , जाणीव , व्रुत्ति असते | चळते हालते म्हणून ते चंचळ आणि चळत नाही म्हणून ते निश्चळ | ज्ञान मार्ग व उपासना मार्ग हे दोन्ही एकच , परन्तु उपासने च्या योगाने जनांच उध्दार होतो | मूळ माया रुप ज्ञान हाच उपासनेतील देव असतो |त्या ज्ञानाचे विज्ञान होते | अशा प्रकारे चंचळ सगळे नाश पावते | "मी" चा संग सोडल्या शिवाय कांही ब्रह्म स्वरुप होता येणार नाही | म्हणून मी पणाच्या संगतीचा त्याग करुन मौन्यगर्भ अनिर्वाच्य अशा ब्रह्माचा विचार करावा | निरसन करु लागले म्हणजे सगळ्याच

मायेचे निरसन होऊन जेवढे चंचळ असते ते सर्व निघुन जाते आणि निश्चळ परब्रह्म तेवढे उरते |तेच सार असते |



Anonymous - Mar 14, 2011
आता पुढे..
'सो $हम हंस:' 'तत्वमसि' बाह्यत: साधका प्रमाणे वागून , जे ब्रह्मरुप होऊन उरले त्यांच्या ठिकाणी व्रुत्ति शुन्यत्व सहजच येते | ते जिकडे पहावे तिकडे ओतप्रोत भरलेले व संमुखच असून त्याच्या ठिकाणी द्रुष्य भास नाहीसा होतो अश्या त्या निर्विकार ब्रह्माच्या ठिकाणी जो प्रवेश करतो तो साधु सत्पुरुष असतो | खोटे टाकून खरे घेईल तरच त्याला परीक्षा वंत म्हणावे | म्हणून असार चंचळ माया टाकून देऊन सार असे परब्रह्म घ्यावे | दुश्य अंतरात्मा वजाणीव अशा क्रमाने एकेक जाणतां -जाणतां ज्ञान्व्रुत्ति नाहीशी होते कारण आपली ती व्रुत्ति ब्रह्माशी तद्रुप होते |अशी ही आत्म निवेदन भक्ति आहे | वाचेने भक्ति मुक्तिचे वर्णन करावे | सद् रुप , चिद् रुप , तद् रुप , आणि देह नव्हे तर देहाचा निरास झाल्या नंतर जे अरुप रुप म्हणजे देह नव्हे तर देहाचा निरास झाल्या नंतर जे अरुप किंवा निर्विकल्प परब्रह्म स्वरुप म्हणजे आकार रहित राहते ते असते |



Anonymous - Mar 16, 2011
आता पुढे..
ब्रह्म हे घनदाट व पोकळ आकाशा पेक्षां विस्तीर्ण , निर्मळ, व निर्विकार असे आहे | काही एका काळा पर्यन्त ते असेच असतां भूगोल उत्पन्न होण्यास आरंभ झाला | परब्रह्म निश्चळ असतां त्यांच्या ठिकाणी निश्चळ असा संकल्प उत्पन्न झाला त्याला आदि नारायण असे नांव आहे | मूळ मायेच्या अलीकडे गुणक्षोभिणी [गुणमाया] असून तिच्या पासून तीन गुण [त्रिगुणी] उत्पन्न झाले | येथुन मूळ ॐ ओमकाराची मांडणी [रचना] झाली अ, उ, म, ह्या तीन मात्रा मिळून ॐ[ओम] कार होतो | पुढे पंचभूतांचा विस्तार झाला | अंतरात्म्याला आकाश म्हणतात , त्याच्या पासून वायु झाला व वायु पासून तेज झाले वायूच्या कातरयाचे - घसटण्याने - घर्षण होऊन त्या उष्णते पासून अग्नि उत्पन्न होतो व तेथे सूर्यबिंब प्रकट होतो |



Anonymous - Mar 17, 2011
आता पुढे..
वारा थंड वाहु लागला की तेथे पाणी एकत्र आल की अंकुर फुटतात |मूळचे सगळे प्राणी पाण्या पासून जन्मतात व पाणी नसेल तर मरण पावतात |वेद्शास्त्र पुराणांतील सिध्दांत अनुभवाला पटतील ते घ्यावे |प्रव्रुत्ति अथवा निव्रुत्ति ह्या पैकी कोणता ही व्यवसाय असो ,दोन्हीकडे अनुभव पाहिजे |जे नुसते अनुमानावर विसंबाव ते विवेक हीन होते |मुळा पासून शेवट पर्यंत सर्व स्रुष्टि रचना करणारा आणी ती करुन तिचे यथा योग्य विवरण करणारा एक अन्तरात्माच असतो | त्या जग दुधाराचे लक्षण काय आहे ?त्याचे विवरण केले पाहिजे |निरुपणा मध्ये आपल्या अनुभवास येत असेल त्याचे विवरण करावे |तत्व रहस्यांचा उलगडा करुन दाखवावा |समजून घेतां-घेतां नि:संशय व्हावे |आठ ही देहांचे विवरण करुन पाहिले म्हणजे पुढे माणूस आपोआप च नि:संदेह होतो|पण निरुपण अखंड पाहिजे ,समाधान होते |



Anonymous - Mar 18, 2011
पंचतत्वे
पंचतत्वे जी म्हणतात त्यांची नांवे [१] प्रुथ्वि[२]आप[३] तेज [४]वायु [५] आकाश |ही त्यांची नांवे आहेत |आतां रुप ऐका__ प्रुथ्वि म्हणजे हा भूगोल [धरणी] आप म्हणजे [पाणी] तेज म्हणजे [अग्नि] ,सूर्य वन्ही इत्यादि तेजोमय पदार्थ |वायु म्हणजे [ वारा]आकाश म्हणजे सारी पोकळी[पैस] |आतां त्या मध्ये शाश्वत काय आहे ?प्रुथ्वि निर्माण होते व नाश पावते ,म्हणून जे रचते ते खचते हा नियम आहे |[पाणी] आप ही आटून जाते तेज सुध्दां प्रकट होते व विझते , वारा देखील थांबतो |अवकाश - आकाश - पोकळी ही नुसती नावांचीच आहे |ह्या प्रमाणे पंचभूतात्मक जे जे आहे ते ते टिकेल असे कधी घडावयाचे नाही |असा हा पंचभूतांचा पसारा नाशवंत आहे |निराकार आत्मा तेवढा शाश्वत व सत्य समजावा |तो आत्मा कोणाला कळत नाही , ज्ञाना वाचून त्याचे आकलन होत नाही |निराकारा मध्ये आकार आहे असा भासतो आणि आकारा मध्ये निराकार आहे असे दिसते |निराकार हा नित्य आणि आकार हा अनित्य आहे | ह्यालाच नित्या नित्य विवेक अस म्हणतात |पंच भूतात्मक द्रुश्य मायिक असेल तरी अनेकत्वाने भासते आणि एकटा आत्मा हा सर्वांना व्यापुन आहे |प्रुथ्विव्यादि चार ही भूतांत आकाश जसे

घनदाट भरलेले आहे , तसे आकाशांत निराकार ब्रह्म घनदाट भरलेले आहे |आकाश व ब्रह्म ही भिन्न दिसत नाहीत एक्रुपच आहेत |उपाधि मुळेच त्याला आकाश म्हणावयाचे |उपाधि नसेल तर तेच निराभास होते |जे निराभास आहे तेच अविनाशी आहे |



Anonymous - Mar 23, 2011


परम भक्त

परमात्मा हा निराकार आहे हे समजणे , हा सारासार विचार असतो |देहाचा अंत होतो म्हणजे काय होते तर खरोखर वायु तेवढा जातो |श्वास कोंडला तर देह पडेल , देह पडला की त्याला मढे म्हणतात |सर्वत्र निर्गुण ब्रह्मा वेगळे काही नाही असे अनुभवास येते |मी कर्ता असे म्हणावे ____ कर्ता आपण असे म्हटले तर आपल्या इच्छे प्रमाणे सर्व घडले पाहिजे , पण तसे होत नाही |त्या अर्थी आपला कर्ते पणा सगळा खोटा आहे , असे मानलए पाहिजे |अनुभवाला न्याय म्हणतात| जेथे अनुभव नाही तेथे अन्याय असतो |म्हणून जो निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी अनन्य असतो म्हणजे समरस होऊन आत्मनिवेदना च्या योगाने मान्य झाला तोच परम भक्त असतो |

Anonymous - Mar 25, 2011

आता पुढे..

जड अनेंक असून आत्मा एक अहे |जगाचे व्यवहार चालवितो म्हणून त्यास जगन्नाथ म्हणावे | जड हे अनात्मा असून त्याला चेतना देतो तो आत्मा असतो |सर्वांन मधे वागतो तो सर्वात्मा असतो |आत्मा सर्वात्मा सर्व मिळून चंचळात्मा असतो |जशी -जशी संगति मिळेल , तस तसा सरडा रंग पालटतो |म्हणून उत्तम निश्चळाचा मार्ग पाहून तसा संग धरावा |श्रोत्यांनी प्रश्न केला _ देही जे सुख - दुःख होते त्याचा भोक्ता कोण ?



Anonymous - Mar 25, 2011


शरीर ___आत्मा

शरीराच्या योगाने आत्म्याला उद्वेग , चिंता वहावी लागते व शरीरा मुळेच आत्मा जागतो हे तर प्रसिध्दच आहे |देह अन्नच खाणार नाही तर आत्मा कधी ही जगावयाचा नाही व आत्म्या शिवाय देहाला चेतना कशी येणार ? ह्यांना वेगवेगळे केले तर दोन्ही व्यर्थ होतील |दोघांच्या संयोगाने च

कोणते ही कार्य चालते |नुसत्या देहाला चेतना नाही , तसेच नुसता आत्मा काही पदार्थ उचलु शकत नाही |स्वप्नांतील जेवणाने पोट भरत नाही |आत्मा हा स्वप्नावस्थेत जातो पण स्थुल देहांत ही असतोच |झोपे मध्येच अंग खाजवीतो , अन्न रसाने शरीर वाढवितो व शरीरा बरोबरच विचार वाढतो| म्हातार पणीशरीर व विचार दोन्ही कमी , क्षीणहोत जातात |देहाने विष घेतले तर आत्मा ही निघुन जातो |त्या आत्म्याला व्रुध्दि किंवा नाश पावणे हे विकार निश्चये करुन भोगावे लागतात |



Anonymous - Mar 31, 2011
अनेंक प्रकार आत्म्याला भोगावे लागतात |
देहाच्या योगाने वाढणे , मोडणे , येणे , जाणे , सुःख-दुःख , अनेंक प्रकार आत्म्याला भोगावे लागतात |शरीरा मध्ये नाड्यांची गर्दी असते |प्राण्यांने अन्नोदक घेतले की त्याचा अन्नरस होतो | आणि श्वासोच्छवासाच्या योगाने वायु हा त्या अन्नरसाला सर्व शरीर भर खेळवितो |नाड्यांचा द्वारांनी जे पाणी वाहते त्यांत वायु खेळत असतो |त्या वायु बरोबर आत्मा ही संचार करीत असतो |तहानेने शरीर व्याकुळ झाले तर तो विचार आत्म्याला कळतो |मग तो शरीराला उठवुन पाण्याकडे नेतो |आत्मा पाणी मागतो |शब्दांचा उच्चार करवितो |स्वयंपाक झाला की स्त्रिया म्हणतात झाले-झाले मग पायांत शिरुन त्यास लवकर -लवकर चालवितो |दूसर्या देहाला पानांवर नेऊन बसवितो , डोळे भरुन पात्रे पहवितो , नंतर हाता कडून आपोआप घास घेण्यास आरंभ करवितो , हाता कडून घास उचलवितो तोंडत शिरुन पसरवितो |दातां कडून जोराने चाववितो |आपण जिव्हे मध्ये खेळून त्या रसा स्वादाचे सोहाळे भोगतो |कैंस काढवितो , खडा कळवितो , आणि तत्काळ थुंकुन टाकवितो |आळणी आहेसे वाटले की मीठ मागतो रागारागाने डोळे वटारतो , गोड लागले की आनंदी त होतो |



Anonymous - Apr 14, 2011
आत्मा निरुपण..
गोड नसेल तर अत्यंत दुःखी होतो |एखादी मना विरुध्द गोष्ट घडली की आत्म्याला अंतःकरणांत खोचते , तिखट लागले की मस्तक झाडतो ,खोकतो |जिभेकडून कठोर शब्द बोलवितो |ह्या वरुन पाहिले तर देहा मध्ये सुख दुःखाचा भोग घेणारा असा एक आत्माच आहे |मनाच्या अनंत व्रुत्ति

आहेत |त्या जाणुन घेणे हीच आत्म स्थिती होय |तिन्ही लोकां मध्ये जेवढ्या व्यक्ति आहेत त्यांच्या अंत:करणांत आत्मा हा अहेच |जगा मध्ये वावरतो म्हणून तो जगदात्मा |, विश्वामध्ये आहे तो विश्वात्मा व अनेंक रुपे घेऊन सर्व चालवितो , सर्वा घरी नांदतो म्हणून तो सर्वात्मा | हुंगतो , चाखतो , ऐकतो , पाहतो , मौठ किंवा कठिण ओळखतो , थंड किंवा उष्ण त्याला ताबडतोब कळते |वायु अती चपळ पण आत्म्या पुढे वायु ही उणाच पडतो |ते कसे पहावे _____ वायू बरोबर सुगंध येतो पण सुगंध विखरुन नाहीसा होतो |तशीच वायू बरोबर धूळ ही येते पण ती फ़ार वेळ टिकत नाही |आणि तो वायु आत्म्या बरोबर टिकत नाही |आत्म्याचा चपळ पणा वायु पेंक्षा अधिक आहे |वायु कठिण पदार्थाचा भेद करुन पळीकडे जातो |वायु झडझडा वाजतो |आत्म्याचा काही शब्द नसतो |निवांत बसुन अंत:करणांत विचार करुन पाहीले तर त्याचे ज्ञान मात्र होते |वाटेल तितके उपाय करुं म्हटले तरी ते देहा शिवाय आत्म्याला पोहोचवायचे नाहीत |देहाच्या योगानेच आत्म्याच्या वसनेची त्रुप्ती होते |देहो वाचून आत्म्याची अडवणुक होते |दोघे एकत्र असले म्हणजे पुष्कळच कार्यभाग होतो |वेगवेगळे झाली तरी काहीच होत नाही |देह व आत्मा ह्यांच्या संयोगाने विवेकाच्या बळावर माणूस त्रैलोक्यात गाजतो |



Anonymous - Apr 14, 2011

माळांचे प्रकार___

माळांचे प्रकार___

माळांचे अनेंक प्रकार आहेत |तुळशीची, पाने , फ़ुले , फ़ळ , बीज , दगड , कवड्या , स्फ़टिक , मोहरा , काष्ठ मणि गंधगोळ्या , धातुंचे मणि , रत्ने , इत्यादिकांच्या अनेंक प्रकार च्या माळा दोरयाने करतांत , त्यांच्या आतुन जो दोरा ओवलेला असतो त्यांच्या मुळे ह्या चालतात |आणि हे सर्व दोरया मुळे करतां येते |तो तंतु नसेल तर सर्व विस्कळीत होईल |हा देह धारण करणारा आत्मा व देह अनात्मा आहे|त्यांच्या पेक्षा श्रेष्ट परमात्मा आहे |त्या निरंजनाला द्यायला उपमाच नाही | परमेश्वराच्या एका अंशाने जग चालत असले तरी प्रत्यैक जीवाचे सामर्थ्य वेगवेगळे आहे |एकाच्या संगतीने मुक्ति व दूसरयाच्या संगतीने संगतीने जीवाला नरक वास भोगावा लागतो |पुण्यशील व पापी या दोघांत एकच अंतरात्मा आहे तथापि साधु व भोंदु याच्याशी वागण्याची मर्यादा लक्षांत ठेवली पाहिजे |कारण दोघांशी वागण्याचा प्रकार वेगवेगळा आहे |

भागीरथीचे पाणीच आणि मोरीचे सौदणीचे ही पाणी पण ते घाणेरडे पाणी थोडे से ही पितां येत नाही |ह्या साठी अगोदर आचार शुध्द पाहिजे |त्या नंतर शुध्द विचार , वैराग्य आणि सामंजस्य पणा पाहिजे |एकाच पाण्या पासून सर्व झालेले असले तरी विचार करुन प्यायले पाहिजे त्या

प्रमाणे निंद्य असेल ते टाकुन द्यावे व वंद्य असेल ते अंतःकरणांत ठसवुन ठेवावे |आणि आपल्या सत्कीर्तीने सगळे जग भरुन टाकावे |जो स्वतः उत्तम असतो त्याला उत्तम [मार्ग - पदार्थ] पसंत पडतो |नीचाला ते आवडत नाही |नीती न्यायाने वागावे |वागणूक विचार्पूर्वक ठेवावी |सर्व लोक संतुष्ट ठेवावे |त्यांना हळु-हळु उत्तम पुण्यवंत किर्तीमान करावे |दूसर्यचे मनोगत राखणे हेच चातुर्याचे लक्षण असतात|अनेंक ठिकाणी अनेंक प्रसंग येतात , ते सर्व नीट रीतीने समजुन घेऊन पार पाडावे |ह्या साठी जो दूसरयाचे मनोगत सांभाळील तो मोठा , महान असतो |
||श्रीराम जय राम जय जय राम ||




Anonymous - Apr 17, 2011
दशक चौदावा..........
दशक चौदावा..........
श्री समर्थ रामदास स्वामी सांगतात ---- ज्याच्या केल्याने निरंतर समाधान होते , राहते अशी निःस्प्रुहाची शिकवणूक आहे |युक्ति बुध्दी , शहाणपण ही कशी असतात ते येथून पुढे ऐका__ मंत्र सोपा पण हटकुन सिध्दि देणारा , औषध साधे पण स्वानुभवाचे आहे |अंगातले दुर्गुण तत्काळ नाहीसे होऊन , उत्तम गुण आंगी बाणतील असे माझे हे शब्द रुपी तीव्र - कडक हटकून गुण देणारे औषध , श्रोत्यांनी आळस टाकुन साक्षेपे घेतले पाहिजे अर्थात् त्या शब्दांचा अनुभव घेतला पाहिजे | आधी वैराग्य धरु नये , एकदा धरल तर ते सोडु , टाकु नये , सोडलाच तर ओळखीच्या मंडळीत हिंडू तरी नये |स्त्री विषयी लोलुपता ची द्रुष्टि ठेवू नये |विषय वासनेची गोडी लावू देवू नये | कदाचित विषय वासनेची गोडी लागली व मनास इन्द्रिय दमन विषयी धारिष्ट चळलेच तर तसले काळे तोंड लोकांना दाखवु नये |कनक आणि कांता ह्या विषयी अभिलाष व्रुत्ति धरु नये |आचार भ्रष्ट होऊ देवु नयेत |कोणी दिले तर द्रव्य घेवु नये |कोणी विचारले तरी आपली ओळख देवु नये| मळके वस्त्र धड असले तरी नेसु नयेत|वैराग्य कमी होऊ देऊ नये , धैर्य ढळु देऊ नये , करुणा कीर्तन विषयी मूर्तिचा प्रेमाचा तंतु मोडु देऊ नये |मनांत काळजी बाळगु नये |त्रास पडला तर खेद मानू नये |प्रसंगी काही झाले तरी धैर्य सोडू नये |कोणी अपमान केला तर खेद मानु नये |कोणी टोचुन बोलले तरी दुःख करु नये |कोणी धिक्कार केला तरी झुरत बसु नये |कोणी खिजवले तर खिजु नये |शुध्द मार्ग सोडू नये |दुर्जना बरोबर वितंड वाद घलु नये|अत्यंत दुष्ट मनुष्याशी संबधच पडू देऊ नये|कोणी भांडण्याचा प्रयत्न केला तरी भांडू नये |आपली वैराग्याची समाधानी स्थिती कोणी मोडण्याचा प्रयत्न केला तरी मोडूं देवु नये |पर प्रेरणेने हसु , बोलु नये |सर्व काळ सभे मध्ये , लोक समूहांत बसू नये |म्हणजे काही काळ तरी एकांतात घालवावा |बंधन आंगी

लावुन घेऊ नये |कोणाला भरवंसा देऊ नये |नित्यनियम सोडू नये , पण परमार्थाचा अभ्यास बुडू देऊ नये|काही झाले तरी पराधीन होऊ नये |क्षणोक्षणी दूसरयाची आशा अपेक्षा धरु नये | स्वरुपानुसंधान अखंड राखावे |कधी कोठे ही आसक्त होऊ देऊ नये |परंपरा गुरु सम्प्रदाय पध्दति सोडून वागू नये |उपासना मार्गाची उपाधि कमी होऊ देऊ नये |




Anonymous - Apr 17, 2011
आता पुढे..
जो कोणी आपले ऐकत नाही त्यास सांगु नये |दूसरयास कंटाळा येईल असे पाल्हाळ बोलु नये | मोठे पणा धरुन बसू नये |कोठे ही काही मान मिळेल अशी इच्छा धरु नये मानाची इच्छा धरु नये |अभिमान आंगी जडवून घेऊ नये |अभ्यास कठिण वाटला तरी सोडू नये |पाळण्यास कठिण जाईल अशी आज्ञा करु नये , कार्य करुन दाखवल्या शिवाय तोंडाने बोलत बसु नये |विषयेंद्रियाचे स्मरण करीत बसु नये |कारण की त्या मुळे कामदि विकार बळावुन मन विषयी होते |शाक्त मांसाहरी मार्गाला अनुसरुन स्वेच्छाचार माजवु नयेत |वैभव आल्याने उन्मत्त होऊ नये, ऐदीपणा [आळशी पणा] चे सुख केव्हाही मानू नये |स्वार्था साठी कोणी कोणास आज्ञा करु नये |प्रसंगा वाचून बोलू नये |परोपकार टाकू नये |दूसरयाला त्रास देऊ नये |संशय युक्त भाषण करु नये | कोणाच्या कारभारात पडू नये |प्रपंचाचे प्रस्थ जेथे वाढले असेल तेथे जाऊ नये |सगुण भक्ति टाकू नये |



Anonymous - Apr 18, 2011
आता पुढे..
फ़ार कष्ट करु नये , पण आयते खाणे ही वाईट |फ़ार बोलु नये , पण अगदी न बोलणे ही उपयोगाचे नाही |फ़ार नीजु नये |फ़ार नेम धरु नये , पण अगदीच नेम नसणे वाईटच |देहाला फ़ार संगति टाकू नये |विषयोप भोग फ़ार भोगु नये व विषयांचा सर्वस्वी त्याग ही करता येत नाही |द्रयुष्यास परमार्थात स्मरण उपयोगाचे नाही आणि व्यवहारांत द्रुश्याचे विस्मरण पडूं देऊ नये |कोणती ही चर्चा म्हणजे निंदा स्तुती ची वाटाघाट करु नये |काही केले तरी मनांतील समाधान ढळु देऊ नये |कोणी आशंका घेतलीच तर त्याच्याशी भांडू नये |हा उपदेश ध्यानांत धरल्यास सर्व सुखे त्याला प्राप्त होतात |ज्या मुळे माणूस शोभायमान होईल , हे अश्या गुणांचे वर्णन आहे |




Anonymous - Apr 19, 2011
आता पुढे..
बरे वाईट लोक जिथे असतात तिथे जो कोरडी भिक्षा मागुन भोजन करतो त्याला दर रोज अमृतपान केल्याचे श्रम मिळते |असा भिक्षेचा महिमा आहे |कवित्वातील शब्दरुप पुष्प माला मध्ये अर्थ रुप सुगंध विशेष दरवळुन राहिला तर त्याच्या योगाने संतरुप भ्रमरांना आनंद होतो |अशी माला आपल्या अंतःकरणां मध्ये गुंफून , तीने श्रीराम चरणांची पुजा करावी म्हणजे रामाची पूजा होते |ही माला गुंफ़ताना अंतःकरण शुध्द असावे |कवित्व करताना ॐ आहे व त्याचाच हा विस्तार होत आहे |मी कोणी कर्ता नाही अशा प्रकारच्या ॐ काराच्या अखण्ड स्थितीचे अनुसंधान ठेवावे , त्यात खँड पडू नये |परोपकारा साठी कवित्व अवश्य करावे |त्या कवित्वाचे लक्षण ऐका _ज्याच्या योगाने भगवद भक्ति घडेल व वैराग्य उत्पन्न होईल |सदाचारणा शिवाय क्रिये वाचून नुसत्या शब्द ज्ञानाला महत्व नसते म्हणून देवाला अनुतापाने प्रसन्न करुन घ्यावे |



Anonymous - Apr 23, 2011
आता पुढे..
आपल्या मनास येईल तशा प्रकार्चे कवित्व ओढुन ताणून धीट पणाने रचने, त्याला "धीट काव्य" म्हणतात |जो देवाच्या भजनांवाचून एक क्षण सुध्दा फ़ुकट दवडीत नाही , ज्याच्या अंतःकरणांत भगवान निवांत पणे नित्य [ठाण मांडून] राहिला आहे |तो सहजच जे जे बोलेल ते ब्रह्म निरुपण असणार |त्यांच्या कडून भक्ति शिवाय दूसरया विषयाचे प्रतिपादन च होत नाही |त्याच्या अंतः करणास देवाची आवड लागलेली असल्या मुळे त्याच्या मुखातुनी शब्द ही तसेच प्रेमाचे पडतात

Anonymous - Apr 24, 2011
आता पुढे..
असा जो संसारा मध्ये विरक्त असणारा भगवद भक्त त्याला साधु लोक मुक्त असे समजतत |तो प्रेम भराने जे ध्यान व प्रतिपादकांचे वर्णन करील , त्याला प्रासादिक काव्य म्हणतात |त्याच्या सहज बोलण्यांत विवेक प्रगट होतो |कवित्व तेच होय की ज्याच्या योगाने पश्चाताप उत्पन्न होईल |ज्ञान उत्पन्न झाल्याच कळेल |देहबुध्दि नाहीशी होईल संसार -समुद्र आटून जाऊन

भगवंताचा साक्षात्कार होईल |ज्याने सदबुध्दि लागेल |ज्याने सदवस्तु , परब्रह्माचा भास होईल | संसाराचे बंधन तुटुन जाईल व जे सज्जनांना मान्य होईल , त्याचे नांव कवित्व |
समर्थ पुढे सांगतात ______ बाह्य रुप किंवा लावण्य हे अभ्यासा ने मिळत नाही , सहजच म्हणजे उपजत गुण असतात त्यावर उपाय चालत नाही |ह्या स्तव कांही तरी नवीन गुण आंगी आणण्याचा अभ्यास करावा |कुरुपतेची अशी लक्षणे किती म्हणून सांगावी ? ह्या स्तव रुप किंवा लावण्य ही काही पालटता येत नाहीत |अवगुण सोडले तर जातात |अभ्यासाने उत्तम गुण प्राप्त होतात , शाअणे लोक कुविद्या टाकून सद् विद्या शिकतात |मूर्ख पणा टांकता येतो , काम करायला लागले म्हणजे सर्व काही समजू लागते |चातुर्या शिवाय श्रेष्ट पणा मिळत नाही|असा जर अनुभव मनाला येतो आहे तेर आपल्या कल्याणा चा मार्ग कां धरीत नाही ? सन्मार्गाने चालल्यास , सामान्य लोकांस व सज्जनांस ही ते आवडते |देह नीट नेटका सजवला तरी तो चातुर्या वाचून व्यर्थ असतो |गुण नसतांना नटविल्यास तो बाष्कळ पणा होतो |चातुर्याने अंतरंग श्रुंगारावे अनेंक प्रकारे बुध्दि वाढवावी आणि ऐश्वर्य मिळवून यथेच्छ भोगावे |लोकांना आपण दु:ख दिलेत तर आपणाला ही दु:ख भोगावे लागत व सुख दिले तर लोक ही आपंणास सुखी करतील |न्यायाने वागतो तो शहाणा अन्यायाने वागतो तो करंटा |जे अनेंकांस रुचते तेच जगांत - लोकांना मान्य होते , बाकिचे सर्व फ़ूकट निंदेला पात्र होतात |आपणांस समाधान होईल तेच करणे योग्य असते | मैत्रि ने मैत्री जडते परंतु बरेपणा मोडायला गेलो तर मात्र उशीर लागत नाही |चातुर्याने अंत:करंणांला शोभा येते आणि वस्त्राने देहाला शोभा येते |तेंव्हा ह्या दोघांन मधे श्रेष्ठ कोण ह्याचा विचार करावा उगीच कल्पना क्रीत बसल्याने वा आळशी राहिल्याने परिणामी दु:खच भोगावे लागणार|म्हणून दूसरयांना सुखी करण्यांने च आपणाला ही सुख मिळते आणी दूसरयास कष्ट दिल्याने स्वता:ला ही कष्ट भोगावे लागतात हे स्पष्टच आहे |



Anonymous - Apr 24, 2011

समज ठेवणे

समज ठेवणे म्हणजे विचार करणे हाच सर्व प्राण्यांना एक उपाय आहे |आळसाने कामे नाश पावतत व उद्योग केल्याने होता होता सिध्दिअला जातांत |हे स्पष्ट दीसत असून ही ज्याला कळत नाही त्याला शहाण कस म्हणावे ? मैत्री केल्याने कार्य होते , कार्ये सफ़ल होतात आणि वैर केल्याने मुत्यु ही ओढवतो |सर्वांशी वैर करतो त्याला मूर्ख म्हणावे |आपण एकी एकट एकटा आणि सर्व जगाशी भांडत सुटतो , तेव्हा सगळ्या विरुध्द वागुन एकट्याला यश कसे मिळणार ?




Anonymous - Apr 25, 2011
आता पुढे..
अनेंक वेष व अनेंक आश्रम आहेत पण ह्या सर्वांचे मूळ ग्रुहस्थाश्रम आहे |त्रैलोक्यातले सर्व प्राणि तेथे विश्रांति पावतात |ग्रुहस्थाश्रम हा सर्व आश्रमांत अतिशय उत्तम आहे , परंतु त्यांत स्वधर्माचरण व भूत्दया ही सांभाळून राहिले पाहिजे|जेथे षट कर्म चालतात , सर्व क्रिया विधी युक्त होत असतात , जेथे मधुर वाणीने बोलतात , जेथे सर्व आचार शास्त्रा प्रमाणे नियमित पणाने पाळले जातात |भक्ति मार्ग चालू असतो |काया , वाचा, जीव , प्राण , वेचून भगवंताच्या सेवे साठी कष्ट करीत असतो |देवासाठी संसारा वर पाणी सोडून मोकळा होता |अंत: करणांत पासूनचे खरे वैराग्य हेच त्याचे महद्भाग्य असते |विषय सुखाच्या आसक्ति सारखे दुर्भाग्य दूसरे कोणतेच नाही|म्हणून अनुभव [आत्म प्रत्यय] हा मुख्य आहे |अनुभव रहित ज्ञान काय कामाचे ? एका संगतीने उध्दार होतो व एका संगतीने अधोगति होते , ह्या साठी सत्संगति नीट पाहून धरावी |जो दूसरयाचे अंत:करण जाणतो त्याला देश , काल , प्रसंग , समजतात |अशा पुरुषाला जगांत काय कमी आहे ?




Anonymous - Apr 25, 2011
@ Lochanji Kate


pharach uttam karya karit aahat. Aabhar!!!




Anonymous - Apr 29, 2011
आनन्द जी अत्यंत आभार ......... बरेच दिवसांत हे लक्षांत आणल कुणी तरी की मी जे करीत आहे ते कुणी वाचत तरी आहे......... असो तुम्हाला आवडल हे छान... असच सांगत जा........... पुन्हा एकदा धन्यवाद.................



Anonymous - Apr 29, 2011
आता पुढे..
असो मागे झाले ते होऊन गेले , परन्तु आतां तरी ब्राह्मणांनी आपणाला शहाणे करावे |देवाची पूजा करावी |अगोदर देवाला ओळखावे , मग अनन्य भक्तिने त्याचे भजन करावे त्या सर्वोत्तमाचे अखंड ध्यान धरावे |सर्वा मध्ये जो उत्तम आहे , त्याला सर्वोत्तम म्हणतात |आत्मानात्म विवेकाचे वर्म ध्यानांत आणवे |प्रत्यैक क्रिया किंवा व्यवहार जाणून देहाचे संरक्षण करणारा त्याला आत्मा , द्रुष्टा , अंतर साक्षी म्हणतात |म्हणून सर्वांना संतुष्ट राखावे |सर्वाच्या देहाला बरे केले म्हणजे ते आत्म्याला पोचते |दुर्जन प्राण्यांत ही देव आहे |तेथे त्याचा स्वभाव तिरसट दिसला तरी त्यातील अंतरात्मा ओळखुन तो रागवला तरी भांडू नये |त्याच्या पासून दूर होऊन मग पुढे त्याची विवेकाने समजुत घालावी |विवेकाने सर्वांशी आपले सौजन्य सांभाळावे |जाग्रुति व स्वप्न ह्या मध्ये जे जे व्यापार होतात त्यांचा संबंध त्याच्याशीच पडतो |त्या सर्वातर्यामी व शाश्वत देवचे अखंड स्मरण करणे हेच अखंड ध्यानाचे स्वरुप असते |ध्यान देवाचे करावयाचे का देवळाचे करावयाचे ह्याचा आपल्या ठिकाणी नीट विचार करावा |देह हे देऊळ असून आत्मा हा देव आहे , आतां ह्या मध्ये भाव कोठे ठेवणार ?देव कोणता ते ओळखून त्याच्या ठिकाणी जीव लावावा |मूर्तिच्या ध्यानाचा विचार करायला जावे भलतेच होते |जे दिसते ते सगळे सांगता येत नाही |हट्टाने क्रुत्रिम भाव धरवत नाही व ह्या मुळे साधक अंतःकरणांत तळमळत असतो , कष्टी होतो |भाग्याने ज्याला यथासांग ध्यान घडते त्याला त्याचेच मन साक्षी असते त्याच्या ठिकाणी लेशमात्र ही त्याला विकल्प येत नाही |ध्यान करणारा कोण ?व ध्यानांत ज्याचे स्मरण होते तो कोण ?ह्या दोघां मध्ये ध्याता व ध्येय ह्या मध्ये अनन्यता व एक पण पाहिजे|अनुभव नसेल तर भ्रमांत कुचभावे लागते |म्हणून सारा अभिमान सोडून विवेकाने प्रत्यय घ्यावा |मायेचा पूर्व पक्ष - त्याचे खंडण करुन आत्मा हा सिध्दांत स्वीकारावा |



Anonymous - Apr 30, 2011
लोचनताई, आपण मला अहो जाहो करू नये. मी आपल्या पेक्षा लहान आहे. बाकी आपले निरुपण मी गेले काही दिवस थोडे थोडे करून वाचले. त्यामुळे, या समूहावर वर माझ्या फेऱ्या पण वाढल्या. अनेक धन्यवाद!!! :)



Anonymous - Apr 30, 2011
message
वीस दशक दास बोध |श्रवण द्वारे घेता शोध |मनन कर्त्यास विशद |परमार्थ होतो || श्रीराम||२० दशक ,१० वा समास, ३१ ओवि|| |ग्रन्थाचे करावे स्तवन |स्तवनाचे काय प्रयोजन |येथे प्रत्ययास कारण |प्रत्ययो पहावा ||श्रीराम||२० , १० , ३२ ||

ह्या आधी मी सख्य भक्ति द्वारे निवडक समासाच्या निवडक ओव्या दिल्या आहेत ते वाचून मग हा गद्य प्रबंध वाचावा जास्त मजा येईल| पण त्यात एका सीरीज मधे नाही |



Anonymous - Apr 30, 2011
आत्मा कोण ?
पुढे समर्थ सांगतात _________ पिंडाची कौतुकास्पद रचना पाहिली |त्यांत आत्मा कोण ह्याचा शोध घेतला पाहिजे |त्यांत पिंड अनात्मा असून सर्व कर्ता तो एक आत्माच आहे असे दिसून आले |सर्वत्र एक आत्माच आहे असे म्हणतात |त्याचा अनुभव विवेकाने येतो असार म्हणजे नाशवंत , सार म्हणजे ज्याला नाश नाही ते शाश्वत |प्रुथ्वि पाण्या पासून होते व पुढे ती पाण्यांतच विरुन जाते |पाणी तेजा पासून होत |त्या पाण्याला तेज शोषुन टाकते |महत्तेजाने ते आटते |मग पुढे सारे तेजच उरते |तेज वायू पासून होते व वायूच त्याला झडपुन विझवतो |नंतर तेज सर्व नाहीसे होऊन सारा वायूच भरुन राहतो |वायू आकाशा पासून होतो व पुन्हा त्यातच विरतो त्याला वेदांत शास्त्रांत कल्पांत म्हणतात |शेवटी गुण माया व मूळ माया ह्या सुध्दा परब्रह्माचे ठिकाणी लय पावतात |अशा त्या परब्रह्माचे विवरण करायला विवेक पाहिजे असे ते सर्व व्यापी निर्गुण ब्रह्म सर्वत्र आहे |अंतरात्मा देव सगुण त्या सगुणाच्या द्वाराने च निर्गुणाची प्राप्ति होते आणि निर्गुणाचे ज्ञान झाले म्हणजे ज्ञानाचे अपरोक्ष ज्ञान होते |ते निर्मळ ब्रह्म कल्पनेच्या पलिकडचे आहे |एक ज्ञान एक अज्ञान एक विपरीत ज्ञान ही तिन्ही जेथे नाहीशी होतात तेच विज्ञान असत |वेदांत म्हणजे व्रुत्ति शून्यता , सिध्दांत म्हणजे गुरु प्रचीति , धादांत म्हणजे आत्म प्रचीति ह्या तिहींचा अनुभव पहावा - तो हा की निर्विकार ब्रह्म सर्वत्र संचले आहे |ते ज्ञान द्रुष्टिने पाहून त्याच्या ठिकाणी अनन्य म्हणजे तद्रुप [एकरुप] होऊन रहावे |ह्यालाच आत्मनिवेदनाची भक्ति म्हणतात | ह्याचेच नांव आत्म निवेदन असत |एखाद्या पदार्थाला विकार झाला म्हणजे उगीच काहीतरी भास दिसतो किंवा एक प्रकार असून दूसरा दिसतो |तशीच माया सर्वथा असत्य असून सत्य आहे अशी

भासते |ह्यालाच द्रुष्टांत द्वारा मायेची ओळख म्हणतात |
||श्रीराम जय राम जय जय राम||




Anonymous - May 1, 2011
दशक १५ वा...जीवेश्वर
दशक १५ वा...
माणासांची शरीर हाडा मासांची असून त्यात जीवेश्वर राहतो आणी तो मूळचा विकारी असतोच म्हणून पुढे अनेंक विकारां मध्ये निपुण होतो स्थूळ काय आहे व सूक्ष्म काय आहे तसेच, पाहिजे कोणते व नको कोणते हे सहजच जिवाला विवरण करुन समजते |एकाला माग मागुन मिळवावे लागते व दूसरयाला न मागतां मिळते |ह्या साठी चांगली लक्षणे अनुभवांनी ओळखावी |दूसरयाच्या सुख दु:खाशी तद्रुप व्हावे |त्याच प्रमाणे आपले मन दूसरयाच्या मनांशी विचाराच्या योगाने मिळवुन टाकावे |त्यात ढिले पणा केल्यास संशय उत्पन्न होतो व ऐक्य भाव होत नाही |संशयाने संशय वाढतात सर्व जगाच्या अंत:करणां मध्ये जगदीश भरलेला आहे| चांगली मोठी कार्ये जो करतो तो श्रेष्ट असतो |हलकी कामे करतो तो कनिष्ठ असतो |अशा रितीने आप आपल्या बरया वाईट कर्मा प्रमाणे प्राणि भले आणि बुरे समजले जातात |जो जगाच्या अंत:करणांशी एकरुप झाला तो सगळ्या जीवाचा जीवकी प्राण होऊन बसतो |वेष साधा असावा पण अंत:करणांत अनेंक युक्ति प्रयुक्ति असव्यात |सर्व लोकांच्या अंत:करणांतील आपल्या विषयीचा प्रेम तंतु _ तोडू नये |उत्तम गुणांच्या योगाने कोणां ही माणसाला समाधान होते |त्यात ही जो तीव्र बुध्दिचा असतो तो एक क्षण ही व्यर्थ घालत नाही |तर्क शुध्द व चतुर पणाने वागल्याने तो सर्वांना मान्य असतो |ज्याच्या ठिकाणी जितकी - जितकी जाणीव अधिक तितके ते भाग्यशाली होतात |मोठेपणा किंवा लहानपणा हा सर्व बुध्दि पाशी आहे |पण सर्व लोकांना कळत नाही |आतां वडिलांना वडील पण उरले नाही व धाकट्यॉंहाधकटे पणा राहीला नाही |असे म्हणून जो वयोव्रुध्द मनुष्य वयाने धाकट्या अश्या ज्ञानवान् माणसाचा अपमान करील त्याला शहणपण नाही असे समजावे |गुणा शिवाय नुसता वयाचा वडील पणा व्यर्थ होय|ह्याचा अनुभव थोर पणी पटतो तथपि धाकट्या ने वडिलांन मान द्यावा आणि वडिलांनी ही खरे वडिल पण कशांत आहे हे समजुन घ्यावे|नाही तर पुढे कष्ट भोगावे लागतात |
Anonymous - May 3, 2011
आता पुढे..
||श्रीराम जय राम जय जय राम||
तो जेथे जाग्रुत झाला तेथील महात्म्य वाढत जाते हे प्रगटच आहे |ह्या साठी कोणी ही झाले तरी

विचारांनी शहाणापण विवेक पूर्ण व्यवहार शिकले नाही तर वजन पडत नाही |वजन नाहीसे झाले म्हणजे सारेच आटोपले |मग जन्माला आल्याचा काय उपयोग ? अश्या रितीने मूर्खपणा चालुन येतो |असे कोणी ही करु नये |सारे वय सार्थकी लावावे |हे नीट कळत नसेल तर ग्रंथ पाहुन त्याचा विचार करावा |जो अनेंक जणांना मान्य झाला तो शहाणा झाला असे समजावे |लौकीकात राहून जो आपले हित करुन घेत नाही तो आत्म घातकी |ह्या सर्व गोष्टी ओघा ओघाने साधकांना समजवण्याचा प्रयत्न केला आहे |पटत असेल तर त्यांनी आनंदाने घ्यावे व नसेल पटत तर एका बाजुला ठेवावे |



Anonymous - May 9, 2011
आता पुढे..
प्रुथ्वि पासून झाडे व झाडां पासून लाकडे होतात आणुइ लाकडे जळून राख होऊन पुन्हा: प्रुथ्विच बनतात|प्रुथ्वि पासून वेल होऊन वाढतात , त्यांची पाने फुले वगैरे| पदार्थ पसरतात नंतर ते सारे वाळून कुजुन पुन्हा प्रुथ्विच होते |जे जे जेथे जेथे उत्पन्न होते तेते त्याच ठिकाणी लय पावते | अशा प्रकारे पॉच भूतांचा नाश होतो |जे उत्पन्न होते ते लयास जाते |त्यानंतर ही शाश्वत रुपाने जे उरते ते पर ब्रह्म असत |ते परब्रह्म जो पर्यन्त कळत नाही तो पर्यन्त जन्म मरण चुकत नाही | जव आहे हे सत्य हा पूर्व पक्ष आहे व नाहीसे झाले म्हणजे मिथ्या आहे हा सिध्दान्त आहे |ह्या दोही पक्षा हुन निराळे असे घन्दाट भरलेले आहे ते परब्रह्म असत |मायेचा पूर्ण पणे निरास झाला म्हणजे खरे आत्मनिवेदन होते |त्या ठिकाणी वाच्यांश उरत नाही म्हणजे बोलणे खुंटते |असे ते विज्ञान शब्दांनी कशे समजुन घ्यावे ? जगाच्या बोलण्याच्या नादी जो लागतो तो संशयातच बुडतो |ह्या साठी विचार केलेलाच करीत जाऊन अनुभव घ्यावा |



Anonymous - May 9, 2011
त्रिगुण..
त्रिगुण..
प्रक्रुति व पुरुष ह्या दोघांनच्या अनुरोधाने त्रिगुण वागतात |अंतरात्मा एक असून ही अनेंक रुपे धारण करता झाला पण अनेंक रुप धारण करुन ही त्याचा एक पणा मोडला नाही |सर्वत्र एकच अंतरात्मा असून दोहोपाधि मुळे तो अनेंक व भिन्न वाटतो पण वाटला तरी सर्वांतर्यामी तो एकच

आहे |जगदंतरा मध्ये आपणच अंतरात्मा रुपाने भरलेले आहोत असे कळून येऊन आपली आपल्याला भेट होते |जे अंतर्निष्ट [अंतर्मुखी] असतात ते जाणतात |त्यांची कोटि श्रेष्ट असते | सद्गुरुंच्या मनाशी सच्छिष्याचे मन मिळाले की निरंजन जे परब्रह्म त्याचे दर्शन घेऊन ते येतात आणि चंचळाचा फ़ेरा ओलांडून पलीकडे जातात |एकदा त्या परब्रह्माचे दर्शन झाले की मग ते अखंड आपल्या जवळच आहे असे असते |पण मात्र ते चर्म चक्षुंनी कधी ही पाहतां येत नाही | अंतरात्मा अनेंक शरीरा मध्ये चंचळपणाने अखंड चळ्वळ करीत अस्तो |परब्रह्मा हे सर्वत्र निश्चळ आहे|चंचळ एकीकडे असले तर दूसरी कडे नसते |चंचळ सर्व ठिकाणी पुरे पडणे शक्य नाही |ज्या ठिकाणी सारासार विचार नाही तेथे सगळा अंधार पडतो |



Anonymous - May 12, 2011

चातुर्याची लक्षणे

पित म्हणजे पिवळा हिरडा , त्याज पासून क्रुष्ण म्हणजे काजळ किंवा काळी शाई होते आणि त्या शाई चा वेदपुराणादि ग्रंथ रुपाने सर्व जगभर विस्तार होतो |शाई नसती तर ग्रंथ नसते |मग मनुष्यास ज्ञान झाले नसते |शाई ही एक साधी वस्तु परंतु तिच्या मध्ये [तिच्या द्वारे] सर्व ज्ञान एकत्रित झाले आहे |लेखणी व शाई मिळून लिहिण्याचा सर्व कारभार सुरु झाला |श्वेत [पांढरा कागद] अश्वेत बोरु [कलम, पेन] ह्या दोघांची गांठ पडून मध्ये काळी शाई मिसळली आणी तिघांच्या संयोगाने इहलोकी चे मनुष्याचे लेखन वाचनदि व्यवहार अर्थबोश वगैरे सुरु झाले | आपल्या मनांत असलेला पीळ पेंच व वाकडे पणा हा जर पुष्कळ वाढवू लागला तर तो शहाणा कसा ? त्याला लोकांचे समाधान करता येत नाही |वेड्यास शहाणे करावे तसच जन्मास आल्याच सार्थक उगीच वादाच्या बाजु वाढवीत बसणे हा मूर्खपणा असतो |आपल्या प्रति पक्ष्याशी मिळून जाऊन त्याला आपल्यांत मिळवुन घ्यावे |आधी आपण कमी पणा घेवुन योग्य समयी त्याला उलथुन टाकावे , पण विवेक बळाने आपल्या विचारांचा थांग लागु देऊ नये |जो दूसरयांचे कल्याण व्हावे असे इच्छीतो तो कधीच कोणाचे ही वाईट करीत नाही|पुष्कळ जण खुप बड-बड करतात पण प्रत्यक्षांत करुन दाखविणे फ़ार कठिण आहे |दूसरयाचे टक्के टोणपे सोसावे , नीच शब्द ही सहन करावे म्हणजे अखेर पश्चाताप पावून प्रतिपक्षी आपणांस येऊन मिळतात |प्रसंग समजुन बोलत असावे पण आपल्या कडे जाणते पणाचा अभिमान किंचीत ही घेवु नये |ज्याला जे पाहिजे ते त्यास तात्काळ द्यावे म्हणजे श्रेष्ठता व सर्व मान्यता प्राप्त होते |अशा प्रकारे जो जगा मध्ये सर्वांना वंद्य झाला त्या पुरुषाला सामन्य म्हणू नये |अशा पुरुषाशी किती तरी लोक एक निष्ट असतात |अशी ही चातुर्याची लक्षणे आहेत |चतुर पणाने दिग्विजय करावा |मग जेथे- जेथे जावे

तेथे-तेथे त्याला काय कमीपडणार ? सर्वच अनुकूलच असणार |एकुण किर्तीदायक महंती कशी करावी ह्याचे वर्णन हे आहे |



Anonymous - May 18, 2011
आता पुढे..
निश्चळ अश्या परब्रह्मा च्या ठिकाणी सूक्ष्म पणाने जे चंचळ स्फुरण झाले ती ही मूळ माया असते |तीच पुढे अनेंक विकारांचे मूळ आहेत |निश्चळ परब्रह्मा च्या ठिकाणी जे चलन झाले तेच वायू चे स्वरुप असत |



Anonymous - Jun 7, 2011
आता पुढे..
तीच मूळ माया असते |तिच्या ठिकाणी त्रिगुण व पंचभूते अशी अष्टधा प्रक्रुति असते |एखादा वेल पाहिला तर त्याच्या मुळ्या फ़ार खोल गेलेल्या असतात पण पाने , फ़ुले , फ़ळे वगैरे जो विस्तार होत जातो तो सूक्ष्म रुपाने त्या मुळ्यात च असतो |ह्या शिवाय अनेंक रंग आकार विकार स्वाद आतील रचना मूळ मधे असते |ते मूळ फ़ोडून पाहिल्यास त्यांत वरील प्रकारा पैकी काहीच नसत| झाड जस जसे वाढू लागते तस तसे सर्व प्रगट होऊ लागते |हा वेल अधोमुख वाढत जाऊन फ़ोफ़ावुन जगांत विस्तार पावतो |तसच मूळ मायेच असत |पंचभूते व तीन गुण तिच्या मध्ये सूक्ष्म रुपाने आहेत हे निश्चित पण हे अनुभवाने व विवेकाने पहावे |हा स्रुष्टि रुपी अखंड वेल सतत पुढे वाढत असतो |अनेंक विकारांनी त्याला शोभायमान करण्याचा प्रयत्न केला जातो |अनेंक फ़ळे पडतात पुन्हा नवीन येतात |अशा अनेंक घडा मोडी सदोदीत चालु असतात |फ़ूला फ़ळा ची ही तीच गत होते |त्यावर अनेंक जीवांचा निर्वाह होतो |प्रत्यैक जीव जातो येतो पुन्हा जातो पुन्हा येतो | अशा प्रकारे येर झारया करीत असतो |ते आत्म ज्ञान आपल्या अंत:करणांतच आहे |पण ते सर्वांना कसे कळणार ? शरीर भेदाने होणारे विकार वेगळे असतात |एका बोटाची वेदना दूसरया बोटाला होत नाही |अवयवांची हीच स्थिती आहे |जाणीव रुप आत्म्याच्या ठिकाणी भेद नाही | आत्म्याच्या ठिकाणी जो भेदभाव दिसतो तो भिन्न - भिन्न प्रक्रुति मुळे भासतो|शहाणे व धूर्त असतात त्या पासून ऐकुन दूसयांच्या अंत:करणांची परीक्षा करतात व गुप्त रुपानेच सगळे समजुन घेतात |जो पुष्कळांचे पालन करतो तो पुष्कळांचे अंत:करण जाणतो |




Anonymous - Jun 7, 2011

विवेकाने देवाला शोधावे

नित्य स्मरण [ज्ञान] म्हणजे देव व नित्य विस्मरण [अज्ञान] म्हणजे दानव आणि कांही स्मरण कांही विस्मरण म्हणजे मानव अस असत |दूसरयाच्या अंत: करणांशी आपले अंत:करण एकरुप करुन त्याचे मनोगत जाणावे |

रेणु पेक्षा ही बारीक असणारया किड्यांचे आयुष्य अगदीच थोडे असते |त्यांची युक्ती व बुध्दि ही सूक्ष्म असते

|असे अनेंक जीव जन्तु जे डोळ्याला दिसत ही नाही पण त्यांच्या मध्ये ही अंत:पंचकाची व्यवस्था असतेच |त्या मुंगी सारखी लहान मोठी शरीरे पुष्कळ आहेत आणि त्या सर्वात अंतरात्म्याची वस्ती आहे |जेथे जीवन [पाणी] आहे तेथे जीव असावयाचेच हा स्रुष्टि चा स्वभाव आहे |परमेश्वराच्या लिलेची धन्य असोत |मनुष्या च्या अंत:करणांला तिचे काहीच अनुमान करतां येणार नाहीत पण दुष्ट अहंकार जीवाला उगीच नाचवीत असतो ! ह्या साठी अहंकार सोडून देवाच्या कित्येक क्रुतिचे विवरण करावे पण ते करायला सुध्दा मनुष्याचे आयुष्य फ़ार थोडे आहे |शरीर व संपत्ति ही दोन दिवसाची आहेत |जन्म मूत्यु काळी सगळे दीन बनुन जातात |सजुन धजुन देह वस्त्रालंकारांनी उभा केला तरी शेवटी मरण काळी उघडे च पडते |मग सर्वत्र त्याची दुर्गन्धी सुटते | जो कोणी विवेकाच्या योगाने परमार्थाच्या मार्गात शिरतो तोच धन्य असतो |अहंतेचे बंड मोडून विवेकाने देवाला शोधावे हे सर्वात उत्तम असते |



Anonymous - Jun 9, 2011


शरीर अंतरात्म्या सह पंच तत्वां

हे शरीर अंतरात्म्या सह पंच तत्वांचे बनलेले आहे पण देह वाढत जातो त्याच्या बरोबर देह बुध्दि वाढत जाते हे सगळेच मोडते |सर्वाहुन वडील अंतरात्मा आहे हे सिध्द झाले |त्याला जो जाणीत नाही तो दुरात्मा असतो |दुरात्मा म्हणजे ज्याला अंतरात्मा दुरावला असतो , अंतरल असतो |तो अंतरात्मा जवळ असून ही मनुष्याला सापडत नाही कारण त्याला त्याचा अनुभव घेण्याची गोडी नसते |त्या अंरात्म्या मुळेच प्राणि जन्माला येऊन त्याला न ओळखल्या मुळे व्यर्थ जातो | अंतरात्मा देव असतो |त्याच्याशी एकरुप झाले म्हणजे मग ह्या प्रक्रुतिच्या स्वभावांत बदल होऊ

लागतो |तो सर्वांचा वडील अंतरात्मा जेथे प्रकाशीत होतो तोच भाग्यवान व्यक्ति खरा |त्या नारायणा ला ध्यानां मध्ये अखंड स्मरावे व त्याची लक्ष्मी [प्रक्रुति] त्याज पासुन जाईल कोठे ? ह्या वरुन उपासना म्हणजे काय ह्याचा शोध घेतला तर तिचे स्वरुप दिसुन येते |देवाची लिला देवा शिवाय दूसरा कोण पाहणार ? पाहणे हे सुध्दा देवाचेच रुप असते | ह्या प्रमाणे अंतरात्मा कोणत्या स्थळी नाही ? म्हणून राम सर्वत्र भरलेला आहे |उपासना इतकी व्यापक आहे की तिचा अनुमान करता येत नाही |मूळ मायेच्या पलिकडे असणारे जे निर्मल ब्रह्म आहे तेथे ती उपासका ला नेऊन सोडते|सर्व काही जीवांच्या कर्मानुसार देवाला सारेच करावे लागते |घेण्या सारखे असेल तेवढे घ्यावे |आपल्या अधिकारा प्रमाणे आपण चालावे हे बरे असते|शास्त्र प्रचिती व आत्मप्रचिती ह्यात , आत्मा प्रचितीचे प्रमाण मुख्य आहे | ह्या साठी पंचीकरणाने पिंड ब्रह्मांडाचा विचार क्रुन तो विचार ही सोड्न द्यावा आणि हितक्र असा विवेक पहावा |मुख्य अर्थ हा की त्या अंतरात्म्याशी अनन्यता झाल्यास प्रक्रुतिचा स्वभाव पालटुन भाग्य प्राप्ति होते |



Anonymous - Jun 9, 2011
आता पुढे..
आपल्या कर्माचे फ़ळ आपल्याल्याच निश्चये करुन भोगावे लागतात |जगदीश्वर प्रसन्न झाल्या नंतर आत्म स्वरुपाच्या प्राप्ती बद्दल कोणाला संशय राहील ? विचारी असतील त्यांना हाविचार कळेल |ज्या ज्या विचारी व्यक्तिंना पुरुषार्थ समजला त्यांना-त्यांना नि:संगता प्राप्त झाली |जे देहाभिमानी राहता ते देहाभिमानच धरुन बसतात |शाश्वतताचा शोध घेत गेल्या मुळे ज्ञानी हा खरा ज्ञानी म्हणजे ज्ञान स्वरुप होतो आणि विकार नाहीसे होऊन निर्विकार परब्रह्म स्थितीत जातो |शेवट पर्यन्त जाऊन जो निश्चळ परब्रह्माला पावला अशा ज्ञानी माणसाला हे चंचळ व जड काही बाधा करीत नाही |माया मिथ्या असे कळले विचारा ने ते ज्ञान सद्रुढ झाले |म्हणजे मग सगळे भय एक्दम नाहीसे झालेसे वाटते |अंतःकरणांमध्ये विवेकाने सर्व काही उमजुन घेऊन उपासकाने उपासना वाढवावी |
||श्रीराम जय राम जय जय राम ||



Anonymous - Jun 10, 2011
दशक १६ वा.................

दशक १६ वा.................

मोठे-मोठे रुषि होऊन गेले ; त्या पैकी पुष्कळांनी काव्ये ही केली आहेत , पण वाल्मिकी सारखा कविश्वर मागे झाला नाही व पुढे होणार ही नाही | पूर्व वयांत त्यांच्या हातुन क्रुर कर्मे झाली पण पुढे ते राम नामाने पावन झाले | द्रुढ निश्चयाने राम नामाचा जाप करतां -करतां त्यांचे पुण्य अपार वाढले | वाल्मिकीनी ज्या ठिकाणी तप केले ते वन अत्यंत पावन झाले | त्यांच्या तपोबळाने वाळलेल्या काष्ठाला अंकुर फ़ूटले | हा पूर्वि माणसे मारणांरा वाल्ह्या कोळी होता|


Anonymous - Jun 12, 2011

आता पुढे..

अता पुढे ...

तोच पुढे सर्व देवांना व रिषिश्वरांना वंद्य झाला| वैराग्य व पश्चाताप ह्यांच्या पुढे पाप कसे उरणार ? देहान्त व्हावा इतक्या खडतर तपश्चर्येने त्याच्या पुण्य रुप असा पुनर्जन्म झाला | पशचातापाने जे एकदा आसन घातले ते शरीराचे वारुळ झाले तरी झाडले नाही | वाल्मिकी म्हणजे वारुळ | त्या वरुनच त्यांच नांव वाल्मिकी पडल | राम यश गायना मधे दंग होऊन त्यांनी आपल काळ सार्थकी लावला | वाल्मिकी प्रमाणे धैर्य व साधना निष्टा असावी |

सूर्याचे अधिष्टान डोळे नसल्यास सर्व लोक आंधळे होतील व म्हणून सूर्या वाचून काहीच व्यवहार चालत नाही | बुध्दि थंड म्हणजे तेज हीन झाल्यावर मग मति प्रकाशित कशी होईल ? सूर्याचा प्रकाश उष्ण असतो व चंद्रा चा प्रकाश थंड असतो | देहांत उष्णता नसेल तर देह पडतो | म्हणून सूर्या वाचून काहीही कार्य सहसा होत नाही | दिवस नसेल तर अंधार होऊन सारयाचा सारा सार विचार नाहीसा होईल | दिवसा शिवाय रात्री चोर व दिवा भिते मात्र वावरत राहतात | अशा सूर्या पुढे उपमा द्याव्यायला दूसरे कोण आणावे ?



Anonymous - Jun 12, 2011

आता पुढे..

ही प्रुथ्वि धन्य होय | हिचा महिमा किती सांगावा ? जेवढे म्हणून प्राणि आहेत तेवढे तिच्या आधाराने राहतात | कित्येक जीव आकाशांत राहतात हा सुध्दा प्रुथ्विचाच धर्म असतो | कां की ज्याचे देह जड नसले तर ते कसे वांचले असेल ? देव , दानव , मानव , सारे प्रुथ्वि वरच राहतात | अनेंक रत्ने , धातु , द्रव्ये वगैरे बहुमोल पदार्थ प्रुथ्विच्या पोटांत आहेत | नाना विध रत्नांनी सम्पन्न अशी ही प्रुथ्वि आहे | तिच्या सारखी दूसरी कोणती वस्तु आहे ? ती जिकडे तिकडे अफ़ाट पसरलेली आहे | देशोदेशीच्या अनेंक वनस्पति व अनेंक धान्ये इतकी भिन्न-भिन्न आहेत की एका सारखे

दूसरे एक ही सापडत नाही |असा प्रुथ्विचा महिमा आहे |तिला दूसरी कशाची उपमा द्यावी ? ब्रह्मादि देवा पासून आमच्या पर्यंत सर्वांना तिचाच आधार आहे |



Anonymous - Jun 20, 2011
आता पुढे..
आतां सर्वांचे जन्म स्थान व सर्व जीवांचे जीवन , ज्याला आपोनारायण असे म्हणतो , प्रुथ्विला सप्त सिंधूच्या पाण्या च्या आवरणाचा आधार आहे |अनेंक मेघातले मेघोदक प्रुथ्विवर पाहात असते| अनेंक प्रदेशांत भिन्न प्रकारचे पाणी आहे |एकाहून एक पवित्र व पुण्यदायक व ज्याचा महिमा शास्त्र कारांनी फ़ार वर्णन केला आहे अशी अनेंक तीर्थे ही आहेत |ह्या अनेंक तीर्थातील पुण्य जले , तसेच कोठे थंडगार पाणी आहे तर कोठे -कोठे उष्णोदके म्हणजे उन्हाळी आहेत |अनेंक प्रकारचे रस आहेत |मोत्ये व रत्ने व शस्त्रे ह्यावर झळकणारे पाणी असे पाण्याचे अनेंक गुण आहेत |शोणीत , शुक्र लाळ-मुत्र , घाम असे पाणी |असे पाण्याचे अनेंक प्रकार आहेत |प्रुथ्विवर चहूं कडे पाणी धांवते तेव्हा त्याचा ध्वनी ही किती सुन्दर असतो ? धो-धो धारा पडत असतात |जमीनीच्या पोटांत मोठ मोठे डोह भरलेले असतात |




Anonymous - Jun 21, 2011
अग्नि परम धन्य
विश्वाचे पोषण करणारा असा हा अग्नि परम धन्य असतो |मुखाने भगवान [हविर्भाव] हविष्यान्न ग्रहण करतात |यज्ञ यागादि प्रसंगाने तो रिषिना सुफ़ल दायक होतो |असा हा अग्नि आहे |म्हणून सर्व स्रुष्टि चालते , लोक भोजन करुन त्रुप्त होतात व अग्नि अंगात आहे म्हणून सर्व लहान थोर प्राणि जीवंत राहतात |दिवे दिवट्या वगैरे अनेंक प्रकारचे प्रकाश सर्वत्र अग्नि मुळेच मिळतात |पोटांत जठराग्नि आहे म्हणून लोकांना भूक लागते नाही तर लोक मरुन जातील |सर्वांच्या घरांतील अग्नि वैश्वानर पवित्रच आहे |अग्नि त्रुप्त झाला म्हणजे मग सुप्रसन्न होतो |देव दानव व मानव ह्या सर्वांचे सारे व्यवहार अग्नि मुळे चालतात |सगळ्या लोकांना अग्नि हाच उपाय आहे |अग्नि सर्व ठिकाणी आहे पण जोराने घर्षण झाले म्हणजे प्रगट होतो |अनेंक उपाय किंवा अपाय दोन्ही ही अग्नि मुळेच होतात |विचारांवाचून सर्व व्यर्थ असत |प्रुथ्विवरील लहान थोर सर्वांनाच अग्निचा आधार आहे |अग्नि च्या यज्ञा हुति टाकल्याने परमेश्वर प्रसन्न होतो |मनुष्य जीवंत आहे

तोवर अग्नि नाना सुखे देतो | मेल्यावर प्रेत जाळून भस्म करीतो | सर्व भक्षकच तो ! अग्नि ला चार शिंगे , तीन पाय , दोन मस्तक , व सात हात असतात | अस्त्रे शास्त्रात वर्णन केले आहे | ते काय अनुभवा वाचून केले आहे कां ? मुख्यार्थ हा की अग्नि तत्व , देवता स्वरुप आहे |



Anonymous - Jun 22, 2011
हा वायूदेव .............
हा वायूदेव .............
धन्य होय ! ह्याचा स्वभाव विचित्र असतो |ह्याच्या मुळे सगळे जीव जगांत वावरतात | श्वासोच्छवास करणे विद्याभ्यासादिक क्रिया करणे कींवा शरीराची हाल-चाल करणे हे सर्व वायू मुळेच असत | चलन, वलन , प्रसारण, निरोधन , आक्रंचन , हे वायू पांच प्रकार चे असतात | [१] प्राण वायू [२] अपान वायू [३] व्यान वायू [४] उदान वायू [५] समान वायू | हे वायू चे प्राण पंचक असतात | आतां वायूचे प्राण __ पंचक पहावे _ प्राण हा जीवाच्या ह्रदय स्थनी असतो | दीवस रात्र २१६०० श्वासोच्छवास हे ह्याचे कर्म | नागादि पंच उप प्राण आहेत | नागापासून ढेकर येतो , कूर्मा पासून डोळ्यांची उघडझाप होते , क्रुकला पासून शिंक येते | देवदत्ता पासून जांम्भाई येते व धनंजय शरीर पुष्ट करितो व प्रेतांत असून ते फुगवतो | वायु आधी ब्रह्मांण्डात प्रगट झाला | नंतर ब्रह्मांड देवास पुरुन मग पिंडा मध्ये अनेंक प्रकार ने प्रगट झाला | सर्व पक्षी हालचाल करतात ती वायू मुळेच अग्निचे लोट उठत असतात | वायू मेघांत वाफ़ भरुन तयार करतो आणि लगेच त्यांना धक्के देऊन दूर करतो | तेहतीस कोटि देव अठ्ठ्यांशीहजार रिषि, सहस्त्रावधि सिध्द योगी हे सर्व वायु मुळे आहेत | हनुमंत हा वायु चा पुत्र हे तर प्रसिध्दच आहे | बाप लेकांत भेद नाही | म्हणून दोघे ही पराक्रमांत अगदी सारखे आहेत | हनुमंताला प्राणनाथ म्हणतात ह्या वरुन त्याचे सामर्थ्य सिध्द आहे | प्राणां वाचून सर्व व्यर्थच आहे | हनुमंताला मूर्च्छना येऊन त्याचा म्रुत्यु झालासे वाटले होते , तेंव्हा वायु देवाने ब्रम्हंडातील सर्व प्राण आकर्षण केला त्या मुळे देवांवर प्राणांत प्रसंग ओढवला | नंतर सर्व देवांनी मिळून वायू ची स्तुती केल्यावर वायू ने प्रसन्न होऊन सर्वांना मोकळे केले | म्हणून वायू हा मोठा प्रतापी आहे | त्याचा मुलगा हनुमंत तो ईश्वरी अवतारच ; त्याचा पराक्रम पाहुन देव सुध्दा चकित झाले |



Anonymous - Jun 26, 2011

आता पुढे..
पूर्वि सांगीतलेले आहे की प्रुथ्विचे मूळ पाणी पण्याचे मूळ अग्नि व अग्निचे मूळ वायु असतो | आतां वायूचे मूळ पहा -- वायू चे मूळ अंतरात्मा असून तो सर्वात आहे व अतिशय चंचळ आहे | तो येतो जातो पण दिसत नाही स्थिर ही राहत नाही |ब्रह्माच्या ठिकाणी जे मूळ स्फ़ूरण कींवा आदि संकल्प झाला तेच अंतरात्म्याचे स्वरुप असत |जगदीश्वर तोच असतो |त्याच्या पासून पुढे सत्व - रज - तम हे तीन गुण झाले |त्या आकाशाच्या प्रकाशाने सर्व काही होते |"ऐको विष्णूर्महद्भूतम्" |असे त्या आकाशाला [अंतरात्म्याला] म्हणतात |आत्मा दिसत नाही सांपडत नाही, पण त्याच्या वाचून एक ही काम होत नाही |तो गुप्त पणाने अनेंक विचार पाहून टाकतो | अनेंक शरीरांत तोच लिला करतो |विवेकी लोकांना तो जगदंतरांत आहेसे भासतो |आत्म्या वाचून देह चालेल असे कधी कल्पांती घडावयाचे नाही |मूळ माये पासून शेवट पर्यन्त -- एखाद्या जीव जन्तु परय्न्त सर्व काही आत्माच करीतो |आत्म्याच्या पलीकडे फ़क्त निर्विकार परब्रह्म आहे | आत्मा हा शरीरांत वागतो , इन्द्रियांनां चलवितो , देह संगति ने अनेंक सुख-दुख भोगतो |सात आवरण युक्त पिंड ह्या सर्वाहून आत्मा श्रेष्ठाअहे |तो विवेकाने जाणावा |तो शब्द ऐकतो व त्याचा अर्थ समजतो , समजुन त्याला उत्तर देतो |



Anonymous - Jun 26, 2011
आता पुढे..
त्वचेने कठिन , नरम , शीत , उष्ण , इत्यादि जाणतो |डोळे भरुन पदार्थ पाहतो , श्रेष्ट कनिष्ट कोण हे मनांत समजून घेतो |जेजे कळ्ते तेते स्प्ष्ट करुन सांगतो |जेव्हेच्या योगाने रुचि घेणे , बोलणे , हाताने घेणे देणे , नाकाने वास ओळखणे पायाने ये जा करणे , शिस्नाने भोग घेणे गुदाने मलोत्सर्ग करणे इत्यादि क्रिया नित्य चालतात , ह्याची यथा सांग कल्पना मनाने हा अंतरात्माच करुन पाहतो| करावा म्हटले तर त्याच्या सारखा दूसरा पदार्थ नाही सांगणारा , ऐकणारा तोच आहे| त्या आत्म्याचा व्याप अवर्णनीय आहे |अनेंक मते , अनेंक भेद आभूषणे [संवाद] वाद - विवाद त्यातील अनेंक प्रकार चे भेदाभेद ह्या सर्वाचा निर्णय आत्माच करतो |ह्या सूक्ष्म देहांतील गुंतागुंत समजुन घेतली पाहिजे |शूलाच्या द्रुष्टि ने भेद वाटतो |पण सूक्ष्मा मध्ये सगळे एक्रुप [अभेद] आहे |हे बोळणे निश्चित पणे अनुभवास येते |



Anonymous - Jun 27, 2011
आता पुढे..
पुरुषाच्या इच्छे मध्ये प्रक्रुति चा वास आणि प्रक्रुति मध्येच पुरुषाचे व्यक्त रुप असते |ह्या वरुन प्रक्रुति पुरुष अस म्हणतात |अनेंक प्रकारचे उद्योग , गडबडी , लटपटी , झटापटी हे सर्व आत्म्या मुळे चालते |आत्मा नसेल तर सर्व सपाट, शून्य जड होईल |आत्मा नसेल तर शरीर वेडे वांकडे होऊन विचारे मढे बनते , प्रत्यक्ष त्याचे थडगे होते |आत्मज्ञानी पुरुष मनांत हे समजून लोकांमध्ये अंतरात्म्या ला पाहतात |घर असो वा त्रिभुवन असो आत्म्या वाचून ते ओस [ शून्य] असत |तो सर्व शरीर भर तत्पर व सावध असतो |अनेंक भेद , वेध , [चिंता] खेद व आनंद त्याच्याच मुळे आसतात |आत्मा भासत नाही बाह्य आकाराने त्याचे अनुमान करतां येत नाही |देह व आत्मा ह्याच्या संयोगाने जी--जी कार्ये होतात त्याचा सूक्ष्म शोध घेतला पाहिजे म्हणजे अंतरात्म्या विषयी कांहीसे अनुमान करतां येते |



Anonymous - Jun 27, 2011
प्रश्न --उत्तर --
ह्या प्रुथ्वि मध्ये अनेंक लोक आहेत व त्यांच्या अनेंक उपासना आहेत |भावा प्रमाणे लोक ठायी-ठायी भजनाला लागतात |अनेंक प्रकारे स्तुति स्तवने करुन लोक आपापल्या देवाचे भजन करतात व जो तो आपल्या उपासनेला निर्गुण म्हणतो |ह्याचा मेळ कसा घालावयाचा ? अस श्रोत्याने प्रश्न केला ? त्यातील तात्पर्य मला सांगावे ? समर्थांनी सांगीतले----- अरे , हा स्तुतीचा स्वभाव असाच असतो |त्यांत काहीही बिगडते असे नाही |निर्गुण म्हणजे बहुगुण व बहुगुणी आहे एक अंतरात्मा |सर्व देव व प्राणि मात्र त्याचेच अंश आहेत हे निश्चीत |म्हणून कोणत्या ही देवाला आपल्या अधिकारा प्रमाणे , कोणी ही भजला तरी सर्वांचे मूळ जो अंतरात्मा त्याचेच ते भजन होत असल्या मुळे त्याला मान्यता द्यायला तुझे काय जाते ? तात्पर्य आपल्या उपास्य देवांचे भजन करीत असतांना आम्ही निर्गुणाला भजतो असे सगळेच म्हणत असले तरी त्यांत हानि कोठे आहे ? सगळ्या लोकांचा संतोष केला तरी तो एका अंतरात्म्यालाच पोहोचतो |तथापि अधिकाराचा कमी जस्त पणा पाहीला पाहिजे |श्रोता म्हणतो --- येथे जरा संशय आहे |झाडाच्या मुळाशी पाणी घातले की ते पानापाना पर्यन्त पोहोचते |हा प्रत्यक्ष अनुभव आहे |समर्थ म्हणतात --------- तुळशीवर पेलाभर पाणी घातले की ते वरती क्षणभर ही न थांबता मूळांकडे च जमिनीत मुरते | पुन्हा प्रश्न --------लहान झाडावर पाणी घातले तरी ? वडा सारख्या मोठ्या झाडा वर पाणी कस घालणार ? उत्तर -------- हातच पोहोचत नाही तेथे काय करणार ? पण पावसाचे पाणी मोठ्या

झाडावर पडते नां ? ते तर मूळां कडे च धावत येते | आतां मूळ सापडण्यां इतके पुण्य सर्वांच्या च जवळ कोठुन आसणार ? तथापि ब्रुक्षाच्या द्रुष्टांता वरुन झाडावर पाणी घातले तर कोठे जाते ह्यात काहीच अडचण नाही | अर्थात् समर्थ म्हणतात की कुठल्या ही देवा ची आराधना करा तुम्ही शेवटी मुळा कडेच जाल | तेव्हा मनांत कुठला ही किन्तु न ठेवता भक्ति करावी |



Anonymous - Jun 27, 2011

आतां एक प्रश्न राहिला

आतां एक प्रश्न राहिला | लोक सगुण उपासनेला निर्गुण उपासना कशी म्हणतात ? उत्तर ------ विवेकाच्या योगाने शहाणपण शिकुन एखदा मनुष्य राजा झाला आणि एखद्या सेवकाचे नांव राजा असले म्हणून त्या दोघांची बरोबरी होत नाही | ह्याचा विचार करा | सगुणाला निर्गुण म्हटल्याने सगुण काही निर्गुण होत नाही किंवा कोणी कौतुकाने तसे म्हटले च तर त्यांत काही सगुण पणाची हानी ही होत नाही | कल्पांत प्रळयाच्या तडाख्यातुन जे उरते त्याला निर्गुण परब्रह्म म्हणतात | त्या निर्गुण ब्रह्मा खेरीज सगळे माये मध्येच येते | आतां जगांत अनेंक उपासना असल्या तरी शब्दांतच जोवर घोटाळत आहेत तोवर त्यांत निवडानिवड कशी करावी ?

विस्मरण आणि स्मरण व्यवस्थित पणा आणि बाष्कळपणा अनुभव आणि अनुमान ह्यांची स्रुष्टित झालेली सर मिसळ वेगवेगळी कशी काढावी ? होणारे जाणारे आणि शाश्वत ह्यातील निर्णय विवेकाने वाचून कसे कळेल ? ह्या सर्वांतील सारासार विचार स्पष्ट कळाला पाहिजे | पंचभूतांच्या योगाने जग चालते | सारी चळवळ त्यांची आहे | पंचभूते नाहीशी झाल्यावर मग राहीले काय ? आत्मा नसेल तर म्रुत्यु येतो | त्या शिवाय जगणे शक्य नाही | म्हणून कोणीही असला तरी त्याने जगदीशाचे [अंतरात्म्याचे] भजन करावे | माझी उपासना प्रकट झाली की हा आत्म विचार मला कळतो | म्हणून देवाची प्रप्ति करुन घेण्याचा विचार केला पाहिजे | उपासन च्या पाठिंब्या वाचून वाटेल तेवेढे प्रयत्न केले तरी यश मिळणार | समर्थ [आत्माराम] जर पाठी चा राखा नसेल तर तो भूते काय व कामादि विकार काय येऊन यथेच्छ ठोकतो | म्हणून तात्काळ देवाला ओळखून त्याचे भजन करावे | भजनादि साधनांच्या अभ्यासाने परलोकाची प्राप्ति होते , पण , रामदास म्हणतात ह्यावर श्रध्दा ठेवली पाहिजे |

॥श्रीराम जय राम जय जय राम ॥

Anonymous - Jul 10, 2011

दशक १७..

दशक १७..

निश्चळ ब्रह्मा पासून [मूळमाया] चंचळ आत्मा झाला | पंचभूते व त्रिगुण ह्यांच्या पलीकडचा आहे \

त्याला परमात्मा चितन्य , सक्षी ज्ञानात्मा , षडगुणेश्वर अशी नांवे आहेत | तो सर्व जगाचा ईश्वर आहे व त्याच्या पासून सर्व विस्तार [स्रुष्टि विस्तार ] झाला आहे | म्हणून त्याला जगदीश्वर म्हणतात | त्या परमेश्वराशी एक्रुप झाल्या शिवाय त्याचे अनुमान कोणालाच करता येत नाही | तो देव भेटावा म्हणून देवळे शोधावी लागतात |देवळे म्हणजे अनेंक शरीरे त्यां मध्ये जीवेश्वर हा देव राहतो | शरीरे अनेंक व स्रुष्टिचा मेरु मणि ज्यांची क्रुति एवढी थोर आहे असा तो अंतरात्मा दिसला नाही | म्हणून काय झाले ? त्यालाच जीवांनी आपला धनी म्हटले मानले पाहिजे | सर्वांचा उद्भव तो त्याच्या कडे तोंड वळविले की त्याचा आणि आपला अभेद आहे | त्याच्या कडे पाठ फ़िरवली की सारे दु:खच आहे | अशी त्याच्या संबधाने अध व उर्ध्व म्हणजे ब्रह्माशी विमुखता , सन्मुखता होते व जाते |




Anonymous - Aug 9, 2011

आता पुढे ....


आता पुढे ....

तो भव्य व भारी सामर्थ्य वान असून भासत नाही | स्थिर राहत नाही | असा हा परमात्मा अगाध आहे | त्याचा महिमा कोणाला कळणार ? सर्वोत्तमा ! तुझी लिला तुलाच ठाऊक | नित्या नित्य विवेक करुन इहलोक व परलोक हे दोन्ही साधले म्हणजे संसाराला आल्याचे सार्थक झाले | मनन शील लोकां जवळ अखंड परमेश्वर रात्र दीवस असतो | परमात्म्याशी ज्याचा अखंड योग झाला तो योगी खरा | ज्याला थोर पणा हाच की तो इतरांना ही सन्मार्गाला लावतो अर्थात् ज्याला पोहतां येते त्याने दूसरा कोणी बुडत असेल तर त्याला बुडु देऊ नये | स्थूळ व सूक्ष्म तत्वांचा शोध करुन पिंड ब्रह्मांडाचा विचाराने निरास करुन आत्मानुभव पाहणारा असा पुरुष या जगा मध्ये विरळा असतो | ह्या जगा मध्ये विवेकी लोकांची संगती चांगली | त्यांचे भाषण ऐकुन प्राणि मात्रांचा उद्धार होतो | तेथे सत्संगति व सच्छास्त्र श्रवण घडून सार्थकतेचे विवरण होते | व परोपकार करण्याचे उत्तम गुण आंगी जडतात | असे जे व्यक्ति आहेत ते परमेश्वरांचे अंश असतात | त्याच्या ठिकाणी सारासार विचार विशेष असल्याने त्यांच्या हातुन जगाचा उध्दार होतो आणि त्यांनी अहं कर्तुत्वाचा संग सोडल्या मुळे ते शाश्वत ब्रह्म स्वरुप होऊन जातात |



Anonymous - Aug 18, 2011

आता पुढे ....
आकाश किंवा अंतराळ ह्या सारखे ब्रह्म निर्मळ निर्विकार शुध्द व निराकार आहे |त्याचा अंतच लागत नाही म्हणून ते अनंत असत नाही , म्हणून संत असे ते नित्य शाश्वत व सर्व काळ आहे | परब्रह्म अविनाशी आहे आकाश आणि अवकाश ह्या प्रमाणेच ते तुटत नाही , फुटत नाही |ते स्वस्थ पणाने जसेच्या तसे च आहे |ते निरावलंबी म्हणजे त्याला कोणाचा ही आश्रय नाही |ते स्वयंभू आहे |ते अखंड आहे व निर्गुण आहे |उपाधि हुन निराळे असे ते परब्रह्म असत |स्थूळाचे मूळ वासना आहे परंतु स्थूळ देहाच्या साह्यावांचून कोणत्या ही गोष्टिचा विचार करता येत नाही| माणसांचा एक -एक जन्म हा एक -एक पडदा असतो|असे अनेंक पडदे आपण व ब्रह्म ह्या मध्ये असल्याने ब्रह्म स्वरुपाचा मूळचा विचार आपणांस कसा उमजणार ? जीव पुरुषांचे असोत वा स्त्रियांचे असोत ते एकच आहेत पण देह स्वभाव मात्र भिन्न-भिन्न आहेत |प्रितीच्या सूक्ष्म वासना अनेंक असतात त्या एकाच्या दूसरयास कळून येत नाहीत , बारकाईनें विचार केला म्हणजे काहीसे ध्यानांत येते |बाळाला आई वाढविते ते काम पुरुषा कडून होणार नाही |पण आई ला कंटाळा नाही , आळस नाही , त्रास नाही आई शिवाय इतकी ममता कोठेच सांपडणार नाही |अनेंक उपाधि वाढविणे मायेत गोवुन ठेवणे किंवा प्रपंचाची गोडी लावणे हे एक आईच करुं जाणे |पुरुषांचा स्त्री वर विश्वास असतो व स्त्री ला पुरुषाच्या संगतिने संतोष होतो |ईशवराने मोठे सूत्र केले आणि सोडवायला कठिण अशा लोभाच्या जाळ्यांत मनुष्य मात्राला गुन्तवून टाकले आहे |ह्या ठिकाणी शिव शक्ति चे रुप स्प्ष्ट पणे सांगीतले त्याचा श्रोत्यांनी नीट विचार करवा , जर श्रोत्यानी विचार केले नाही तर माझे बोलणे फुकट होईल |कारण मनना शिवाय ऐकणे व्यर्थ असते |




Anonymous - Aug 21, 2011
आता पुढे ....
श्रवणा मध्ये महत्वाचे श्रवण म्हणजे अध्यात्म श्रवण असत |ह्या साठी अध्यात्म ग्रंथचे विवरण करणे ते मन चांगले एकाग्र करुन करावे |मोक्षाचा साक्षात्कार निश्चिंत पणे मिळेल |अनेंक रत्नांची परीक्षा अथवा वजन करतांना अथवा उत्तम सोने मुशीत घालतांना सावध असावे लगते |एकांता मध्ये काही कारभाराच्या नाजुक गोष्टी बद्दल विचार करतांना अतिशय सावधपणा ठेवावा लागतो | त्याच्या कोटि पट सावधपणा व एकाग्रता बुध्दिची सूक्ष्मता , अध्यात्म ग्रंथा चा विचार विवरण करतांना असावी लागते |कथा ऐकल्याने आपणांस पुण्य लागते पण पुण्य काही दीसत नाही |श्रेष्ठ अध्यात्मा चा तसा प्रकार नाही |स्वत:ला त्याचा अनुभव येऊं लागला की संशयाचा पार नाश

होऊन जातो |युगानु युगे जो एकटा आत्मा तिन्ही लोक चालवित आहे त्याचा अनुभव येऊं लागला की संशय दूर लोटतो |तेव्हा अश्या आत्म्याचा पुन्हाः-पुन्हाः विचार करावा |



Anonymous - Aug 22, 2011
आता पुढे ....
ज्या ठिकाणी व्यापक आत्मा नाही तेथे सर्व सपाट होऊन जाते |आत्मा नसेल तर शरीरे बिचारे लांकूड , त्याला काय समजणार ? आत्म ज्ञान असे सर्व श्रेष्ट आहे |त्याच्या सारखे दूसरे ह्या जगांत नाही |विवेकी सत्पुरुषांना ह्यांचे महत्व कळते |जो कोणी विचाराने त्या पुरुषांना ह्याचे महत्व कळते |जो कोणी विचाराने जाईल त्या पुरुषाला आत्मा जवळच सापडेल |मूळ माया हा ब्रह्मांडाचा चौथा देह आहे त्याचा विवेकाने निरास झाला पाहिजे |आठ ही देवाहून जो वेगळा होऊन राहील तो साधु धन्य असतो |योगाने जे वर परब्रह्मा कडे चढत जातात त्यांनाच उर्ध्व गति होते |पदार्थ रमणीय दिसतात पण ते लगेच नसतात |पदार्थ ज्ञान म्हणजे अनेंक प्रकारचा संशय च |तो सर्व टाकून देऊन , निरंजन [निर्मळ] अशा परब्रह्मा चा शोध करीत जावा |अष्टांग योग व पिंड ज्ञान ह्या हून तत्व ज्ञान थोर आहे व तत्व ज्ञाना हुन , आत्मज्ञान श्रेष्ट , सर्वोत्तम असत ;म्हणून ते अवश्य पहावे |त्याच्या पली कडे केवळ निर्गुण , निर्मळ व निश्चळ असे ब्रह्म आहे |निश्चळ ,व निर्मळ आहे |पिंड ब्रह्मांडाचा प्रत्यक्ष संहार झाला की ते कळते |शाश्वत काय आहे ते उमजूं लागते |सगळ्या तत्वांचा पूर्ण निरास करुन सार काय व असार काय ह्याचा सावध पणाने निर्णय करावा आणि मग सुखाने ग्रंथ बाजुला ठेवा अर्थात् अध्यात्म श्रवण अति एकाग्रतेने करावे |कारण पदार्थ ज्ञानाहून आत्मज्ञान श्रेष्ट असते |




Anonymous - Aug 23, 2011
आता पुढे ....
.बहुत जनांच्या उध्दाराचे मार्ग कोणते ? कोणी मध्येच विचारले ? तेव्हा समर्थ म्हणाले _____ विषय संगति सोडून बोलु नये व श्रोत्यांच्या एखाद्या शंकेच समाधान केल पाहिजे आणिक आपल एका वेळच बोलणे दूसरया वेळेच्या बोलण्यास बाध न आल पाहिजे तरच विवेकी वक्ता म्हणवतो |भ्रमाला म्हणतो परब्रह्म व परब्रह्माला म्हणतो भ्रम आणि बोलताना मात्र डौल आणतो ज्ञातेपणाचा |अनुभवा शिवाय निरुपण करीत असतो |स्वतः ला ज्ञानी म्हणवुन घेऊन द्रव्यादि पदार्थाची ज्याला

भीड पडते तो बिचारा ब्रह्मज्ञान काय सांगणार ? सार काय व असार काय ह्यांचा निर्णय अंतःकरणांत बिंबला पाहिजे | जेथे सारा सार विचार नाही तेथे सर्व अंधार च असणार | कैफ़ चढलेला मनुष्य वाटेल ते बरळतो | त्या प्रमाणे अज्ञान भ्रमाने भुललेला हा मूर्ख सर्व ब्रह्म म्हणून बसतो आणि महापापी व सज्जनांना सारखेच मानतो | तोंडात घालावयाचा घांस अपानांत घातला तर कसे होईल ? ज्या-ज्या इन्द्रियाला जो-जो भोग योग्य तोच त्याला दिला पाहिजे | देवाचे नियम मोडता येत नाहीत | ह्या साठी ज्याला अनुभवायचे ज्ञान झाले आहे व सावध आहे अश्या वक्त्या चे निरुपण ऐकावे | म्हणजे आत्म साक्षात्काराची खुण तत्काळ बिंबते | पाऊल वेडे वाकडे पडते हे जाणून त्या वरुन चालणारा आंधळा आहे हे ओळखावे व बाष्कळ क्रिया दिसली की तेथील ज्ञानाचे बोलणे बाष्कळ समजून वमना प्रमाणे टाकून द्यावे |



Anonymous - Aug 24, 2011
आता पुढे ....
एक्वीस हजार सहाशे श्वताअसोच्छवासांचा जप अजपा गायत्री चा नित्य ठरलेला आहे | २१६०० श्वासोच्छवास प्रत्यैक प्राण्याचे प्रत्यही होत असतात , त्यं कडे एकाग्रतेने लक्ष ठेवणे ह्याला "अजपा" जप म्हणतात | विचार केला तर हा जप साधणे सोपे आहे |मुखांत व नाकांत प्राण वायू असून त्याची सारखी ये जा चाललेली असते | तिचा सूक्ष्म द्रुष्टि ने विचार करावा | मूळांत पाहिले तर स्वर एकच आहे पण त्याचे , तार , मंद्र व घोर असे तीन भेद झाले आहेत | त्यांतल्या घोरां पेक्षा ही अजपेचा विस्तार सूक्ष्म असतो |सप्त स्वर खर्जा मध्ये म्हणून पहावे म्हणजे कळून येईल की नाभिस्थानी असलेल्या परावणीच्या इकडे म्हणजे ह्रदय स्थानी असलेल्या पश्यन्ती वाणीच्या खाली अर्थात् नाभि व ह्रदय ह्यांच्या मध्ये स्वराचे कन्म स्थान आहे | तेथुन स्वर उठतो | वायू सारखा आंत घ्यावा व सोडावा | एकांती मौन धरुन बसावे | सावध पणाने पहावे म्हणजे सोहं -सोहं हा जप अखंड चाललेला आहे , असे समजते | असे हे सहज साधन टाकून सायासाने होणारया साधनांत गुंतु नये |



Anonymous - Aug 27, 2011
आता पुढे ....

देह व आत्मा ह्यांच्या संगतीत चरफ़डत - चरफ़डत देह त्याग करितात |असा हा आत्मा दु:ख भोगणार आहे |शेवटी फ़ल प्राप्ती काहीच नाही सर्वच व्यर्थ , असा आत्मा दोन दीवसांचा भ्रम आहे , पण दु:खाचे सुख मानुन घ्यावे |त्या प्रमाणेच ह्या भ्रम रुप आत्म्यालाच परब्रह्म म्हणतात |दु:खी होऊन चरफ़डून गेल्याचे काय समाधान मानावयाचे ? थोडे से सुख भोगिले नाही तो मागोमाग दु:ख आहेच |जन्मा पासून सगळे आठवावे म्हणजे सर्व माहीत होईल |आत्म्याच्या सगतीने प्राण्यांना अशी अनेंक दु:खे प्राप्त होतात आणि शेवटी प्राणि दीन होऊन जातात |चौर्यांशी लक्ष योनीचे प्राणी आहेत |पण सगळे एकमेकाला खात असतात |ह्या शिवाय नाना क्लेश व दु:खणी आहेत च , ती अशी ही अंतरात्म्याची करणी आहे |मरण काळी अनेंक प्रकार च्या यातना होतात त्या सर्वांना सारख्याच भोगाव्या लागतात |पूर्व वयांत अनेंक सुखे भोगली असल्या मुळे अखेरची ही दु:खे फ़ार जड जातात |म्रुत्यु चे दु:ख सर्वांनाच कासावीस करते |शरीर अवयव हीन झाले तरी तसेच जगांत वागावे लागते आणि शेवटी प्राण कासावीस होऊन जातो |रुप लावण्य जाते शरीर सामर्थ्य ही जाते जाते व जवळ कोणीच नसतां खितपतुन मरावे लागते |अंतकाळ हा सर्वांनाच असा दीन करणारा आहे |असा हा चंचळ अंतरात्मा अवलक्षणी व दु:ख कारक आहे , अर्थात देह व आत्मा ह्यांची संगति बहुतेक दु:खप्रदच आहे |



Anonymous - Aug 30, 2011

आता पुढे ....

पाणी मुळातच निर्मळ असते |पण ते अनेंक वनस्पती मध्ये जाऊन त्यांच्या संगतीच्या दोषांने आंबट , तिखट , कडवट होते |तसा आत्मा आत्मपणाने निर्विकार व निर्मळ आहे , पण देहाच्या संगति ने त्याला विकार पावतो व अभिमाना च्या भरी भरुन भलत्याच मार्गाला लागतो |चांगली संगति मिळाली म्हणजे उसाला गोडी यावी तसा भला होतो आणि दुष्ट संगति मिळाली म्हणजे विषवल्ली फ़ोफ़ावते , तसा तो घातकी होतो |उदकाचा नाश होतो पण आत्मा विवेकाच्या योगाने देहबुध्दि च्या आवरणांतुन घेवुन पहा |जो आपले रक्षण करतो आपला आपणच मित्र होतो व जो स्वतः चा नाश करुन घेतो तो स्वतः चा शत्रु होतो |उद्योगी व शहाण्या माणसाच्यी संगति धरली तर मनुष्य शहाणा व उद्योगी होतो आणि मूर्ख माणसाची संगति ने आळशी व मूर्ख होतो |उत्तम संगति चे फ़ळ सुख व वाईट संगतिचे फ़ळ दु:ख असत|

संपत्ति दुपारच्या सांवली सारखी क्षण भंगूर आहे |आयुष्य ही हलके - हलके निघुन चालले आहे | बाल्य , तारुण्य , व्रुध्दपणा कसा दु:ख कारक व अशाश्वत आहे हे अनुभवास येते |आहेच आहे हे

लक्षांत येऊन ही मनुष्याने आपल्या जन्माचे सार्थक नाही केले तर त्याचेच नुकसान होते |म्हणून माणसाने आपले हीत कशांत आहे हे जाणून घ्यावे व ते हीत करुन घेतले पाहिजे |




Anonymous - Aug 31, 2011
आता पुढे ....
नाभी पासून जी स्फुरण रुप व्रुत्ति उत्पन्न होते , तीच " परावणी " असते|हे श्रोत्यांनी लक्षांत ठेवावे |तीच ह्रदया च्या ठिकाणी ध्वनी रुप झाली म्हणजे "पश्यन्ति वाणी " असते |कंठा मध्ये येऊन नाद रुप झाली म्हणजे तीला " मध्यम वाणी " म्हणतात आणि त्या नादांचा अक्षरोच्चार झाला म्हणजे त्याला " वैखरी वाणी " म्हणतात |
ब्रह्मांडाचे विराट हिरण्य गर्भादि विराट चार देह समजुती साठी कल्पिले आहेत |त्यांचे सुध्दां आत्मज्ञानाने व विवेकाने निरसन केले पाहिजे |आत्मानात्म विवेक सारासार विवेक पाहिजे असतां पंचभूते मायिक आहेत असा अनुभव येतो |शुक्र , शोणित , लाळ, मूत्र , व स्वेद हे आप तत्वांचे पांच भेद आहेत |
Anonymous - Sep 1, 2011
आता पुढे ....
तत्वांची स्वरुपे नीट स्प्ष्ट पणे समजुन घ्यावीत |क्षुधा , त्रुषा , आलस्य , निद्रा , व मैथुन हे पांच ही तेजाचे गुण आहेत |ह्या सर्व तत्वांचे निरुपण पुन्हाः -पुन्हाः करीत जावे |चळण वळण , प्रसारण , निरोध व आकुंचन हे पांच वायूचे गुण श्रोत्यांनी ध्यानांत ठेवावेत |काम , क्रोध , शोक , मोह , व भय हे आकाशाचे भेद आहेत |विवरण केल्या खेरीज हे कसे कळतील ? असो ! अशा स्थूळ शरीराच्या पंचवीस तत्वांचा विस्तार आहे |आतां सूक्ष्म देहाचा विचार ____ अंतःकरण , मन , बुध्दि , चित्त व अहंकार हे आकाशा पंचक असत |व्यान , समान , उदान , प्राण , व आपान हे पांच वायू तत्वाचे भेद आहेत |कान, त्वचा, डोळे , जीभ व नाक हे पांच तेजाचे गुण आहेत | आता___ वाचा , हात , पाय , शिस्न , व गुद हे आप - तत्वांचे गुण आहेत |पुढे प्रुथ्विचे पांच गुण उघड आहेत |शब्द , स्पर्श , रुप , रस व गंध हे पांच प्रुथ्विचे गुण सांगीतले आहे |असे हे सूक्ष्म देहाच्या तत्वाचे २५ भेद आहेत |
आवरणोदकांत हाटकेश्वर [ नावांचे शंकराचे पाताळलिंग ] आहे |त्यास येथुनच नम्स्कार केला म्हणजे पोहोचतो |त्या पाताळ लिंगाचा महिमा अतिशय मोठा असल्या मुळे फ़ार पुण्य लागते , पण तेथे शरीराने जाता येत नाही व प्रत्यक्ष दर्शन घेता येत नाही |म्हणून विवेकाच्या योगाने त्या ईश्वराच्या स्वरुपाचा तर्क करावा |जे आपणाला ठाऊक नाही ते आपण जाण्त्याला विचारावे | मनाच्या वेगाने तर स्थूळ देहाला फ़िरतांन येत नाही |संत सत्पुरुष असार टाकुन देऊन सार

तेवढेच घेतात |करंट्याला उत्तम वस्तुची पारख कशी होईल ?गावढळ त्याच्या पुढे वेद - शास्त्रे पुराणे काय करतील ? म्हणून आधी आचार सांभाळावा मग निर्मळ होऊन विचार पहावा |आचार व विचार ह्या दोहांच्या सहाय्याने भव समुद्राचे पैलतीर गाठावे |जेथे डोळस फ़सतात तेथे आंधळे काय कामाचे ?अम्रुत आणि विष एकच म्हणतात पण विष घेतल्याने प्राण जातात हे स्पष्ट आहे पण दुष्कर्मा मुळे फ़जिती होते व सद् कर्मा मुळे किर्ती वाढते |तात्पर्य हे की इहलोक व परलोक ह्या दोघांचा ही जो पूर्ण पणे विचार करीत नाहीत त्यांचे सर्व काही करणे निरर्थक असते |म्हणून संग धरणे तो संतांचा च धरावा |ऐकावे ते सद् शास्त्रच ऐकावे |अनेंक प्रयत्न करुन उत्तम गुणांचा अभ्यासच करावा |
||श्रीराम जय राम जय जय राम ||



Anonymous - Sep 2, 2011
दशक १८ वा.........
दशक १८ वा.........
बुध्दि दाता गजानन व परादि वाचांना स्फ़ुर्ति देणारी शारदा ह्यांना वंदन करुन ह्या समासांत अनेंक उपास्य देवतांचे धन्यवाद गाईले आहेत |हे गजानना तुला नमस्कार असोत |तूं चारी वर्णांना स्फ़ुर्ति देतोस |




Anonymous - Sep 5, 2011
आता पुढे ....
ब्रह्म आत्म स्वरुप जाणण कठिण ब्रह्म देवा तुझी धन्य असोत |सुष्टि रचना करुन वेद शास्त्रे प्रकट केलेस |हे विष्णु तुझी धन्य असोत |तु आपल्या एका अंशा ने व जाणीव रुपाने सर्व जीवांचे पालन करतोस |ज्याचे देणे अपरंपार व जो राम नाम अखंड जपतो तो भोळा शंकर धन्य असो |सर्व देवांचा देव असा इन्द्र , यम धर्म धन्य असोत |ते सर्व धर्मा धर्म यथार्थ जाणतात आणि प्राणि मात्रांचे गुप्त जाणून घेतात |व्यंकटेशाच्या गिरीचा महिमा महान !बन शंकरी तुझी धन्य असोत |कपिराया तुझी धन्य असोत |लोकांमधे भक्तांवर प्रसन्न होणारी तुळजा भवानी धन्य असोत | तिच्या गुणांची व वैभवाची गणती करणारा कोण ?पांडुरंगा तुझी धन्य असोत |तुझ्या जवळ तान - मान राग रंग सह हरि कथेचा गजर अखंड चाललेला असतो |अगा क्षेत्र पाळा भैरवा तुझी धन्य

असोत | सद् भावाने तुझी कोणी भक्ति केली तर त्याला चांगले फ़ळ देतो व चुकल तर वेड लावतो | राम क्रुष्णादिक अवतार झाले त्यांचा महिमा अपार आहे | यांच्या उपासने मध्ये अनेंक लोक मग्न झालेत | ह्या सर्व उपास्य देवांचे मूळ म्हटले म्हणजे हा एक अंतरात्माच आहे | जगांतले सर्व भोग त्यालाच पोहोचतात |



Anonymous - Sep 7, 2011
आता पुढे ....
किर्ती आणि अपकिर्ती उदंड निंदा आणि स्तुती इत्यादि सर्व भोगांची प्राप्ति या अंतरात्म्यालाच घडते | तो कोणत्या देहांत काही करीत असतो कोणत्या देहांत काही भोगीत असतो | भोगी त्यागी विरागी तो एकच अंतरात्मा आहे | अंतर्निष्ट तेवढे तरतात व अंतर्निष्ट [ बहिर्मुखी ] बाह्य लोकाचारा नें भरकटत जाऊन बुडतात |
नेणते पणाने आजवर झाले ते आतां होऊन चुकले ह्या पुढे तरी शहाणपणानें नियमित वागले पाहिजे | जाणत्याची सद् बुध्दि हळू - हळू शिकावी | लिहिणे वाचणे जाणत्या जवळ शिकावे | जाणत्यावर उपकार करावा | जाणत्या साठी शरीर झिझवावे | व जाणत्याचे विचार कसे असतात ते पहावे | त्या सारखे बोलावे | तो सांगेल तसे वागावे | जाणता जसे ध्यान करतो तसे करावे |त्याच्या कथा युक्त्या समजुन घ्याव्या | त्याचे पीळपेच कसे असतात ? तो दूसरयास कस उकळतो ? लोकांना राजी कस राखतो ? तस आपण वागाव | त्याचे धोरण घ्यावे , त्याच्या स्फुर्ति चे तरंग कसे उठतात त्याचा अभ्यास करावा |त्याचा उद्योगी पणा घ्यावा | त्याचा तर्क समजून घ्यावा | त्याचा अभिप्राय न बोलताच उमजावा | त्यची मधुर भाषणे मनांत समजुन घ्यावी | त्याचा कडक पणा , सहनशीलता , उदारता , समजुन घ्यावी | दूरदर्शिता, त्याचा विचार , कल्पना , समजुन घ्याव्यात | परमेश्वराच्या गुणानुवादाची अखंड चर्चा करावी , म्हणजे अपार आनंद होतो |




Anonymous - Sep 9, 2011
आता पुढे ....
समर्थ राम दास म्हणतात्त _ दुर्लभ नरदेहाच्या दुर्लभ आयुष्या चा नाश करु नकोस | विवेक उत्तम प्रकारे न केल्यास सर्वात अविवेक माजतो व त्या योगे प्राणि भिखारया सारखा दिसतो व हे आपलेच आपण नुकसान करुन घेतो | आळसाने नागवणूक होते | वाईट संगति माणसाला बुडवते

|मूर्ख माणूस बाष्कळ पणा मुळे हल्ला चढविला आणि तशा मध्ये ऐन तारुण्यात कामरुपी चांडाळा ने उठावणी केली |चांगला तरणा ताठा पण मूर्ख व आळशी असल्या मुळे सर्वच गोष्टी विषयी त्याला दैन्य भोगावे लागते |
नियमित पणाचा अभ्यास नाही |सगळा बाष्कळ पणा भरलेला |स्वत:ला काही येत नाही व कोणी शिकवले तर ऐकत नाही |आंत एक व बाहेर एक असे जो वागतो त्याला परलोकीचे सार्थक कसे घडेल ? प्रयत्न करतांना आळस डोळ्या पुढे येऊ देऊ नये |दुर्गुण टाकुन गुणांचा अभ्यास करावा |
कोणत्या प्रसंगी काय म्हणावे हे समजुन घेतलेले बरे |श्रवण मननाने अर्थांतर काढीत जावे |
पाठांतर पुष्कळ असावे |त्याची नित्य उजळणी करुन ते ताजे ठेवावे |सागीतलेल्या गोष्टी कींवा अर्थ चित्तात ठेवावे |एकांताचे सेवन करुन मिळेल तो प्रत्यैक ग्रंथ वाचून पहावा |त्यातील जेवढा अर्थ अंत:करणांत पटेल तेवढा साठवावा |



Anonymous - Sep 11, 2011
आता पुढे ....
देह आहे म्हणून मनुष्याचे यच्चयावत् व्यापार चालु असतात |देहाविण काही नाही इअहलोक व परलोक चे सर्व सार्थक देहा मुळेच होते |देह नसेल तर सर्व काही निरर्थक होत |अनेंक स्वार्थ किंवा अर्थ देहा मुळेच होतात |धन्य होणे किंवा व्यर्थ जाणे देहा मुळेच होत |अनेंक प्रकारचे सन्मार्ग वा नाना साधन करुन बंधने तुटतात व आत्मनिवेदनाच्या योगाने मोक्ष प्राप्त होतो तो देहा मुळेच |



Anonymous - Sep 12, 2011
आता पुढे ....
सर्वा मध्ये देह उत्तम आहे |कारण त्या मध्ये आत्मा राम [पुरुषोत्तम ] राहतो |जे जे देह धरुन जन्माला आले ते ते काही तरी करुन गेलेच , त्यांत कित्यैक जण हरि भक्तिच्या योगाने पावन झाले |देहा शिवाय पूजा पोहोचत नाही व करता ही येत नाही |
मापाने धन्य पुष्कळ मोजले तरी माप स्वत: ते काही खात नाही |



Anonymous - Sep 13, 2011
आता पुढे ....
मापाने धान्य पुषकळ मोजले तरी माप स्वतः ते काही खात नाही |जे लोक पुष्कळ वाचतात पण विवरण किंवा मनन करीत नाही | त्यांची अवस्था अशीच होते | असाच एक प्रकार एखाद्याने शेकडो ग्रंथ वाचले , हजारो श्लोक पाठांतर केले व एकदा म्हणायला लागला की थांबत नाही | अर्थ विचारावा तर काहीच समजत नाही आणि त्याचा अनुभव पण संशयी असतो | तेव्हा शब्द रचनांची परीक्षा करुन घ्यावी | त्यात अनुभवाची असतील तेवढीच घ्यावी | वैरण घातले आणि घाई -घाई ने जाते ओढले , फ़िरवले तर भरड पीठ पडेल | पीठ बारीक येणे शक्य नाही | तेव्हा स्वानंदा शिवाय एक ही क्षण जाऊ देऊ नये व सर्वांचे अंतःकरण सांभाळीत जाणे हे कर्तव्य आहे |



Anonymous - Sep 13, 2011
आता पुढे ....
शंकाचे समाधान झाले की श्रोत्यांची मनें प्रसन्न होतात आणि सगळे श्रोते वक्त्याला क्षणो क्षणी वंदन करतात | शंका समाधान झाले तर स्तुती करतात , नाही तर निंदा करतात | श्रवण मननांदिकांच्या योगाने ब्रह्मानुभव घ्यावा लागतो | ह्या जगांत खोटे कोठेच चालत नाही | ते कोणाला पटत ही नाही | म्हणून खरे असेल तेच ध्यानांत घ्यावे |अनुभवा वाचून जे भाषण होत ते फ़ोलकट मानल जात | कोणी शिकवायला लागले तर राग ही येतो पण न शिकले तर पुढे अद्दल घडते |खोट्या गोष्टी जगा मध्ये तात्काळ उअघड्कीस येतात , म्हणून सर्वांचा शोध घेऊन त्यात काय सार सापडेल तेवढे घ्यावे | तत्वांचा शोध घेऊन महावाक्याचा अर्था मध्ये प्रवेश करावा व आत्म निवेदन करुन परम समाधान पावावे |
अनेंक वस्त्रालंकारांनी शरीर भूषवितात | तसे विचार विवेक व राजकारण ह्यांनी अंतःकरण श्रुंगारावे | शरीर सुंदर वस्त्रालंकारांनी सजविले असले तरी ही अंतःकरणांत [अंतरी] चातुर्य नसेल तर त्या शरीराला कधी ही शोभा येणार नाही | विवेकी पुरुषानेंअति सर्वत्र वर्जावे | प्रसंग पाहून चालावे | न्याय नीतिची आवड असण विवेक-विचार जाग्रुत असणे प्रसंगानुसार वागतां येणे , दूसरयाचे अंतर जाणता येणे हे सर्व ईश्वराचे देणे आहे | सावध पणाने अचाट प्रयत्न करणे वेळेला धैर्य ठेवणे | अघटित कार्ये करणे हे ईश्वराचे देणे आहे |




Anonymous - Sep 16, 2011
आता पुढे ....
लोकांचा स्वभाव मोठा लालची असतो |ते प्रथमच "देव" म्हणतात |तेंव्हा मला काही देव , म्हणजे मला काही द्यावे |अशी वासना असते |धन्याची चाकरी मुळीच न करतां नोकराने पगर मागावा त्या प्रमाणे झाल |देवाची काहीच भक्ति न करितां देव मला प्रसन्न व्हावा अशी इच्छा करतात | कष्ट केल्या वाचून काही मिळत नाही |आळसाने काम बिगडते |जे अगोदर श्रम करण्याचे दु:ख सहन करतात त्यांना पुढे सुखरुपी फ़ळ चाखायला मिळते आणि जे अगोदर आळसांत च सुख मानतात त्यांस पुढे दु:ख भोगावे लागते |इहलोक असो वा परलोक दोन्ही कडे विवेक सारखाच हवा |दूरदर्शी पणाने वागण्यात काय आनंद असतो हे कळले पाहिजे |जेवढे मिळवतात तेवढे जेव्हांचे तेव्हांच खाऊन टाकतात |ते लोक कठिण प्रसंगी मरतात |म्हणून दूरवर विचार करुन वागतात ते शहाणे असतात |इह लोकांसाठी धन धान्यादिकांचा संचय पाहिजे आणि परलोकांसाठी परमार्था चा संचय पाहिजे |संचया वाचून सर्व व्यर्थ |पण इह लोकाचा संचय आवश्यकते पुरता हवा त्यात लोभ नको , दूसरयाचा गळा कापून तर संचय मूळीच नको पण परलोकाचा संचय मात्र जितका करता येईल तेवढा करावा |मनुष्य जीवंत असून मेल्या सारखाच तो |ज्यांनी खुप कष्ट भोगले ते भाग्य भोगुन गेले बाकिचे करंटे लोक बडबडतच बसतात |विचाराने इहलोक व परलोक साधता येते |विचाराने सार्थकता होते |विचारानेच नित्य व अनित्य काय याचा विवेक कळतो | तेव्हा विवेक पूर्ण विचाराने जीवन जगावे |म्हणजे जीवन जगण्याच सार्थक होत |
Anonymous - Sep 17, 2011
आता पुढे ....
ब्रह्म निराकार व निश्चळ आहे आणि आत्मा सविकार व चंचळ आहे |आत्म्यासच सर्व जण देव म्हणतात |खरोखर एकच देव आहे |अंतरात्मा निश्चये करुन कळत नाही व अनेंक देवाच्या गडबडीत एक देव कोणता ह्याचा निर्णय लागत नाही |जेथे जावे तेथे धोंडा आणि पाणी ह्या शिवाय काय आहे ? उगीच वण-वण हिंडल्याने काय लाभ ? हा विचार ज्याच्या मनाला पटला ते सत संगति धरतात |अंतर्मुख व्यक्ति अंत:करण जाणतो व बहिर्मुखाला काही कळत नाही |म्हणून विवेकी राहणे - सुज्ञ माणसे अंत:करणाचा शोध घेतात |विवेका वाचून असलेला भाव तो अभावच समजावा |जे=जे आकाराला येते ते-ते सर्व नाश पावते , म्हणून त्या नांव रुपाच्या गोंधळा हून परब्रह्म निराळे आहे |अनुभवा वाचून जे-जे करावे ते ते सगळे व्यर्थ जाते |सगुण पाहतां-पाहतां मूळा पर्यन्त गेला म्हणजे सहजच निरगुणाअची प्राप्ति होते |अहं भवाचा संग सुटला म्हणजे मुक्त असा तो ब्रह्म स्वरुप होतो |परमेश्वराचे अनुसंधान लावल्याने जीव पावन होतो |असे हे विवेकाचे

विवरण आहे|ह्याचा एकाग्र चित्ताने विचार करावा |नित्या नित्य विवेक ऐकल्याने जन्माचा उध्दार होतो |जो ज्ञानी असतो तो सर्व तत्वे टाकून देऊन तुर्येच्या पलीकडे पळून जातो आणि आत्मनिवेदनाच्या योगाने ब्रह्म स्वरुप होतो |



Anonymous - Sep 19, 2011
आता पुढे ....
कोणत्या ही कार्याचा उद्योग करि लागले म्हणजे काही तरी विघ्न आड येते तथापि काळ साह्य असला म्हणजे ते सहजच पार पडते |कार्य भाग होऊं लागला म्हणजे प्राण्याला हुरुप येतो व दिवसे दिवस विचार ही सुचू लागतो |श्रवण म्हणजे ऐकणे व मनन म्हणजे ध्यानांत धरणे - विचार करणे |ह्या उपायांच्या योगानेत्रैलोक्याच्या व्यवहार कारभार सहजगत्या चालला आहे |सावध असले म्हणजे सर्व काही अनुभव येतात |प्रसंग पाहून वागणारे लोक फ़ार थोडे असतात |श्रवणा मध्ये जे - जे कांही कानांवर पडते ते-ते समजून घेऊन त्याचे विवरण केले तरच निरुपणांत बसल्याचे काही सार्थक होईल |जे दूरदर्शी शहाणे असतात ते अगोदर च स्वतः कडे नेणते पणा - मूर्ख पणा घेतात |वैर केल्याने वैरभाव वाढतो व परिणामी आपल्यालाच दुःख भोगावे लागते | अवगुणी माणसां पाशी सद् गुणी माणूस बसला तर त्याचा अवगुण चटकन लक्षांत येतो |विवेकी माणसाची वागणूक विवेकपूर्वक च होत असते |बरेच संत सज्जन स्वतः सत्क्रुत्ये करुन लोकां कडून महत्कार्ये करवितात |पण ज्याच्या योगाने प्राणि मात्रांना समाधान होईल असे सज्जन थोडे असतात |रागवलेल्या लोकांस अनेंक प्रकारे कसे शांत करावे हे सज्जनां ला माहित असते |त्याचा विवेक श्रेष्ट असतो |

||श्रीराम जय राम जय जय राम ||



Anonymous - Sep 19, 2011
दशक १९ ...
दशक १९ ...
ब्राह्मणाने बाळबोध अक्षर वळ्वून असे सौंदर करावे ,की जे पाहतांच चतुरांना आनंद वाटावा |काळी भोर शाई करुन अक्षर वाटोळे ,सरळ व मोकळे लिहावे |ओळी एक सारख्या लिहाव्या |मधले अंतर

एक सारखे असावे |पहिल्यांदा अक्षरा पासून ग्रंथ संपे पर्यन्त पहात गेले तर एका टाकाने सर्व ग्रंथ लिहिला आहे असे वाटावे |ओळीला ओळ लागू नये |ज्याचे वय लहान त्याने तर फ़ार जपून लिहावे की जे पाहताच लोकांना मोह पडेल |फ़ार मोठे नाही व फ़ार बारीक नाही असे मध्यम अक्षर लिहावे |देह अनेंक प्रकारे झीजवुन मोठी किर्ती जोडावी , आपल्या सद् गुणांच्या योगाने लोकांना चटक लावून सोडावी |
नाना प्रकार ची संभाषणे समजून घ्यावी |अनेंक प्रकारच्या शब्दांचे भिन्न-भिन्न अर्थ समजू घ्यावे | अनेंक प्रकार चे शंका व समाधान अनुभवाच्या गोष्टी साक्षात्काराच्या गोष्टी श्रोत्यांना समाधान होईल अश्या सांगाव्या |अन्नुमानिक व बाष्कळ कधी ही बोलु नये |प्रव्रुत्ति असो वा निव्रुत्ति असो अनुभवा वाचून साराभ्रम असतो |पुषकळ बोलणे चालु असेल तर ते मुकाट्याने ऐकुन घ्यावे | थोड्या चिन्हा वरुन लोकाअंच्या मनांतला भाव ओळखावा |बाष्कळ लोकांत बसु नये |



Anonymous - Sep 20, 2011
आपल्या कडे नेणते पणा घेण्यास चुकुं नये |जाणते पणाचा गर्व करु नये |प्रसंगानुसार वागावे | भेदभावा विण कार्य करावे |सज्जन मात्र शोधुन काढावेत |सर्व साधनां मधे श्रवण थोर , श्रवणा पेक्षा मनन थोर , मननाच्या योगाने अनेंक लोकांचे समाधान होते |धूर्त पणाने सर्व जाणून घ्यावे | समजल्या वाचून उगीच त्रास करु नये |
करंट्याची लक्षणे त्यागली की भाग्यवंताची लक्षणे अनायासे अंगी बाणतात |पापा मुळे दरिद्र्य येते आणि दरिद्र्या मुळे पाप वाढत जाते |असे निरंतन घडत असते |म्हणून ही करंट पणाची लक्षणे ऐकुन त्यांचा लगेच त्याग करावा |म्हणजे भाग्यवंताची लक्षणे काही तरी आंगी बाणतील |करंट्या ला आळस प्रयत्न अधर्मात वासना , भ्रमिष्ट व झोपाळू असतो |बाष्कळ पणाने बकत असतो | कोणालाच मनापासून आवडत नाही |सत्संगति ची गोडी त्याला मुळीच नसते |दूरदर्शी पणाचा विचार त्याला सुचत नाही |
लुबाडण्याची वासना निरंतर असते |आळसा मुळे शरीराला कषट देत नाही |लोकांशी स्नेह नसतो | अनेंक प्रकारे कठोर बोलतो आणि मूर्खत्वा मुळे कोणालाच जुमानत नाही |शहाण पणाचा विचार कोणी संगीतला तर तो ऐकावयाचा नाही|कल्पनांच्या भररया मारतो पण लाभ काहीच नसतो | काही पुण्य करायचा विचारच मनांत येत नाही तर पापाचा क्षय कसा होणार ? शहाण्याची संगति धरीत नाही |स्वतःस शहाणा करीत नाही व ज्याला आपले हित कशांत आहे हे कळत नाही तो आपला आपणच वैरी असतो असे जाणावे |उत्तम गुण नसणे हे करंट्याचे लक्षण |हे सर्व जग कार्य करण्याचे आहेत |म्हणजे घेऊन देऊन चालणारेआएत |येथे कोणाचे तरीकाम केल्या वाचून कोणी


उपयोगि पडत नाही |जरुरत असल्या शिवाय कोणी कोणाच काम करीत नाही |जरुरत असल्या शिवाय कोणी कोणाच काम करीत नाही |म्हणून निकामी नेहमी दु:खात वावरतो |म्हणून दुर्गुणाचा त्याग करुन उत्तम गुण समजुन घ्यावे |



Anonymous - Sep 20, 2011

आता पुढे ....

सुदैव लक्षण ज्याच्या आंगी असतात अशा माणसांच्या आंगी अनेंक प्रकारचे परोपकार करण्याचे उपजत गुण असतात |असा माणूस सर्वांना सर्व काळ आवडतो |ज्याच्यात अनेंक अनेंक गुण आहेत जो सत्पात्र आहे तोच मनुष्य जगमित्र होतो |त्याची किर्ती स्वतंत्र पसरत असते |त्याच्या करितां दूसरया च्या आश्रयाची गरज नसते |नम्र पणे कसे विचारावे व्यवस्थित अर्थ कसा सांगावा , बोलण्या प्रमाणे उत्तम क्रिया कशी करावी सर्व त्याला माहित असते |तो अनेंकास मान्य झाल्या मुळे त्याला कोणी दोष लावु शकत नाही |असा तो महात्मा धगधगीत पुण्य राशि असतो |अनेंक लोक त्याच्या सहाय्याची वाट पहांत असतात |त्याला कोणाचेच उणे सहन होत नाही |उत्तम गुणांनी जो प्रतापी किरणं सह प्रत्यक्ष सूर्यच प्रगटला कर्म उपासना ज्ञान वैराग्य हे सर्व विधी पूर्वक कसे करावे हे माहीत असून जाणते पणाने व्यापक झालेली त्याची बुध्दि कधी ही चळत नाही | ज्ञात्याला कधी ही देह बुध्दि नें जिंकले अस कधीच होणार नाही |देह बुध्दि हे अवलक्षण आहे | ज्ञाता देहातीत असतो |काहीतरी उत्तम गुण मनुष्या ने जगांत दाखवावेत |जाणता मनुष्य जगांत अत्यंत क्षमाशीलतेने वागतो |बहुतेक लोक स्वत:लाच थोर समजतात परंतु हा थोर पणा सर्वांना पसंत पडला पाहिजे |महा पुरुष हा धीर उदार व गंभीर असतो |




Anonymous - Sep 21, 2011

आता पुढे ....

देहा वाचून भक्ति करतां येत नाही , देहा वाचून देवाची प्राप्ति होत नाही म्हणून भजनाला मूळ कारण देह आहे |देह मुळीच मिथ्या केला तर भजनाला थारा कोठचा ? ह्या स्तव देह व आत्मा ह्यांच्या संयोगानेच भजन करतां येणार आहे |देहा वाचून भजन पूजन कसे करावे ? मनुष्य देह बुध्दि वर आहे तो पर्यंत अनंत कल्पना व अनंत वासना ह्यांचे अनेंक तरंग अंत:करणांत उत्पन्न होत असतात |म्हणून कल्पना रहित असणारी ती परब्रह्म वस्तुच शाश्वत आहे |त्याला अंत नाही

म्हणून त्याला अनंत म्हणतात |त्या सूक्ष्म स्थिती गती चे सद् गुरु क्रुपेने प्रत्यक्ष ज्ञान झाले की अधोगति चुकते |सद् गुरु प्रसादाने ही सदगति तत्काळ लाभते |
लोकांच्या मनांत ज्याच्या मुळे संशय उठतील असे तो काहीच करीत नाही |प्रत्यैक कार्याचा आरंभ व शेवट ह्याचा तो अगोदर विचार करतो |जो स्वतः निस्प्रुह नाही तो त्याचे बोलणे कोणी मानीत नाही लोकांच्या अंतरात्म्यास राजी राखणे कठिण आहे |कोणी जबरदस्तीने उपदेश देतात |असले लोक त्यांच्या लोभी स्वभावा मुळे सहजच मागे पडतात |ज्याला त्यांनी विवेकाच्या गोष्टी सांगव्या तोच त्यांना प्रतिकूल होऊन बसतो आणि पुढे - पुढे तर त्याचा सगळा कारभार नासून जातो |सर्व समुदाया मधून उत्क्रुष्ट व भव्य असेल तेवढेच घ्यावे |निःस्प्रुह पणाच्या वागण्या ने जगा मधे किर्ती गाजवावी देहाचा भरवसा नाही ,|आयुष्य कैंव्हा सरेल व कोणता वेळी काय प्रसंग वर्तेल कोणी सांगावे |म्हणून सावधान असावे |जेवढे होईल तेवढे सत्कर्म करावे आणि भगवद भजन कीर्तिच्या योगाने सारे जग भरुन सोडावे |एकांता मध्ये विवेक करीत बसले म्हणजे योग्य तर्क उत्पन्न होतो|जिकडे जग तिकडे जगन्नायक असतो |हे मत कळले पाहिजे |विवेकी लोक रात्रंदीवस हेच सांभाळीत असतात |अभ्यासाने पुर्ण तयारी झाली असेल तेव्हा प्रगट व्हावे नाही तर गुप्त पणे असावे हे बरे |प्रगट होऊन अपकीर्ति होणे हे बरे नाही |आपले म्हणणे लोकांना पटत नाही |लोकांचे म्हणणे आपल्याला पटत नाही , दोन्ही कडे विकल्प च वाढतो तेथे मनाचे समाधान कोठून होणार ?




Anonymous - Sep 22, 2011
आता पुढे ....
स्रुष्टि मधे अनेंक लोकाहेत |त्यांच्या विविधतेचे कौतुक फ़िपल्याने चांगले कळते |अनेंक प्रकारचे विवेकी लोक भेटतात |कित्यैक लोक प्रपंचात असून उदासीन असतात |सुख दुःखाच्या प्रसंगाने त्यांचे समाधान भंग नाही पावत |त्यांच्या बोलण्या चालण्यात स्वाभाविकता असते |लोकां जवळ भावार्थ कसचा ? आपण्च त्याच्या ठिकाणी भावार्थ उत्पन्न करुन जविला पाहिजे ; अंतरात्म्याला हे सर्व काही करावे लागते त्या चंचळा मध्येच अनेंक प्रकारचे दगे आहेत निर्गुण ब्रह्माच्या ठिकाणी हे काहीच नसते |ते ब्रह्म एकटे निर्मळ व निश्चळ असून शुध्द विश्रांति चे स्थान आहे |तेथे सर्व निर्विकार असते |सगळे उद्वेग तुटुन जातात व मनाला विश्रांति मिळते |उपाधि कांही चिरकाल टिकणारी नाही |आत्म समाधाना एवढे थोर काहीच नाही अर्थात मुख्य हे की अलिप्त पणा सांभाळून उपाधि वाढवावी |कोणते ही काम केल्याने होत असते न केल्यास मागे पडत जाते |ह्या साठी ढिले पणा मुळीच करुं नये |जो स्वतः च्या कार्या साठी दूसरयावर अवलंबुन राहतो त्याच्या

कार्याचा नाश होतो |जो स्वत:च कष्ट करुन कार्य तडीस नेतो तोच शहाणा समाजावा |जे कार्य करावयाचे असते ते सगळे च सर्वांना कळल तर त्यांत कांही तथ्य राहत नाही |सामर्थ्याच्या भ्रमाने ढीले पणा करुं नये |नि:स्प्रुहाला नि:संदेह करुन सोडावे |भगवद भजन आपण करावे व दूसरयां कडून करवावे |भजनाचा मार्ग भक्ति मार्ग आपण धरावा व इतरांना लावावा |जेवढे होण्यासारखे असेल तेवढे करण्यांस आळस करुं नका |उपाधि वाढवावी पण तिच्यात सांपडू नये अलिप्त पणा राखावा |कोणत्या ही कामांत आळस ठेवु नये |कोठे ही केल्या वाचून काहीच होत नाही |व्यवस्थित पणाने करीत असतां ही तो शेवटी बिघडत जातो |अशा प्रकारे विचार केल्याने संसाराच्या विषयी अनासक्ती येते |विवेकानें विचार केल्याने संसाराच्या विषयी अनासक्ति येते | विवेकाने विचार केला म्हणजे सर्व कळून येते |पण कोणी ही धीर सोडू नये |धीर सोडला तरी फ़ायदा काय ?सोसावयाचे ते कांही टळत नाही |सगळे सोसावे लागतेच |
||श्रीराम जय राम जय जय राम ||



Anonymous - Sep 24, 2011
दशक २० ....... पूर्ण दशक ...
दशक २० .......
पूर्ण दशक ...
प्रणि ,मन ,पंचभूते सर्व व्यापक आहे |त्रिगूण ,अंतरात्मा मूळ माया व निर्गुण ब्रह्म ही व्यापक आहे |आता प्रश्न हा की आत्मा सगुण काय व कसे ?विवेका ला जाग्रुत करुन अनुभव पहावा | आपल्या शरीराच्या व सामर्थ्याच्या मनानेच प्राणि लहान मोठा व्याप उघडच करीत असतो |तरी पण विचार, मना एवढां चपळ कोणीच नही |मनाचे चपळ पण हे एक देशी आहे |म्हणून पूर्ण व्यापक पणा त्याला येत नाही |मना पेक्षां प्रुथ्वि मोठी ,पण प्रुथ्विच्या व्यापक पणाला मर्यादा आहे |



Anonymous - Sep 25, 2011
आता पुढे ....
पुढचा प्रश्न ज्ञान ,अज्ञान आणि विपरीत ज्ञान तिन्ही सारखी कशी होतील ?ह्या तीन्हीत ज्ञान शब्द असल्याने ह्या तीघांची साम्यता होत नाही |मनन करुन ह्याचा विचार करावा |"ज्ञान" म्हणजे

जाणणे , "अज्ञान" म्हणजे नेणने , आणि विपरीत ज्ञान म्हणजे एक असून भलतेच पाहणे | अर्थात् ब्रह्म् सत्य हे जाणणे ज्ञान , ते न जाणणे म्हणजे अज्ञान व ब्रह्म सत्य असून ते न जाणतां जग सत्य आहे असे समजणे हे विपरीत ज्ञान असत|

सारी स्रुष्टि कल्पनेची झाली आहे | तीचे तीन प्रकार भासतात ____

[१] मूळ माये पासून तो गुण माये पर्यंत म्हणजे त्रिगुणा पर्यंत |

[२] त्रिगुणा पासून तो प्रुथ्वि पर्यंत |


[३] प्रुथ्वि पासून ते चार खाणी चार वाणी पर्यंत |

पहिल्यात एक देशी लक्षण , दूसरयात स्थूळ पंचभूते व तीसरया प्रकारांत नाना जीव जंतु निर्माण होऊन स्रुष्टि रचना पूर्ण झाली आहे | जाणीव रुप मूळ माया ही परब्रह्माच्या सूक्ष्म स्फ़ूरणाची आहे | नाभी स्थानी परावाणी जसे प्रथम स्फ़ूरण होते तसे ब्रह्माच्या ठिकाणी मूळ मायेचे सूक्ष्म स्फ़ूरण प्रथम होते | दोन्ही एकरुपच | सर्व स्रुष्टि चे बीज मूळ मायेत मूळचेच आहे | ते यथार्थ समजल्याने परमार्थ परिपूर्ण होतो | जो मनुष्य भ्रमांत पडत नाही , ज्याचा निश्चय झाला आहे तो संशय धरीत नाही व तो परमार्थात गोंधळ करीत नाही |

Anonymous - Sep 25, 2011

आता पुढे ....

प्रचिती वाचून , अनुभवा वाचून आत्म हित कधी ही होत नाही | प्रपंच असो वा परमार्थ असो अनुभवा वाचून सर्व व्यर्थ असतो | प्रत्यय असणारा मनुष्य श्रेष्ठ असतो | रात्रं दिवस महावाक्यादिकांच्या अर्थाचे मनन करावे | म्हणून पुन्हाः - पुन्हा: मनन करावे , विचार करावा , सर्व यथार्थ पणे कळ्ले की संशय आपोआप नाहीसे होतात | जो-जो उद्योग [कर्तव्य] करील त्याला प्रत्यैकाला सत्ता चालविण्याचे सामर्थ्य मिळवितां येईल पण त्याने आपल्या ठिकाणी भगवंताचे अधिष्टान मानले पाहिजे | सर्व कर्ता जगदीश आहे पण अहं भावाने त्याच्या पासून वेगळे झाल्या मुळे कर्तुत्वाची वेगळी बांटणी प्रत्यैक जीवा कडे आली | म्हणून वास्तविक " हरिर्दाता हरिर्भोक्ता " म्हणजे "दाता" भोक्ता हरीच ह्या स्वरुपानेच सगळा व्य्वहार चालला आहे | हाच विचार नीट करावा | अश्या विचाराने अहंकार संपतो |



Anonymous - Sep 26, 2011

आता पुढे ....

देव म्हणजे अंतरात्म त्याच्या सारखे चपळ कोणी नाही | तसेच परब्रह्मा सारखे निश्चळ कोणी नाही | नरदेह प्राप्त झाल्यावर सर्व द्रुष्य शोधुन पहावे | स्थान व मान , परिस्थिति सांभाळावे व सारासार विचार करावा | इहलोक व परलोक ह्या संबधाचा अनेंक प्रकारचा विचार , विवेक व अविवेक मनुष्य

जाणतो |


अन्न , उदक , तांबुल , पुष्प , चंदन , वसन , वस्त्र , शय्या , व अलंकार हे अष्ट भोग , श्रुंगार , वीर , करुण , रौद्र , विभत्स , भयानक ., अद् भूत , हास्य , व शांत हे ९ रस , नाना विध विलास , वाच्यांश लक्ष्यांश किंवा त्यांचे तात्पर्य सर्व कांही मनुष्य देहातच समजते | मनुष्या ने सर्व आकलन केले आहे | अश्या मनुष्याचे पालन देव करतो असे हे सर्व ज्ञान नरदेहाच्या योगाने च होते | असा हा नरदेह अत्यंत दुर्लभ आहे | ह्याच्या योगानेच दुर्लभ परब्रह्म सुध्दां सुलभ होऊन जातो | जर अनुभव पूर्वक [अनुभवाचे] श्रवण करील तर नर तोच नारायण होतो | ज्यालाअ स्वत: पोहतां येते त्याल दूसरयाच्या कांसेस लागण्याचे कारण नाही | त्यांने स्वतत्र पणे सगळ्याचा शोध करावा |



Anonymous - Sep 27, 2011

आता पुढे ....

प्रुथ्वि वर पाहिले तर जागोजागी पाणी आहे पण कित्यैक माळराने अशी कोरडी ठणठणित आहेत की तेथे पाण्याचा थेंब दिसत नाही | त्या प्रमाणे च ह्या द्र्युष्या चा जो विस्तार झाला आहे त्यात कित्यैकांना जाणीवेने चांगली शोभा आलेली दिसते , तर कित्यैक ठिकाणी जाणीवेचा अभाव दिसतो | प्राणि आहे तेथे जाणीव आहेच | जगामधील अनेंक प्रकारची सामर्थ्ये हे सर्व आत्म्या मुळेच होत | शुध्द आत्मा सद् गुणी सत्कर्मी असतो व शबल आत्मा विकार युक्त व दुर्गुणी असतो | जड देह पंचभूतांचा आहे व चंचळ पणा हा आत्म्याचा गुण आहे | पण कोठे ही पाहिले तरी निश्चळ ब्रह्मा शिवाय ठिकाण नाही |मायेचे सर्व विकार आत्मा करतो पण आत्म्याचा विकारांचा आळ ब्रह्मा वर घालतात | अनुभवनें सर्व गोष्टिंचे विवरण करील तो शहाणा |



Anonymous - Sep 28, 2011

आता पुढे ....

विचार केल्या शिवाय कांहीच कळत नाही व जस जसे कळत जाते तस-तसा संदेह नाहीसा होतो | विवेकाने पाहिले म्हणजे माया जाळ कोठेच दिसत नाही | आकाशांत आभाळ येते ते लगेच पुन्हा उडून जाते , नाहीसे होते | त्या प्रमाणे आत्मसत्ते मुळे नाम रुपाला आलेले द्र्श्य निश्चळा च्या निश्चया पुढे उडून जाते - टिकत नाही | लहान मोठ्या देहांच्या सामर्थ्या प्रमाणे सर्व कांही ईश्वरच करितो | मोठे सामर्थ्य प्रकट होते त्याला "अवतार" म्हणतात | सर्व स्रुष्टि चा विचित्र कारभार चालु

आहे |ईश्वरानें केवढी अद् भुद् व्यवस्था केली आहे |सुर्याच धावण , धुक्या मध्ये अपरंपार पाणी असण , ढग उठण , सूर्याला आच्छादण लगेच वायूच्या झोताने ते उडणे व सूर्याला मोकळ करण विजांचे तडाखे प्राण्यांनी दचकण वीज कडकडून जमीन फ़ाटण अशे अनेंक प्रकार आहेत ह्या सृष्टि मध्ये ईश्वराने एक मोठे वर्ग करुन ठेवले आहे |ते हे की एक मह् भूत दूसरायाला ग्रासतो व त्या मुळे सर्व सारख्या प्रमाणांत राहून सृष्टि रचना सुरळीत चालती|आत्म्याचे असे अनेंक खेळ चालू आहेतच |म्हणून अध्यात्म ग्रंथ ऐकत जावे |म्हणजे संशय नाहीसे होतात |ते परब्रह्म कस ? धरयला जावे तर धरवत नाही व टाकायला जावे तर टाकवत नाही |हे सर्वत्र च आहे |परब्रह्म हे एकटे आहे , पण त्याने एकाच वेळी सर्वांना व्यापून टाकले आहे |सर्वांस सर्वत्र स्पर्श करुन ते सर्वत्र आहे |परब्रह्म पावसाने भिजत नाही , चिखलाने माखत नाही ,|पाण्याच्या महापुरांत असून पुरा बरोबर वाहवत नाही |ते निरंतर संमुख , विन्मुख , डावे , उजवे , खाली वर सर्व प्राण्यांना ते एकटे एकाच वेळी व्यापून असत |सर्वांना विसांव्याचे विश्रांति स्थान एक परब्रह्मच आहे |



Anonymous - Sep 29, 2011

.|श्री दासबोधाचा उपसंहार .....


..|श्री दासबोधाचा उपसंहार .....

दासबोधाच्या शेवटच्याअ १२ ओव्या म्हणजे दासबोधाचा उपसंहार |उपसंहार म्हणजे काय ? कुठल्या ही गोष्टी चा संहार म्हणजे , शेवट , अंत |उप ह्या शब्दाचा वापर असा की , शेवट व्हायच्या थोड्या आधीचा भाग |त्यात ह्या ग्रंथाचे शब्द आपल्या जवळ प्रस्तुत आहे च |त्यात शेवटच्या आधीचा थोडा भाग |असा हा उपसंहार आहे |दासबोधाच्या बारा ओळी म्हणजे सम्पूर्ण दासबोध लिहिल्यावर समर्थाअंनी केलेल आत्म निवेदन आहे |ह्यात सर्व सार आहे |ह्यातच जीवनाच वास्तविक सार सांगीतल आहे |ह्या ओळीइं मधे जीवनाच्या शेवटच्या वेळेस माणसाची स्थिती काय असते , किंवा मरण म्हणजे परमेश्वराला आपल्या जीवनाचा हिशेब देण्याचा दिवस असतो | ह्यात समर्थानी नवविधा भक्तिची नववी भक्ति " आत्मनिवेदन" ह्याच स्वरुप प्रस्तुत केल आहे | आत्म निवेदन म्हणजे काय ? "सेल्फ़ एनालीसीस " असत |प्रत्यैक माणसांनी आपल्या जीवनांत काय केल आहे ह्यचा विचार कसा करावा हे ह्या १२ ओव्यान मधे समर्थांनी समाजाच्या पुढे मांडल आहे |आपल्या जीवनाचा प्रत्यैक दिवस आपल आत्म परीक्षण करुन पहावे |आपण आपल जीवन कीती सार्थक केल ते पहव |ते कस ? एखाद वेळेस आपली चुक लक्षांत आल्यावर "आपल वागण , बोलण हे चूक होत, हे लक्षांत आल्यावर अरे - अरे हे आपल्या हातुन कस घडल ? हा विचार

करायला पाहिजे | आजचा आपला मरणाचा दीवस समजुन , असा भास करुन आत्म परीक्षण करुन पहाव |



Anonymous - Oct 1, 2011
" जाले साधनाचे फ़ळ | संसार झाला सफ़ळ .......|
" जाले साधनाचे फ़ळ | संसार झाला सफ़ळ | निर्गुण ब्रह्म ते निश्चळ | अंतरी बिंबले ||श्रीराम ||दशक-२० ,समास -१०, ओवि २६||
जीवनाच्या शेवट्च्या दीवशी किंवा वेळेस कस वाटत ? त्या शेवटच्या वेळेला जेंव्हा माणसाला सर्व भौतिक जीवन शून्य व नकोस वाटत | तेंव्हा लक्षांत येत की या भौतिक खोट्या संसारात काहीच नाही | तेंव्हा परमेश्वराच निर्गुण स्वरुप निश्चळ पणे अंतर मनांत ठसवतात व तेंव्हा हा जीवन रुपी संसार , सफ़ळ झाल्यागत भासतो | त्या वेळेस सम्पूर्ण जीवन आठवुन, जाणते अजाणते पणे आपल्या हातुन घडलेले सर्व क्रुत्य आठवतात | परमेश्वराची श्रध्दा , भक्ति , व निष्ठा पूर्वक केलेली साधना सार्थक झाल्यागत भासते | नामस्मरणाने जीवन सार्थक झाल हे सत्य लक्षांत येत आणि जेंव्हा ह्या संसारात सर्व नश्वर आहे फ़क्त नाम हेच शाश्वत आहे , हे लक्षांत येत तेंव्हाच ते निर्गुण परब्रह्म दिसायला लागत व मनांत ठसवत |



Anonymous - Oct 2, 2011
"हिसेब झाला मयेचा | झाला निवाडा .......|
"हिसेब झाला मयेचा | झाला निवाडा तत्वांचा | साध्य होता साधनांचा | ठाव नाही || श्रीराम ||द.२० , स.-१० , ओवि २७||
समर्थ म्हणतात - --- हे जड द्रुष्य जगत दिसत आहे , जे फ़क्त सर्वस्व मायावी आहे | हे सर्व्च नष्ट होणार आहे | हे सर्वांनाच माहित आहे | ह्या मायेचा हिशेब आज संपणार | हे तत्वाअंनी बनलेल शरीर ह्याचा आज पूर्ण निर्णय लागणार च | जेवढी साधना भक्ति केली त्यी सर्व साध्य झाल्या सारखी भासली कारण बाकि सर्व नश्वरच पण शाश्वत काय ती फ़क्त केलेली निष्काम भक्ति | ह्यावर काय बोलाव त्या करितां माझ्या जवळ शब्द नाही |



Anonymous - Oct 2, 2011
अनेक धन्यवाद :)



Anonymous - Oct 3, 2011
message
अरे कोणि वाचत आहे वाटात ......मला वाटल मी आपली उगाचच काम करते आहे....



Anonymous - Oct 3, 2011
स्वप्नी जे-जे देखिले | ते-ते जाग्रुतिस उडाले...|
स्वप्नी जे-जे देखिले | ते-ते जाग्रुतिस उडाले | सहजचि अनिर्वाच्य जाले | बोलता न ये ||श्रीराम||द.-२०-स.१०--ओवि २८ ||
ह्या स्वप्न रुपी संसारात जे जड पण पदार्थ द्रुष्य मय आहे व तसच अनुभवास येत | मरणासन्न अवस्थेत जेंव्हा जग्रुति येते तेंव्हा लक्षांत येते हे सर्व भ्रामक द्रुष्य आहे | हे सर्व नश्वर आहे | ह्या भ्रामक द्रुष्यांत आपण किती वेळ गमवला ? आणि त्या वेळेस जाग्रुति येताच एकदम सर्वच संपल्या सारख भासत | ह्या सर्व जडमय द्रुष्यातुन बाहेर येताच ते अनिर्वाच्या [परब्रह्म ] स्वरुप आपल्या अंतरंगात समवल्यागत भासत | ते अनिर्वाच्य स्वरुप आपल्याला प्राप्त होत | ते प्राप्त करण्यां करितां द्रुष्य जगांतुन बाहेर याव लागत आणि अश्या स्थिती करितां काही बोलाव अशे शब्द माझ्या जवळ नाही
Anonymous - Oct 3, 2011
ऐसे विवेके जाणावे | प्रत्यये खुणेसी बाणावे....
ऐसे विवेके जाणावे | प्रत्यये खुणेसी बाणावे | जन्म म्रुत्यु च्या नांवे शून्याकार ||श्रीराम ||द.२०-स.१०- ओ.२९ ||
समर्थ सांगतात ---- हे माणसां ! तु लहान सहान घडलेल्या गोष्टींचा अनुभव घेण्या करितां विवेक पूर्ण विचाराने हे जाणून घे की जन्म म्रुत्यु च्या नावां खाली हे जग फ़क्त शून्यच आहे | ह्या जगांत

काही पण खर नाहीये , परमेश्वराच्या नाम स्मरणां शिवाय |ह्यां करीतां जीवनांत छोट्या-छोट्या गोष्टींनी सतत् अनुभव येत असतात |ते सतत विवेकाने जाणून घ्यावे |




Anonymous - Oct 3, 2011
भक्ताचेनि स्वाभिमाने |क्रुपा केली दाशरथी ने

भक्ताचेनि स्वाभिमाने |क्रुपा केली दाशरथी ने |समर्थ क्रुपेची वचने |तो हा दासबोध ||श्रीराम||द.२०-स.१०-ओ.३०||

दाशरथी म्हणजे प्रभु श्री राम चन्द्रांनी भक्तांचा स्वाभिमान राखण्या करितां त्यांच्या प्रेमापायी दिलेली आशिर्वचने |त्याअ आशिर्वचनां ना प्राप्त करुन समर्थांनी ह्या ग्रंथाची रचना केली आहे |हा दासबोध म्हणजे प्रभु श्री रामाच्या क्रुपे मुळे श्री समर्था द्वारे लिहीला गेलेला भक्ति योगाचा ज्ञानाचा भंडार आहे |ह्यात श्री समर्थांनी माणंसाला जीवन जगण्या करितां भक्ति योगाच ज्ञान विस्त्रुत रुपानें सांगीतले आहे |



Anonymous - Oct 3, 2011
:)



Anonymous - Oct 4, 2011
वीस दशक दासबोध |श्रवण द्वारे घेता शोध .......

वीस दशक दासबोध |श्रवण द्वारे घेता शोध |मनन कर्त्यास विशद |परमार्थ होतो || श्रीराम||द.२०-स.१०-ओवि३१||

ह्या ग्रंथात २० दशक लिहीलेले आहेत |त्याचा श्रोत्यांनी श्रवण करुन , मनन कराव |मग स्वतः आत्म चिंतन करण्याचा प्रयत्न करावा |त्या नंतर पुन्हाः - पुन्हाः मनन कराव |मग आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा |चिंतन व मनन केल्याने मनांतील भ्रामकता [विष रुपी] दूर्होऊन जाते | येथे विशद शब्दाचे दोन अर्थ होतात माझ्या मते ... [१] विलक्षण परमार्थ घडतो [२] विष रुपी


भ्रामक कल्पना दूर होतात |अर्थात ,ह विषरुपी भ्रामक कल्पना दूर होऊन विलक्षण परमार्थ घडतो |हे निश्चीतच आहे |



Anonymous - Oct 4, 2011
वीस दशक दोनशे समास |साधके पहावे सावकाश.........
वीस दशक दोनशे समास |साधके पहावे सावकाश|विव्हरता विषेश - विषेश |कळु लागे
||श्रीराम||द.२०-स.१०-ओवि ३२ ||
ह्या ग्रंथात २० दशक आहेत ,त्याचे २०० शे समास आहेत |साधकाने [ वाचन कर्त्याने] सावकाश सम्जुन उमजुन वाचावेत |त्याच्याच बरोबर त्यच सतत मनन करीत असावे |म्हणजे त्यातील ज्ञान हळु-हळु माणसांला समजायला लागत व आत्म परिक्षण करण्यांस सोप होत |कारण दासबोध वाटतो तितका सोपा व सरळ नव्हे| पुन्हा; -पुन्हा: वाचन केल्याने ,मनन केल्याने नवीन काही तरी प्राप्त होत असत व मनांतील भ्रामकता दूर होते |



Anonymous - Oct 4, 2011
ग्रंथाचे करावे स्तवन |स्तवनाचे काय प्रयोजन.......
ग्रंथाचे करावे स्तवन |स्तवनाचे काय प्रयोजन |येथे प्रत्ययास कारण |प्रत्ययो पहावा
||श्रीराम||द.२०-स.१०---ओवि ३३||
ह्या ग्रंथा चे सतत स्तवन [वाचन करावे] करावे |ते वाचन करण्याच प्रयोजन काय आहे ते जाणून घ्यावे |कारण की त्या मुळे छोट्या- छोट्या गोष्टिंचा अनुभव घ्यावा |जीवनांतल्या व दासबोधांत दिलेल्या लहान-सहान गोष्टींच अनुभव पण ह्या ग्रंथा द्वारे प्राप्त होतो व मनांतील भ्रामकता दूर होते |



Anonymous - Oct 4, 2011
देह तव पाचा भूताचा |करता आत्मा तेथीचा...........

देह तव पाचा भूताचा |करता आत्मा तेथीचा |आणि कवित्व प्रकार मनुष्याचा |कशा वरुनी ||श्रीराम|| द.२०-स.१०--ओवि. ३४ ||

हे मानवा ! तुझा देह हा पॉच भूतांचा मिळुन बनलेला आहे , परंतु तेथे जो कर्ता आहे तो अंतरात्मा आहे |जो कर्ता करविता आहे तो आत्मा आहे |आणि तरी पण कर्तेपणाच महत्व मनुष्य स्वतः कडे कशाला घेतो ? माणसाने सर्व कर्तेपण परमेश्वरावर टाकुन द्याव |जेंव्हा आपण परमेश्वरावर सर्व टाकतो तेंव्हा सर्व कार्य सकारात्मक च होतात व त्या कार्या मधे आपल्याला मानसिक त्रास होत नाही |




Anonymous - Oct 4, 2011

सकळ करणे जगदीशाचे |आणि कवित्व ची काय मनुष्याचे...

सकळ करणे जगदीशाचे |आणि कवित्व ची काय मनुष्याचे |ऐशा अप्रमाण बोलण्याचे |काय घ्यावे ||श्रीराम || द.२०-स.१०--ओवि ३५ ||

हे मानवा ! सर्व कार्य परमेश्वराच्या द्वारे करुन ठेवले आहे |तसच सर्व घडत जात |मग कर्तुत्वाचा मोठे पणा माणूस आपल्या कडे कशाला घेतो ? ही गोष्ट अप्रामाणिक ठरते |मी कर्ता आहे अस अप्रामाणिक बोलण्या पेक्षा , कर्ता परमेश्वर आहे हे लक्षांत ठेवाव |कारण ज्याचा कर्ता परमेश्वर आहे त्याच श्रेय आपल्या कडे घेण अस अप्रामाणिक बोलण्याचा काय अर्थ आहे ? त्याला काय मान द्यायचा ? कर्तेपणा चा मी पण आपल्या कडे घेण हे अनुचित कार्य आहे |



Anonymous - Oct 4, 2011

सकळ देहाचा झाडा केला |तत्व समुदाय उडाला .........

सकळ देहाचा झाडा केला |तत्व समुदाय उडाला |तेथे कोण्या पदार्थाला |आपले म्हणावे || श्रीराम || ३६ ||

जीवनांच्या अंतिम क्षणाच्या वेळेस , जेंव्हा सर्व देहाची झडती होऊन पंच तत्व म्हणजे पाणी , उष्णता , जड , वायू , शून्य , आपल्या देहातुन एकत्र होतात व त्याचा एक समुदाय बनुन गरर्कन शरीरातुन उडून जातो व तो निष्प्राण देह पडलेला असतो |अश्या निष्प्राण शैइर रुपी पदार्थाला आपण आपल म्हणाव त्यात काय अर्थ आहे |कारण ती फ़क्त मातीच आहे |उरलेल्या मातीचा काय मोह ?



Anonymous - Oct 4, 2011
ऐसी ही विचाराचि कामे |उगोच भ्रमो नये भ्रमे.......
ऐसी ही विचाराचि कामे |उगोच भ्रमो नये भ्रमे |जगदीश्वरे अनुक्रमे |सकळ केले ||श्रीराम ||द.२०-स.१०-ओवि ३७ ||
हे मानवा ! हे सर्व विचार पूर्वक कार्य आहेत |उगीचच भ्रामक विचारांत पडून भटकु नये | परमेश्वरानें सर्व अनुक्रमुन ठेवलेल आहे |त्यात आपल ते विषेश काय ? जर सर्वच त्या परमेश्वराने अनुक्रमुन ठेवलेल आहे तर त्या प्रमाणेच सर्व घडत्च राहणार |मग माणसांचा अहंकार तो काय ? कर्ता करवितां तोच एक ईश्वर आहे |आम्ही फ़क्त त्याची निष्ठा पूर्वक भक्ति करावी |त्याच नाम स्मराव आणि त्याच स्वरुप मनांत साठवण्यांचा प्रयत्न करावा |तेंव्हा जेवढ आपल्या हातात आहे तेवढ माणसाने अवश्य करावे |नाम स्मरण एक अस सोप , सरळ साधन आहे परमेश्वराला जवळ करण्यां करितां किंवा प्राप्तिच सोप साधन आहे |हा सरळ व सोपा मार्ग आहे |तेंव्हा सतत् नामस्मरण करीत असावे |
||श्रीराम जय राम जय जय राम ||

|| जय जय रघुवीर समर्थ||